# दिनेश जोगदंड

# विसरलेले छत्रपती....

## झुंज एका भगव्या वादळाची.....



श्री क्षेत्र वढू बुद्रुक ता. शिरूर जि. पुणे महाराष्ट्र
धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे समाधी स्थळ

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# विसरलेले छत्रपती

श्री. दिनेश महादेव जोगदंड

# विसरलेले छत्रपती

लेखक – श्री. दिनेश महादेव जोगदंड
मोबाईल नं. ८९७५२४५१५२, ८२०८३०३७७८
ईमेल ; sunrise.dinesh2018@gmail.com
अंबाजोगाई - ४३१५१७
जि. बीड महाराष्ट्र

या पुस्तकातील चित्रे प्रताधिकारमुक्त आहेत.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ (दंड व तुरुंगवास)शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**विसरलेले छत्रपती**

**प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान**

www. esahity. com

esahity@gmail. com

9987737237 (Whatsapp for free ebooks)

प्रकाशन : ७ जुलै २०२३

©esahity Pratishthan®2023

**ई साहित्य प्रतिष्ठान हे मुक्त व्यासपीठ आहे. या पुस्तकातल्या सर्व मते व माहितीशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



## लेखक परिचय



श्री. दिनेश महादेव जोगदंड,

बी. एस्सी (संगणक)

कॉक्सिट कॉलेज अंबाजोगाई जि. बीड येथे शिक्षण.

खासगी शाळेत संगणक शिक्षक म्हणून काम केले.

सध्या स्वतःचे कॉम्प्युटर मल्टी - सर्व्हिसेसचा व्यवसाय.

' विसरलेले छत्रपती ' या प्रथम पुस्तकांच्या मार्फत लेखन क्षेत्रात पदार्पण.लेखक म्हणून अजून शिवकालीन माहिती आधारित पुस्तक लेखनाचे लक्ष.

लहानपणापासून ऐतिहासिक माहिती आणि चित्रपटांची आवड होती.तसेच वेगवेगळी संगीत, गाणी ऐकणे नेहमीच माझा छंद राहिला आहे. त्याचप्रमाणे कविता आणि गाणे लिहण्याची आवड जोपासली आहे. अनेक प्रेम कविता, विरह कविता ई.लेखन. मागील 4 वर्षात छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध कादंबरी व पुस्तकांचे वाचन. शिवकालीन पत्रे आणि संदर्भ पुस्तिकाचा अभ्यास. शिवकालातील घटना आणि छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरित्राचा सखोल अभ्यास करण्याचा

प्रयत्न सुरू आहे.आणि शिव चरित्र महाराष्ट्रभर सर्व सामान्य युवा पिढी पर्यंत पोहचविण्याचा ध्यास. त्यासाठी संभाजी: विश्वास पाटील, छावा ; शिवाजी सावंत, शिवभारत: कवी परमानंद अशी पुस्तके वाचन करून सखोल इतिहासाचा अभ्यास करून शिव विचारांचा प्रचार व प्रचार करण्याचा एकच ध्यास !!!

**दिनेश महादेव जोगदंड,**

**सनराईज ऑनलाईन सर्व्हिसेस,**

**एस आर टी आर शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय,**

**मोबाईल नं. ८९७५२४५१५२, ८२०८३०३७७८**

**ईमेल ; sunrise.dinesh2018@gmail.com**

**अंबाजोगाई - ४३१५१७**

**जि. बीड महाराष्ट्र**

# मनोगत

**II जय जिजाऊ II जय शिवराय II जय शंभूराजे II**

**सर्व शिवभक्तांना माझ्याकडुन सादर II जय शिवराय II**


मी दिनेश महादेव जोगदंड रा. अंबाजोगाई जि. बीड महाराष्ट्र येथील रहिवाशी असून मी सनराईज ऑनलाइन सर्व्हिसेस नावाने एक छोटा व्यवसाय करतो. आज माझ्या आयुष्यातील पहिल्या पुस्तकामार्फत आपल्यापर्यंत पोहचत आहे. मी कोणी मोठा लेखक, कवी किंवा साहित्यिक नसून तुमच्यासारखाच एक शिव-शंभु विचारांचा पाईक आहे.

पुस्तकाचे शीर्षक वाचून कदाचित आपल्यापैकी बऱ्याच जणांचा गोंधळ ही उडाला असेल, ते मला अपेक्षितही होतेच. पण आज आसपास मी ज्या नजरेने या समाजामधील लोकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची किर्ती किंवा गौरव पाहतो, त्याने मन अभिमानाने भरून येतेच पण एक वेगळी खंत मनात नेहमीच होती की, ज्याप्रमाणे स्वराज्याचे पहिले छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा आहे त्यांना जो जागतिक दर्जा आहे. याच छत्रपतींचे पुत्र जे स्वराज्याचे दुसरे छत्रपती झाले ज्यांनी शिवरायांच्या स्वराज्याला दिवसरात्र एक करून त्याचा विस्तार केला.अगदी शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी स्वराज्य राखण्यासाठी स्वतच्या प्राणाची आहुती दिली अशा तेजस्वी महापराक्रमी शिव सिंहाचा छावा धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास मात्र अजून बऱ्याच लोकापर्यंत पोहचलेला नाही. अक्षरशः काही

अज्ञानी लोकांना तर नेमक छत्रपती संभाजी महाराज कोण आहेत हाच प्रश्न पडतो. उलट प्रश्न विचारतात संभाजी महाराज काय शिवरायांचे भाऊ होते का वडील होते?? हे ऐकून तळपायाची आग अक्षरशः मस्तकी जाते.आणि त्यावेळी या निर्बुद्ध समाजाची तर चीड येतेच पण स्वतःची ही चीड येते. की ज्या वयामध्ये आजची युवा पिढी फकत महागड्या गाड्या, मोबाईल, फॅशनचे कपडे घालून मिरवतात आणि आईवडिलांच्या पैशांवर ऐश करतात ना त्यांना आई वडिलांचे कष्ट दिसतात ना त्यांचे स्वप्न.... परंतु छत्रपती संभाजी महाराज म्हणजेच शंभुराजे लहानपणापासूनच आपल्या वडिलांनी निर्माण केलेल्या स्वराज्यासाठी प्रत्येक वेळी आपल्या बालपणाचा त्याग करून स्वराज्य कार्यात सक्रिय राहिले. मग ते पुरंदरच्या तहाच्या वेळी मिर्झाराजेजयसिंह यांच्या छावणीत रहाणे असो,आग्रा भेटी वेळी औरगंजेबाच्या कैदेतून सुटका असो, त्यानंतर त्यांच्या जिवंतपणीच महाराजांनी घातलेले त्यांचे संस्कार श्राद्ध असो किंवा स्वराज्याच्या रक्षणार्थ स्वतः शिवरायांच्या गनिमी काव्यानुसर मुघलांच्या छावणीत जाऊन त्यांच्याशी सलगी वाढविणे असो. असे कित्येक गोष्टी शंभुराजे नी स्वराज्यासाठी केल्या. आणि त्यामुळे त्यांची बदनामी ही झाली नको नको ते आरोप त्यांच्यावर करण्यात आले.अगदी त्यांच्या चारित्र्यावर ही शिंतोडे उडविण्यात आले. पण एकमेव आपल्या आबासाहेबांनी निर्माण केलेल्या स्वराज्याला व रयतेला सुखी आणि सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांनी आपले बलिदान दिले. अशा शूर पराक्रमी अजिंक्य योद्धा धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराजांना आजचा समाज ओळखत नाही. यापेक्षा काय ते दुर्दैव??

म्हणूनच आज आपल्यासमोर मी छत्रपती संभाजी महाराजांचा पराक्रम व त्यांची शौर्यगाथा अगदी संक्षिप्त रुपात तुमच्या समोर आणण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या शंभूराजांच्या पराक्रम ३२ हजार पानात ही मावणार नाही एवढा आहे पण वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी ज्यांनी आपले बलिदान स्वराज्यासाठी दिले आणि याच महान शूर शिव - सिंहाच्या छाव्याचा म्हणजेच आपल्या शंभुराजे यांचा चरित्ररुपी इतिहास मी या ३२ पानी (A4) पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वांनी पुस्तक वाचून माझ्या राजांचे पराक्रम व बलिदान संपूर्ण जगापुढे आणण्याचा प्रयत्न करावा. आणि आपल्या प्रतिक्रिया नक्की कळवा. जेणेकरून पुढे आपली सर्वांची प्रेरणा व आशीर्वाद घेऊन शिव - शंभू विचार सर्वदूर पोहचविण्यासाठी शेवटपर्यंत श्वासापर्यंत सक्रिय राहील.हीच शिव - शंभू चरणी प्रार्थना!!!

**II जय जिजाऊ II जय शिवराय II जय शंभूराजे II**



श्रीमंत रायगडावरील छत्रपती श्री शिवाजी महाराजांची सिहासानावरील पूर्णाकृती मूर्ती

# अर्पण पत्रिका




**II जय शिजाऊ II जय शिवराय II जय शंभुराजे II**

पुस्तक लिहायचे जेव्हा ठरवले आणि मार्चमधील बलिदान मास मध्ये पुस्तक लिखाण सुरू केले. त्यानंतर पुस्तक पूर्णत्वास आले असता मला ई साहित्य या ऑनलाईन प्रकाशन संस्थेबद्दल माहिती मिळाली आणि त्यांना माझे पुस्तक प्रकाशन विनंती केली. पण  मे महिन्यात माझ्या वडिलांची तब्येत बिघडली.माझे पुस्तक प्रकाशनासाठी तयार झाले होते आणि माझे अगोदर ठरले होते की पुस्तक मी १४ मे २०२३ रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या

जयंती दिवशी प्रकाशन करायचे होते.पण वडिलांची तब्येत जास्तच खालावत गेली आणि मला जास्त वेळ वडिलांसोबत दवाखान्यात घालावा लागत असे. त्यामुळे पुस्तक प्रकाशन १४ मे रोजी होणे अशक्य झाले.त्यानंतर दि.१ जून २०२३ रोजी माझ्या वडिलांचे निधन झाले. आणि माझ्या पुस्तक प्रकाशनाची पूर्ण तयारी झाली होती.आणि मला २ जून रोजी मला ई साहित्य कडून पुढील प्रक्रियेसाठी मेल मिळाला. अशाप्रकारे माझ्या आयुष्यात एकाच वेळी २ मोठ्या घटना घडत होत्या. एकीकडे वडिलांचे सोडून जाणे आणि एकीकडे माझ्या आयुष्यातील माझे पहिले पुस्तक प्रकाशन होणार होते. त्यानंतर वडिलांचे निधन, विधी, अस्थी विसर्जन ई. गोष्टी मध्ये काही दिवस गेले. आणि योगायोग असा झालं की वडिलांच्या तेराव्या च्या विधी दिवशी मला ई साहित्य कडून माझ्या पुस्तकाची अंतिम प्रत मेलद्वारे मिळाली. त्यावेळी मी माझ्या मनात ठरवले की माझ्या पुस्तकाची पहिली प्रत माझ्या वडिलांना अर्पण करावी.

वाचकांना इथे मी आवर्जून सांगू इच्छितो की, मी माझ्या या पहिल्या पुस्तकाची प्रत माझ्या वडिलांना कै.महादेव संभाजी जोगदंड रा. अंबाजोगाई यांना अर्पण करतो. तसेच माझी आई पंचफुला संभाजी जोगदंड यांना अर्पण करतो. त्याचबरोबर मला हे पुस्तक लिहायची प्रेरणा ज्यांनी दिली अशा माझ्या आयुष्यातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व माझी प्रेरणास्थान यांना पुस्तक अर्पण करतो.

सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

धन्यवाद!!!.

# प्रस्तावना

**II जय जिजाऊ II जय शिवराय II जय शंभुराजे II**

माझ्या आयुष्यात आजचा क्षण अविस्मरणीय आहे. कार्यपुर्ती या शब्दाच्या अर्थाची पुर्णतः जाणीव करून देणारा क्षण आहे.कारण छत्रपती शिवरायांनंतर स्वराज्याला लाभलेले स्वराज्याचे धाकले धनी म्हणाजेच दुसरे छत्रपती धर्मवीर श्री संभाजी महाराजांना आणि त्यांच्या बलिदानाला विसरलेल्या या समाजाला त्यांची खरी ओळख करून देण्यासाठी केलेला हा पहिला प्रयत्न!! या पुस्तकातून पूर्णत्वास आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज नाव उच्चारताच जी ऊर्जा आणि स्फुर्ती नसानसात सळसळते आणि छत्रपती संभाजी महाराजांचा धगधगणारा इतिहास व पराक्रम, आपल्या जगणाल्या एक नवीन दिशा देऊन जातो. आज माझ्या आयुष्यातील पहिल्या पुस्तकाच्या मार्फत आज तुमच्यापर्यंत मी शिवपुत्र धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांची चरित्ररुपी ओळख सांगण्याच्या प्रयत्न करणार आहे. मी शंभू - चरित्राचा लेखक नसून संकलक आहे दिवगंत कादंबरीकार आणि लेखकाच्या कादंबरी, बखरी व पुस्तकातून शंभु राजेंच्या चरित्रातील घटना संकलित करून आणि त्याचसोबत माझ्या मनातील खदखद समाजापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्याचा सर्वदूर विस्तार आणि रक्षण करण्यासाठी शंभुराजे आयुष्यभर झटत राहिले. एवढंच नव्हे तर ते आपल्या प्राणाची आहुती सुद्धा देण्यास डगमगले नाहीत.स्वराज्याच्या आणि धर्माच्या रक्षणार्थ अनेक अडचणी, संकटाना तोंड

देऊन शंभुराजे स्वराज्यासाठी खंबीरपणे उभे राहिले आणि त्यांचा अंत ही तेवढाच वेदनादायी झाला.

सर्व शिव - शंभू भक्तांना आपल्या धाकल्या धन्याचा जाज्वल्य इतिहास व बलिदान माहित आहेच. पण ज्या समाजात आपण राहतो,ज्या महाराष्ट्र भूमीवर आपण राहतो ज्या मातीतील कणाकणात आणि डोंगर नद्या मध्ये आपल्या छत्रपतींचा वास आहे. तिथं शिव - शंभू यांचे आपल्यावरील उपकार विसरणारी लोक पण आपण इथे पाहतो. आणि मनात काहूर उठते की आपण आपल्या शिव - शंभू चे विचार या लोकापर्यंत कसे पोहचवू शकतो? मला माझ्या बाबतीत ही तीच खंत आहे की माझ्या आयुष्यात देखील छत्रपती, त्यांचे विचार, त्यांची प्रेरणा आणि त्यांचा इतिहास येण्यास इतका उशीर कसा काय झाला? आणि त्याबद्दल, महाराज !! मी आपली क्षमा मागतो... माझ्या आयुष्यात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या विचारांचे कल्पतरू वृक्ष कसे वाढले आणि माझ्या जीवनावर त्यांचा कसा प्रभाव झालं हे तुम्हाला सांगणे मला गरजेचे वाटते. संपूर्ण देशावर जेव्हा कोरोना महामारीचे संकट आले आणि सर्वजण घरामधे कैद झाले. तेव्हा प्रत्येक व्यक्ती टीव्ही किंवा मोबाईल वर काही व्हिडिओ मालिका चित्रपट पाहणे याशिवाय दुसरे काम च नव्हते. त्यात मला माझ्या जिवलग व्यक्तीने एक दिवस सांगितले की मी आताच टीव्हीवर एक ऐतिहासिक मालिका पाहायला सुरू केली त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका करणारी व्यक्ती खूप छान भूमिका करीत आहे आणि हुबेहूब छत्रपती शिवाजी महाराज साकारत आहे.आणि तू नक्की बघ ! असे म्हणत ती माझ्यामागेच लागली. मी म्हणल

ठीक आहे मी पाहतो .आणि त्या मालिकेचे नाव होते, ' स्वराज्यरक्षक संभाजी ' आणि मी लगेच मोबाईल वर एक एपिसोड पाहिला. मी एक एपिसोड पाहत पाहत पुढे काय होतं याची उत्सुकता वाढत वाढत कधी मी 3-४ एपिसोड पहिले मला देखील कळलं नाही. आणि खरचं छत्रपती शिवराय कसे चालत - बोलत असतील याची हुबेहूब प्रचिती देणारी व्यक्तिरेखा साकारली होती. त्या कलाकाराचे नाव होते शंतनु मोघे सर !!! मला आवर्जून इथे नमूद करावेसे वाटते की आज माझ्या आयुष्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची जी छाप पडली आहे, ती फक्त आणि फक्त शंतनु मोघे सरांच्या अभिनयामुळे अर्थात त्यांच्या भूमिकेत आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांची विचार पद्धती, दुरदृष्टी आणि एक महान राजा जो रयतेच्या सुखासाठी दिवसरात्र एक करीत होते अशा जाणत्या राजांची मला ओळख झाली होती .महान आणि विश्व वंदनीय व्यक्तिमत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रवेश माझ्या आयुष्यात झाला तो एकमेव शंतनु मोघे सरांच्या अप्रतिम अभिनय शैलीमुळे !त्याबद्दल धन्यवाद शंतनु मोघे सर! त्या दिवशीच मी ठरवलं की ही मालिका पहिल्यापासून पहाणार.आणि मी मोबाईल वरच मालिका पाहण्यास सुरुवात केली.

दिवसेंदिवस माझी उत्सुकता आणि महाराजांच्या बद्दल आदर वाढत गेला. माझ्या मनात शिव शंभु विचाराचे बीज पेरले जाऊ लागली. आता पर्यंत फक्त ४ थी च्याच पुस्तकात शिकलेला इतिहास जो पूर्णपणे डोक्यातून पुसून ही गेला होता. तो नव्याने कळू लागला होता समजू लागला होता. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे व्यक्तिमत्त्व आज ही

जवळपास ४०० वर्षानंतर ही सर्वोच्च स्थानी का आहे याची प्रचिती मला आली होती.छत्रपती शिवराय आणि शंभुराजे यांची प्रथम ओळख आणि विचाराचे पेरलेले बीज आता माझ्या मनात फुलू लागली.मी मालिकेच्या पूर्ण आहारी गेलो होतो आणि मी मलिकासोबतच बाह्य स्त्रोत शाधू लागलो. जेवढं होईल तेवढं छत्रपती शिवजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांची माहिती गोळा करू लागलो. यूट्यूब, पुस्तके, कादंबरी तसेच, सोशल मीडियावर शिवचरित्र वाचू लागलो. माझ्या मनातील शिव विचाराचे बीजाचे रूपांतर आता रोपट्यामध्ये झाले होते. आणि मी त्याला विविध पुस्तके कादंबरी, व्हिडिओज मधून खतपाणी देऊन मी शिवचरित्राचा जास्तीत जास्त अभ्यास करू लागलो. त्याचबरोबर छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत आपल्या उत्तम शैलीतून अभिनय साकारणारे डॉ.अमोल कोल्हे सर यांनी ज्या प्रकारे आज या महाराष्ट्र समोर छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास व पराक्रम सर्वांसमोर मांडला आहे त्यातून या युवा पिढीला खऱ्या रूपाने छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र समजले आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवरायांची भूमिका शंतनु मोघे सरांनी हुबेहूब साकारली होती त्याचप्रमाणे डॉ.अमोल कोल्हे यांनी छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका उत्कृष्टरित्या साकारलेली आहे किंबहुना अमोल कोल्हे यांच्या अभिनयामुळे आणि मालिकेमुळे छत्रपती संभाजी महाराज व त्यांचा इतिहास पराक्रम आणि बलिदान हे घराघरात सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले आहेत. त्याबद्दल डॉ. अमोल कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार. माझ्यासारख्या समाजातील बऱ्याच घटकांपर्यंत खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी

महाराजांची ओळख डॉ. अमोल कोल्हे आणि शंतनू मोघे सरांनी करून दिली आहे आणि मी त्यासाठी नेहमीच त्यांना माझे प्रेरणास्थान मानतो आणि पुन्हा एकदा डॉ. अमोल कोल्हे आणि शंतनू मोघे सरांचे मी मनापासून आभार मानतो. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास अतिशय रंजकपणे व वास्तवतेला धरून या मालिकेच्या रूपातून आपल्या समोर डॉ. अमोल कोल्हे यांनी आणला त्याप्रमाणेच छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास माझ्या आसपासच्या लोकांपर्यंत, समाजापर्यंत पोहोचण्यासाठी मी काय करू शकतो याचा विचार नेहमीच माझ्या डोक्यामध्ये फिरू लागला.

छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी अगोदर मला तो पूर्णपणे समजला पाहिजे त्यासाठी मी वेगवेगळी पुस्तके, चरित्रे, आणि कादंबऱ्या वाचू लागलो तसेच कोणता इतिहास किती खरा आणि किती खोटा हे समजून घेण्याचा प्रयत्न करू लागलो. अनेक ऐतिहासिक चित्रपट, व्हिडिओ पाहू लागलो. सध्या चित्रपट सृष्टीमध्ये भव्य आणि खूप छान ऐतिहासिक चित्रपट बनवली जाऊ लागली आहेत त्यामध्ये मग स्वतः डॉ.अमोल कोल्हे सर, दिग्दर्शक दिगपाल लांजेकर सर, दिग्दर्शक आणि अभिनेता प्रवीण तरडे सर असतील यांसारख्या काही अभ्यासू व्यक्तींनी पुढाकार घेऊन आपल्या छत्रपतींचा इतिहास लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे यांच्या चित्रपटांमधूनही मला खूप काही नवीन इतिहास कळू लागला आणि प्रेरणा मिळू लागली. हे सर्व सुरू असताना मला माझ्या एका मित्राकडून जो की वढू या गावातील रहिवाशी असून त्याच्याकडून मला

छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदान मास याबद्दल नवीन माहिती मिळाली. प्रत्येक वर्षी फाल्गुन शुक्ल प्रतिपदेपासून ते पुढील एक महिना म्हणजेच फाल्गुन अमावस्येपर्यंत हा बलिदान मास पाळला जातो. या महिन्यामध्ये आपल्या शंभूराजांची हाल हाल करून, त्यांना अत्यंत क्रूर अशा मरण यातना देऊन त्यांची हत्या करण्यात आली होती आणि या एका महिन्यामध्ये आपण शंभूराजांना श्रद्धांजली म्हणून सर्व शंभू भक्तांनी आपल्या आवडत्या गोष्टीचा त्याग करून ऐशोआराम, सोहळे, समारंभ आयोजित करण्याचे टाळावे. तसेच ज्यांना जे शक्य होईल ते करावे जसे की मुंडन करणे, चप्पल सोडणे, गादीवर न झोपणे, गोड पदार्थ, मांसाहार टाळणे, ई. गोष्टी या बलिदान मास मध्ये पाळणे. तेव्हापासून मी बलिदान मास पाळू लागलो आणि अशाप्रकारे छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास माझ्या जवळच्या मित्रांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न मी करू लागलो. फाल्गुन अमावस्या दिवशी म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त वढू बुद्रुक या गावामध्ये घेण्यात येणारी मुक पदयात्रा म्हणजेच छत्रपती संभाजी महाराजांची न निघालेली अंतयात्रा यामध्ये मी सहभाग घेतला आणि तिथून पुढे प्रत्येक वर्षी मी हा बलिदान मास पाळू लागलो आणि बलिदान दिन वढू बुद्रुक येथे जाऊनच महाराजांना श्रद्धांजली वाहू लागलो.

मला इथे एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते.माझ्या शंभू भक्तांना सांगावीशी वाटते, माझ्या आयुष्यातील आनंदाचा क्षण आला होता. मी गेल्या वर्षी बलिदान दिनानिमित्त वढू बुद्रुक येथे गेले असता तेथून जवळच असलेले छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ श्री क्षेत्र तुळापूर येथे मी

दर्शनासाठी गेलो असता तेथे मला साक्षात डॉ.अमोल कोल्हे यांची भेट होण्याचा योग आला. अशा ठिकाणी मला डॉ.अमोल कोल्हे यांची भेट होईल असे कधीच अपेक्षित नव्हते. पण साक्षात छत्रपती संभाजी महाराज यांनी मला ही भेट घडवून आणली आणि आशीर्वाद दिल्यासारखे मला वाटू लागले आणि मी डॉ.अमोल कोल्हे यांना हस्तांदोलन करण्यासाठी पुढे गेलो. आणि माझा हात पुढे सरसावला त्याचबरोबर त्यांनी सुद्धा तेवढ्याच आपुलकीने आणि आदराने माझा हात हातामध्ये घेऊन मला प्रतिसाद दिला आणि मी त्यांना 'जय शिवराय' म्हणून अभिवादन केले आणि त्यांनीही मला तेवढ्याच आपुलकीने व आदरपूर्वक ' जय शिवराय' म्हणाले. मला अगदी भरून आले आणि त्यानंतर त्यांनी माझ्याकडे पाहून दोन्ही हात जोडून माझ्याकडे पाहून स्मित हास्य केले आणि पुढे निघाले. अक्षरशः स्वतः छत्रपती संभाजी महाराज यांचा आशीर्वाद मला लाभल्यासारखे वाटले.तो क्षण माझ्यासाठी आयुष्यातील अविस्मरणीय क्षण होता आणि नेहमीच राहील!

पण नेहमीच मनामध्ये विचार येत होता की छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास कसा लोकांपर्यंत पोहोचविता येईल. त्यासाठी मी पुस्तक लिहिण्याचा निर्णय घेतला. जे पुस्तक अगदी संक्षिप्त रूपामध्ये असेल, पण ज्या लोकांना अजून छत्रपती संभाजी महाराजांची ओळख ही नाही किंवा इतिहास पूर्ण पणे माहीत नाही त्यांना खरे छत्रपती संभाजी महाराज कोण होते, कसे होते आणि त्यांचे स्वराज्य कार्य तसेच त्यांचे बलिदान सर्वसाधारण लोकांपर्यंत पोहोचेल. हा विचार घेऊनच हे पुस्तक मी लिहिले आहे आणि आशा करतो या पुस्तकात मधून स्वराज्याचे दुसरे छत्रपती शंभुराजे

सर्वसामान्यांपर्यंत आणि घराघरापर्यंत पोहोचतील यासाठी प्रत्येक शिवशंभूभक्तांनी प्रयत्न करावेत अपेक्षा!!!

**II जय जिजाऊ II जय शिवराय II जय शंभुराजे II**


**आपलाच**

**एक शिव शंभु भक्त**

**दिनेश महादेव जोगदंड,**

**सनराईज ऑनलाईन सर्व्हिसेस,**

**एस आर टी आर शासकीय रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय,**

**या पुस्तकाबाबात आपले अभिप्राय कळवा**

## श्री. दिनेश महादेव जोगदंड

**मोबाईल नं. ८९७५२४५१५२, ८२०८३०३७७८**

**ईमेल ; sunrise.dinesh2018@gmail.com**

**अंबाजोगाई – ४३१५१७ , जि. बीड**

**महाराष्ट्र**

**छत्रपती.... छत्रपती.... छत्रपती....** हे शब्द ऐकताच आपल्या डोळ्यासमोर उभी राहते ती घोड्यावरील चपळ आणि स्फूर्ती देणारी एक तेजस्वी मूर्ती ती म्हणजे आपल्या शिवरायांची!!! छत्रपती म्हणजे कोण हे सांगायची गरजच भासत नाही, कारण छत्रपती म्हणलं की आपोआप पुढे शब्द लागून येतात ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चं.....

त्यात काहीच दुमत नाही की छत्रपती म्हणजे माँसाहेब जिजाऊंचे आणि शहाजीराजांच्या स्वराज्याचे स्वप्न!! असे स्वराज्य जिथं रयत सुखी आणि भयमुक्त असलेले एक सुराज्य. जिथे प्रत्येक व्यक्ती सुख - समाधानाने रहाण्याचे एकमेव ठिकाण. जिथे घरातील प्रत्येक स्त्री सुरक्षित आहे. जिथे प्रत्येकाला फक्त न्याय च मिळतो. गोर गरीब शेतकऱ्यांच्या शेतातील भाजीचे देठ देखील जिथे सुरक्षित आहे असे ते स्वराज्य...

पण याच देखण्या स्वराज्याला छत्रपती शिवरायांप्रमाणेच राखण्यासाठी आणि फुलवण्यासाठी महाराजांच्या मृत्यूपश्चात त्यांचे पुत्र स्वराज्याचे दुसरे छत्रपती यांनी स्वतःच्या प्राणाची आहुती दिली. धर्म आणि राष्ट्र रक्षणासाठी बलिदान काय असते आणि कसे असते हे जगाला दाखवून

दिले. आपल्या जवळच्या माणसांकडून आणि या माणसांच्या स्वार्थी महत्त्वाकांक्षामुळे शंभू राजे औरंग्याच्या तावडीत सापडले आणि पुढे त्यांचे जे हाल झाले ते वाचून डोळ्यात पाणी आणि आग दोन्ही सोबत झळाळेल. तुळापूरच्या संगमावर औरंग्याला आपल्या शंभू राजास हलाल करावयाचे होते. संभाजी महाराजांची डोळे काढण्याच्या आदेश देण्यात आले आणि शंभुराजे चे तेजस्वी नेत्रकमले काढण्यासाठी हशम सरसावले. रांजणातून रवी जशी फिरवावी, तशा त्या तप्त - लालजर्द सळया शंभू राजांच्या डोळ्यातून फिरल्या. चर्र चर्र आवाज करीत चर्येवरील कातडी होरपळून गेली. सारी छावणी थरारली पण संभाजी महाराजांच्या मुखातून आक्रोशाची लकेरही उमटली नाही. यामुळे औरंगजेबाचा पारा मात्र जास्तच चढला. कवि कलशाचेही डोळे काढण्यात आले. बलिष्ठ शरीर यष्टीचा एक पठाण कविराजांच्या छातीवर बसला. दोघांनी त्यांचे पाय उसाचे कांडे पिळगटावे तसे मागे खेचले. दोघांनी आपल्या राकट हातांनी कविराजांची मुंडी धरली. त्या पठाणाने कविराजांच्या जबड्यात हात घातला. कविराजांचे मुख रक्ताने भरून गेले. त्या धटींगणाने कविराजांची जीभ हाताने बाहेर खसकन खेचली. एकाने ती वीतभर लांब बाहेर आलेली जीभ कट्यारीने खचकन छाटली. कविराजांच्या तोंडातून रक्ताचा डोंब उबळला. संभाजी महाराजांचीही जीव्हा अशीच छाटली गेली. पहाणाऱ्याचेही डोळे पांढरे पडले. असूरी आनंदाने

अवघी छावणी गर्जत होती. कवी कलशांवर होणारे अत्याचार ही जणू संभाजी महाराजांवर होणाऱ्या अत्याचारांची रंगीत तालीमच असायची. संध्याकाळ झाली. शंभू महादेव खांबास घट्ट बांधून ठेवलेले होते. स्वाभीमानाने तळपत झळकणाऱ्या तेजस्वी योग्यासारखे. ज्यांच्या तेजाने शेशनागही डळमळून जावा अशा तेजस्वी श्रीकृष्णासारखे. अविचल. अभेद्य ! आभाळात अभिमानाने मस्तक उंचावून बाणेदारपणे उभे असलेल्या रायगडाच्या टकमक टोकासारखे. दोन दैत्य पुढे सरसावले. एकाने पाठीच्या वरच्या मणक्यापासून आणि दुसऱ्याने समोरून गळयापासून शंभूराजांच्या अंगात वाघनख्या घुसवल्या. त्या राक्षसांना जोर चढावा म्हणून कुराणातील आयते वाचले जात होते. रण वाद्यांचा दणदणाट होत होता. "दीन दीन" "अल्लाहो अकबर" च्या घोषात राजांची त्वचा डाळिंबाच्या टरफला सारखी सोलली जात होती. जास्वंदीसारखा लाल बुंद देह यातनांनी तळमळत होता. रक्ता मासाच्या चिंध्या होत होत्या. संपूर्ण देहाची चाळणी झाल्यावर मग फरशा व खांडे पेलत दोन गाझी पुढे आले. त्या दोघांचेही हात पाय असे अवयव एक एक करून तोडून टाकले. एकाने खांड्याचे धारधार पाते संभाजी राजांच्या मानेत घुसवले. व हळू हळू कुराणातील आज्ञेप्रमाणे 'हलाल' करीत शिर चिरत धडावेगळे केले !!! ( तारखेप्रमाणे) मार्च ११, १६८९ रोजी संभाजीराजांची शिरच्छेद करून भीमा आणि इंद्रायणी नदीच्या संगमावरील तुळापूर येथे हत्या करण्यात आली.

आणि एवढ्यावरच न थांबता पुढे शंभू राजेंचे शीर टोकदार भाल्यावर रोवून ऐन गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशी आपल्या राजांच्या मस्तकांची गुढी पूर्ण गावात फिरवण्यात आली.

असा अंत आपल्या स्वराज्याच्या राजाचा, आपल्या स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींचा झाला.किती ते हाल आणि त्रास भोगले शंभू राजांनी आपल्या आबासाहेबांचे स्वराज्य राखण्यासाठी. मित्रांनो, अशा महापराक्रमी, तेजस्वी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी असा वेदनादायक अंत का झाला याचे उत्तर शोधण्यासाठी आपण त्यांचा पूर्ण जीवनप्रवास या पुस्तकातून जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

आता मी तुम्हाला संक्षिप्त रुपात आपल्या छत्रपती शिवरायांबद्दल सांगेल. ज्या गोष्टी आपण लहानपणापासून ऐकत, वाचत आलोच आहेत. शहाजीराजे हे शिवरायांच्या जन्मागोदर पासूनच वेगवेगळ्या शाही मध्ये रुजू होते. काही काळ त्यांनी आदिलशाही, निजामशाही व मुघलशाही मध्ये सुद्धा सरदार म्हणून रुजू होते. काही काळानंतर शहाजीराजे यांना बंगळूरला मुक्कामी जावे लागले. त्यामुळे त्यांनी व आऊसाहेब जिजाऊ यांनी मिळून पाहिलेले स्वप्न म्हणजेच स्वराज्याचे स्वप्न याची संपूर्ण जबाबदारी जिजाऊ आऊसाहेबांवर आली. पुणे सुपे ही शहाजी राजेंची

जहागीरदारी असल्याने येथूनच स्वराज्याची बीजे पेरण्याची सुरुवात आऊसाहेबांनी केली. तथापि, आदिलशाहीच्या हुकूमाने मुरार जगदेव ने अगोदरच इथे गाढवाचा नांगर फिरवून पुणे बेचिराख केले होते. आदिलशाहीचा सरदार पंडित मुरार जगदेव कुलकर्णी याने पुणे उजाड केले होते. त्याने

पुण्याच्या याच जमिनीवर गाढवाचा नांगर फिरवून जागोजागी पहारी रोवल्या. त्यावर तुटलेली चप्पल बांधून व फुटकी कवड्याची माळ अडकवून 'जो ही जमीन नांगरेल, तो निर्वंश होईल!' असा शाप दिला होता. त्याच जमिनीमध्ये आऊसाहेब जिजाऊनी त्या साहसी मातेने ही शापित भूमीमध्ये बालवयातच शिवबाच्या हाताने सोन्याचा फाळ लावलेल्या नांगराने नांगरली. आणि पुण्याला नवे सौंदर्य दिले. त्याचबरोबर पुणे शहर वसविले आणि स्वराज्याचा खरा पाया रोऊन नवीन सुराज्याची बीजे पेरली असे म्हणता येईल. पुढे आऊसाहेब जिजाऊंनी दिलेल्या संस्कार व मार्गदर्शनाने आपल्या महाराजांनी कित्येक किल्ले व जुलूमी शाह्यांचे प्रदेश जिंकून स्वराज्याचा झपाट्याने विस्तार केला त्याचबरोबर अनेक अजरामर अश्या लढाया आणि किस्से.

ज्यामध्ये प्रचंडगड किल्ला जिंकून त्याचे नाव तोरणा गड ठेऊन स्वराज्याचे तोरण बांधले, कोंढाणा, पुरंदर, राजगड या सारखे कित्येक किल्ले जिंकले आणि शेकडो किल्ले बांधणी, सुरतेची लुट, शाहिस्तेखानाची लालमहालात घुसून फजिती, अफजलखानचा वध, पन्हाळयाचा वेढा फोडून सुटका, पुरंदर ची लढाई व तह, आग्र्यातून औरंग्याच्या हातावर तुरी देऊन स्वराज्यात सुखरूप सुटका, आणि स्वराज्य विस्तारासाठी केलेला दक्षिण दिग्विजय अश्या कित्येक घटना आपण शिवरायांचे चरित्र वाचत असताना पाहत आणि ऐकत आलोच आहोत.

तसेच ना भूतो ना भविष्यम असे स्वराज्य निर्माण करून आपले राजे छत्रपती म्हणून ३२ मण सोन्याच्या सिहांसानावर आरूढ झालेला सुवर्णक्षण !! आपल्या छत्रपतींचा डोळे दिपवणारा स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगडवर पार पडलेला राज्याभिषेक सोहळा!

आणि अशाप्रकारे आपले शिवाजीराजे हे अभिषिक्त छत्रपती शिवाजी महाराज झाले.

येथे अजून एक गोष्ट नमूद करावी वाटते ती म्हणजे शहाजीराजे यांची दिव्य दुरदृष्टी काय असते याचे अद्वितीय उदाहरण म्हणजे शिवरायांची

राजमुद्रा. शहाजीराजे ना आपल्या पत्नी आणि शिवबांवर एवढा विश्वास होता की त्यांनी बंगळूर मध्ये असताना आणि स्वराज्याचे बीज फुलतच असताना शिवबा राजेंसाठी राजमुद्रा तयार करून घेतली. जी नंतर छत्रपतींच्या स्वराज्यात पत्रव्यवहार व राज्यकारभार चालविण्यासाठी ही राजमुद्रा वापरात आणली गेली.

शहाजीराजेंनी तयार केलेली शिवरायांची राजमुद्रा अशी होती:

**प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता।**
**साहसुनो शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते॥**

जिचा मराठी अर्थ होतो की,

प्रतिपदेचा चंद्र जसा कले कलेने वाढत जातो व साऱ्या विश्वात वंदनीय होतो, त्याप्रकारे शहाजींचा पुत्र शिवाजी महाराजांच्या मुद्रेचा लौकिक वाढत जाईल व ही राजमुद्रा फक्त लोकांच्या कल्याणासाठी चमकेल.

काय ती दुरदृष्टी शहाजीराजांची आणि माँसाहेब जिजाऊंची!!!

शहाजी पुत्र शिवरायांनी या राजमुद्रा प्रमाणेच स्वराज्याची सीमा

प्रतिपदेच्या चंद्राप्रमाने वाढवून विश्व वंदनीय केली.आणि आपले संपूर्ण आयुष्य लोककल्याणासाठी, आपल्या रयतेसाठीच झोकून दिले.

मित्रांनो,

शिवचरित्र सांगण्यासाठी माझी लेखणी आणि पाने कमी पडतील तेवढं मोठ कर्तुत्व आहेच आपल्या राजांचे. पण शक्य होईल तेव्हढ्या संक्षिप्त पद्धतीने छत्रपतींची ओळख मी तुम्हाला करून दिली आहे. पण मी हे पुस्तक का लिहत आहे याची पार्श्वभूमी मांडणे ही तेवढं च गरजेचं आहे.

आज आपण छत्रपती शिवाजी महाराज म्हणलं की जय म्हणतोच. जेव्हा जेव्हा शिवरायांची मूर्ती, पुतळा किंवा फोटो आपण पाहतो एवढच काय आपण साधं छत्रपती शिवरायांच फक्त नाव जरी उच्चारतो तेव्हा एक ऊर्जा, स्फूर्ती मिळते व आपल्या धमण्यामध्ये सळसळते ते रक्त आणि एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आपल्या समोर तर येतेच पण.....

त्याच शूर, पराक्रमी, निस्वार्थी आणि रयतेलाच आपले सर्वस्व मानून, रयतेच्या भाजीच्या देठाला ही धक्का ना लागू देणाऱ्या व गोरगरीब रयतेला लहान मुलाप्रमाणे जपणाऱ्या त्याच राजांच्या पुत्राचा त्याच आपल्या शिवरायांच्या लेकराचा म्हणजे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज ( शंभुराजे)

यांचा एवढा हृदय पिळवटून टाकणारा नि काळजात चर्रर्र करणारा असा अंत का आणि कशासाठी ???

कोणत्या गुन्ह्याची ही शिक्षा होती शंभूराजेंना?? कोणामुळे ही दयनीय अवस्था त्या शिवपुत्राची?? वयाच्या अवघ्या 32 व्या वर्षी फक्त आपल्या जिजाऊ साहेबांच्या - शिव छत्रपती आबासाहेबांच्या विचारातील रयतेच्या स्वराज्यासाठी का मरण यातना त्यांनी भोगल्या?? का आज आपण विसरून गेलो या शिव-छाव्याच्या पराक्रमाला त्यांच्या बलिदानाला ?? कोण होते सिंहाचा छावा शिवपुत्र शंभूराजे?? छत्रपतींच्या त्या सावलीला, त्या प्रतिबिंबाला का आज हा स्वार्थी समाज विसरून गेलाय?? छत्रपतींच्या गादीचे धाकले धनी असून का छत्रपती संभाजी महाराज होय छत्रपती च असून ही त्यांना काळाच्या पडाद्याआड का विसरत गेली ही युवा पिढी??

शिवजयंती आज जगभरात साजरी होते. जल्लोषात उत्साहात शिवजयंती आपण काढून आपल्या राजांच्या कीर्तीला जगासमोर आणतो पण स्वराज्याच्या धाकल्या धन्याची म्हणजेच स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींची कीर्ती, शौर्य आणि पराक्रम जगाला दाखवून देण्यास आपण का कमी पडलो?? आपल्या शंभूराजांची जयंती का आज माहिती सुद्धा नाही या भरकटलेल्या युवा पिढी ला???

अशा अनेक प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी या लेखनाचा सगळा खटाटोप

!!!

जसे की आपण जाणतोच की शिवरायांची ८ लग्न झाली होती. आऊसाहेब जिजाऊंच्या आदेशावरून महाराजांनी ही सर्व लग्न केली होती. ज्याचे कारण असे की स्वराज्य वाढवायचं असेल तर पाठबळ लागणार आणि त्यासाठी आसपासचे सुपे परगणे आणि जवळचे मुलुख काबिज करून त्यांना स्वराज्यात सामील करून घेणे गरजेचे होते आणि त्यावेळचे मातब्बर सरदार सोबत घेण्यासाठी त्यांच्याशी नातेसंबंध जोडणे गरजेचे होते जेणेकरून ते खंबीरपणे आपल्या सोबत उभे राहतील म्हणून महाराजांनी ही लग्न केली आणि निंबाळकर ,मोहिते, पालकर, जाधवराव, विचारे, गायकवाड, इंगळे, शिर्के अशा त्या काळच्या मातब्बर सरदारांना सोबत घेऊन लग्न संबंध प्रस्तापित करून स्वराज्य विस्तार करण्यास सुरुवात केली. त्यामध्ये सईबाई निंबाळकर, सोयराबाई मोहिते, पुतळाबाई पालकर, सगुणाबाई शिर्के, सकवारबाई गायकवाड, लक्ष्मीबाई विचारे, काशीबाई जाधवराव, गुणवंतबाई इंगळे अशा शिवरायांच्या 8 पत्नीचे नाव होती.

त्यापैकीच सईबाई या फलटणच्या निंबाळकर घराण्यातील मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या सुपुत्री होत्या. सईबाई यांना तलवार बाजीची आवड होती आणि त्या धाडसी स्वभावाच्या होत्या. सईबाई यांचा विवाह

शिवरायांशी लालमहाल येथे १६ मे १६४० रोजी झाला. त्यावेळी शिवरायांचं वय ११ वर्षे तर सईबाईंचे वय ७ वर्षे होते. त्या महाराजांच्या प्रथम पत्नी होत्या. सईबाई सदैव शिवरायांच्या स्वराज्यासाठी तत्पर असायचा आणि शूर ही तेवढ्याच होत्या आणि अशा मातेच्या पोटी जन्म झाला एका धाडसी, शूर आणि बेधडक असे तेजस्वी रत्न बाळराजे म्हणजेच आपल्या रौद्र शंभूराजांचा !!! सईबाई राणीसाहेब यांनी वयाच्या २४व्या वर्षी १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे शंभुराजेना जन्म दिला. त्यानंतर सईबाई यांना दुर्धर आजाराने (बाळंत व्याधी) ग्रासले आणि ते तान्हे बाळ शंभूराजे आईच्या दुधापासून हि वंचित राहू लागले. यासाठी आऊसाहेबांनी शंभूराजेसाठी दुधआई म्हणून पुरंदर च्या पायाथ्याशी असलेले कापूरहोळ गावची धाराऊ ची निवड केली.




कुलवंत गाडे पाटील घराण्यातील (गाडे पाटलाची सून) धाराऊ माता यांनी देखील बाळाला जन्म दिला होता. तान्ह्या शंभू राजास या गाडे

कुटुंबातील धाराऊ या मातेने दूध पाजले. महाराष्ट्रातील इतिहासात धाराऊ मातेस विशेष महत्त्व आहे. त्यांनतर शंभुराजे अवघे 2 वर्षाचे असतानाच सईबाई दुर्धर आजारपणामुळे त्यांचे दुर्दैवी निधन झाले व शंभुराजे वरून एक मायेचे छत्र हरवले. लहानपणापासूनच त्यांच्यामागे काळ या प्रमाणे लागला की अवघ्या 2 वर्षाचे असताना आईचे - मायेचे छत्र निघून गेले व संघर्षाची सुरुवात येथूनच झाली असे आपण म्हणू शकतो!

शिवरायांना स्वराज्य बांधणी साठी वर्षोनुवर्षे दूर राहावे लागत असे. मोहिमा, लढाया, आक्रमणे, संकटे अशा अनेक गोष्टी या बाप - लेकांच्या मध्ये तेव्हापासूनच येत गेल्या. लहानपणापासुन या लहान जीवाला बापाच्या सावली पासून दूर रहावे लागत असे . पण जेव्हा जेव्हा महाराज गडावर असायचे नेहमी शंभुराजे सोबत वेळ घालवायचे आणि शंभुराजे ही तितक्याच आत्मीयतेने आवर्जून आपल्या आबासाहेबांची वाट पाहत असे .राजमाता आऊसाहेब जिजाऊ ज्यांनी शिवबा सारखे रत्न निपजले होते त्यांचावर अजून एका शिव छाव्याची जबाबदारी आली होती आणि ती आऊसाहेबांनी लीलया पेलवली. ज्या मातेने शिवरायांना जन्म देऊन त्यांच्या करवी स्वराज्य निर्माण करून मराठी मुलुखाचे छत्रपती म्हणून सिंहासनावर आरूढ केले. त्याच जिजाऊ आऊसाहेबांच्या विचार आणि संस्कारांच्या छत्र-छायेमध्ये

आता शंभूराजे पराक्रमाचे धडे घेत होते. आऊसाहेब जिजाऊंच्या नजरेसमोर जणू काही प्रतीशिवाजीचं उभे आहेत असे शंभुराजे भासू लागले. त्यांच्या प्रत्येक छवी मध्ये त्यांच्या गुणांमध्ये आऊसाहेबांना शिवबा दिसायचे. शंभुराजे लहानपणापासूनच धाडसी आणि छाव्याप्रमाने चपळ आणि तेजस्वी होते आणि असणार ही का नाही शिव-सिंहाचा छावाच होते ते !!

बालपणी शंभुराजे यांना पुतळाबाई, सोयराबाई, ई. अशा इतर आईपासून ही खूप प्रेम जिव्हाळा मिळाला. तसेच धाराऊच्या मायेने आणि जिव्हाळयाने शंभूराजेंचे बालपण जाऊ लागले. बाळाचे पाय जसे पाळण्यात दिसतात त्याप्रमाणे शंभूराजे त्यांचे पराक्रम दाखवू लागले. तलवारबाजी, घोडेस्वारी, शस्त्रागारात जाऊन वेगवेगळया हत्यारांचे धडे घेणे, मावळयांच्या तलिमीत जाऊन कुस्ती खेळणे ई. साहसी कौशल्य त्यांनी लहानपणापासूनच अवगत केले. जिजाऊंनी शिवबासारखेच संस्काराचे धडे शंभूराजांना दिले. शास्त्र आणि शस्त्र असे दोन्ही मध्ये शंभुराजे पारंगत होत गेले. इथे मला एक शोकांतिका वाटते की, आजकाल आपण अशा काळामध्ये राहत आहोत की जिथे ही शस्त्र-शास्त्र विद्या तर सोडाच पण आजकालच्या पालकाची धडपड व स्पर्धा होत चालली आहे ती इंग्लिश माध्यमाच्या शाळेमध्ये प्रवेश घेण्याची!!! ज्या लहान वयात बालमनावर आपली संस्कृती, आपली भाषा, मराठी

अस्मिता समजण्याची आणि मायबोली तून व्यक्त होण्याची गरज असते त्या वयातच त्याला आपण इंग्रजी सोबतच आता जर्मनी,फ्रेंच ई. सारख्या परकीय भाषा शिकवतो आणि तीच गोष्ट आप्तेष्टांमध्ये तेवढ्याच मानाने मिरवतो. इंग्रजी भाषा येणे काळाची गरज आहेच यात काहीच शंका नाही. पण आपण जर आज खेड्या- पाड्यातील जिल्हा परिषद शाळा जाऊन पहिले तर अगदी ओसाड होत चालल्या आहेत. अक्षरशः काही शाळांना कुलुपे घालायची वेळ आली आहे. आणि शहरी भागामधून आता इंग्रजी शाळा खेड्या-पाड्यामध्ये हि पोहोचल्या आहेत. माझा इंग्रजी शाळेला विरोध मुळीच नाही, पण तुम्ही इंग्रजी भाषेला मराठी पेक्षा श्रेष्ठ दर्जा देण्याची धडपड जी सुरु आहे त्याला विरोध आहे.इथे मला एक  प्रश्न पडतो कि, का आणि कशासाठी त्या बालमनावर मायबोली सोडून या परकीय भाषांचा बोझवारा?? आई या शब्दामध्ये जी आत्मियता, जिव्हाळा आणि माया आहे, ती आता जागा मम्मी, मॉम, मम्मा ई. हे शब्द कधी घेऊ शकतील का?? असो त्यावर मला इथे जास्त खोलवर जायचं नाही.

आपण पुढे जाऊ, शंभूराजे बालपणापासूनच खूप चतुर आणि चपळ होते. जिजाऊसाहेबांनी विविध धर्मपंडिताकडून शंभूराजेंना धर्मशास्त्र आणि महाराजांच्या सैन्यातील मातब्बर अशा सरदारांकडून शस्त्रविद्या या दोन्हीचे शिक्षण तर दिलेच पण त्याचबरोबर मान , मर्यादा , स्त्री-सम्मान, शेतकऱ्यांचे

प्रश्न, गोर गरिबांचे हाल व प्रश्न, स्वराज्यातील येणारी संकटे, खटले आणि न्याय व्यवस्था अशा अनेक गोष्टींची शंभूराजेंच्या मनावर आणि विचारावर छाप पाडली. स्वराज्यातील प्रत्येक स्त्री हि माय- माऊली- बहिणी प्रमाणे मानून तिची रक्षा करणे आणि सम्मान करणे हि आपली प्रथम जबाबदारी तसेच प्रथम कर्तव्य आहे. हे बाळकडू शिवरायांप्रमाणे आऊसाहेबांनी शंभूराजेंना पाजले.

मित्रांनो, आजकाल समाजामध्ये आसपास पाहताना अस वाटत कि, आज प्रत्येक घरांमध्ये जिजाऊ आऊसाहेबांची हि शिकवण सर्वात गरजेची आहे. समाजातील मुलींना सुरक्षित ठेवण्यासाठी आऊसाहेबांचे हे बाळकडू आपण आपल्या मुलांना देणे सर्व प्रथम काळाची गरज आहे. त्याचबरोबर मुलींना आपली संस्कृती आणि सौंदर्य जपायचे असेल तर आजकाल मुली ज्या पाश्चिमात्य पोशाखाने पार जखडून गेल्या आहेत त्याला हि कुठे तरी आळा घालणे हि तेवढच गरजेच आहे. शिव - विचार नेहमी आपल्या मना - मनात रुजविणे हीच तर खरी शिव भक्ती आहे ना!

स्त्री - मुलींना सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व मातांना एक विनंती आहे की आपल्या मुलांना स्त्री जातीचा आदर आणि सन्मान देण्याचे संस्कार तर केलेच पाहिजेत त्याच बरोबर मुलींना ही राहणीमान व शृंगारासोबत स्वयं रक्षणाचे ही धडे द्यावे. शिव - शंभू चे संस्कार आपल्या मुलांमध्ये येण्यासाठी अगोदर

आपल्याला जिजाऊ व्हावे लागेल, हे सर्व मातांनी लक्षात घेतले पाहिजे. तरच देश आणि देशातील मुली - स्त्रिया सुरक्षित राहतील.

पुढे शंभुराजेंना संस्काराचे धडे मिळू लागले आणि शंभुराजे आऊसाहेबांसोबत सदरेवर न्याय निवाडे पाहण्यास येऊ लागले किंबहुना आऊसाहेब त्यांना जाणीवपूर्वक सदरेवर घेऊन येत असे. आऊसाहेब गोर - गरीब रयतेचे प्रश्न अडचणी निवाडे सोडवीत असताना शंभुराजे हे काय चूक काय बरोबर आऊसाहेब काय न्याय करतात हे सर्व बारकाईने निरक्षण करू लागले.आणि त्यातून आपल्या पित्याप्रमाणे रयतेच्या अडचणी समजून घेऊन न्याय निवड्यामध्ये सहभाग घेऊ लागले. आऊसाहेब ही त्यांना छोट्या - मोठ्या निवाडे शंभूराजेंवर सोपऊन देऊन जणू त्यांची परीक्षा घेत होते आणि शंभुराजे उत्तम रित्या कोणावर अन्याय होणार नाही असा न्याय देऊन निवडा मार्गी लावू लागले. हे पाहून सर्व रयतेमध्ये ही शंभूराजेबद्दल विश्वास वाढू लागला. न्यायासाठी रयत शंभू राजेंवर आस लावून बसू लागले. आणि शंभुराजे सदरेवर आता न्याय - निवाडे करण्यात ही पारंगत होत गेले. संस्काराचे तेजस्वी आणि अथांग सागराप्रमाणे भव्य असे विद्यापीठ म्हणजे आऊसाहेब जिजाऊ!! कोटी कोटी प्रणाम त्या मातेस जिने या भुमिमध्ये दोन छत्रपतींना दिलेल्या संस्कारामुळे हे हिंदवी स्वराज्य उभा राहिले!!! अशाप्रकारे शंभूराजेंचे शस्त्र - शास्त्र आणि राजकीय प्रशिक्षण होत गेले. महाराज गडावर

असल्यास ही सैन्याच्या गोष्टी आणि निवाडे या मध्ये महाराज शंभुराजे यांना सहभागी करू लागले. त्यांना सैन्याचे नेतृत्व करण्याचा अनुभव यावा साठी त्यांना छत्रपती शिवाजी महाराज काही आघाडी वर सोबत नेत किंवा पाच हजार सैन्याचे नेतृत्त्व त्यांना देत असतं अशा ही काही नोंदी बखरी मध्ये आहेत.अतिशय काटेकोरपणे शंभूराजेंची जडणघडण सुरू होती. या काळात गडावर होळीचा सण मोठ्या उत्साहात होत असे. होळी पेटवून त्यामध्ये नारळ टाकला जायचा आणि पेटत्या होळीतून नारळ काढण्याची स्पर्धा होत आणि विजेत्याला महाराज आपल्या हातातील सोन्याचे कडे बक्षीस द्यायचे. सर्व मावळे सरदार यात सहभागी होत असे. यामध्येही शंभुराजे यांनी तो नारळ काढण्याचा मान मिळविला.आणि हे पाहून सर्व मावळ्यासहित छत्रपती शिवाजी महाराज ही भारावून गेले. अगदी शूर आबांचे शूर छावा असल्यासम शंभुराजे भासत असतं. शौर्याचे आणि पराक्रमाचे धडे घेत शंभुराजे निपुण होत गेले.

सर्व काही सुमंगल चालू असताना काळाचा घाला शिवराय आणि आऊसाहेबांवर झाला दक्षिणेतून खबर आली की, महाराजसाहेब शहाजीराजे शिकारीसाठी गेले असता घोड्याचा पाय दगडाला लागून शहाजीराजे कोसळले आणि या अपघातामध्ये शहाजीराजे अनंतात विलीन झाले. अशी वाईट बातमी राजगडावर आली..काळ्याकुट्ट ढगांनी दाटलेल्या काळोखात

जस कडाडून, सळसळीत अशी जोरदार वीज चमकून काळजात धस्स व्हावं असं जिजाऊंच्या काळजात झाले आणि एकाकी सर्व संपले की काय असे जणू जिजाऊंना वाटू लागले. एवढी वर्षे एकमेकाची ताटातूट तर काळाने केलीच होती पण स्वराज्य हिंदवी राज्य या दोन जीवांचे एक स्वप्न म्हणून दोघांनी सर्वस्व अर्पण करून विभक्त राहिले.मनामध्ये वणवा पेटल्याप्रमाणे आऊसाहेबांच्या शरीराची लाही लाही होऊ लागली सगळे त्यागून आपण ही आपल्या महाराज साहेबांच्या देखरेखीसाठी त्यांचा पाठी जावं एवढच त्यांना वाटू लागलं. राजगड पूर्णपणे सुन्न पडला होता. आऊसाहेबांनी सतीच्या विचाराने निरोप घेण्याचा निर्णय घेतला सर्व राणीसाहेब, धाराऊ, लेकी-बाळी जिजाऊंना अडविण्यासाठी तळमळ करू लागल्या. शिवरायांना तर आऊसाहेबांना अशा अवस्थेमध्ये बघणे सुद्धा अशक्य वाटू लागले. क्षणात सर्व संपून गेल्यासम राजे ही बेभान झाले होते. पण आऊसाहेबांच्या सती जाण्याच्या निर्णयाने ते पुरते भानावर येऊन जिजाऊंना विनवणी करू लागले. हाथ जोडून, आऊसाहेबांच्या पाया पडू लागले त्यांना अनेक भावना आणि शपथ - वचनांमध्ये अडकविण्याचा केविलवाणा प्रयत्न महाराज करू लागले होते . पण जिजाऊंना दिसत होते ते फक्त पाठमोरी करून जात असलेले महाराजसाहेब शहाजीराजे आणि आम्हास जायचे आहे ते त्यांच्या सेवेसाठी!! आता फक्त शंभुराजे, इवलेसे बाळ ते आऊसाहेबांना रोखण्याचा शेवटचा

प्रयत्न राहिला होता. आणि शंभुराजे येऊन आऊसाहेबांच्या पायाला बिलगले पाण्याने भरलेले डोळे सुकलेले इवलेसे ओठ घेऊन टाहो फोडू लागले." आऊसाहेब नका ना जाऊ!!" "आम्हाला सोडून तुम्ही ही गेल्यास आम्ही आऊसाहेब कोणा म्हणावे?? आमच्या आऊसाहेब ही आम्हाला सोडून गेले आणि आता तुम्ही ही जाणार तर आम्ही कोणाच्या कुशीत जावं??

आऊसाहेब बाळ शंभु राजेंची समजूत घालू लागले . "महाराजसाहेबांना भेटण्यास आम्ही निघालो आम्हास अडऊ नका!! त्यांची सेवा हेच आमचं कर्तव्य आहे." तेव्हा शंभुराजे डोळे पुसत आणि स्वतःला सावरून म्हणाले, "आऊसाहेब जर तुम्हाला सती जाऊन महाराज साहेब भेटणार असतील तर आम्ही ही येतो तुमच्या सोबत तिथे आम्हाला ही आमच्या आऊसाहेब भेटतीलच की?" शंभू राजेंचे हे शब्द ऐकताच सर्वांच्या नजर ताडकन आऊसाहेब आणि शंभुराजे कडे खिळल्या. जणू आकाशवाणी झाल्याप्रमाणे शंभू राजेंचे शब्द सर्वांच्या कानातून सर्रकन जाऊन काळजाला भिडले आणि भयाण शांतता पसरली. आऊसाहेब ज्या आतापर्यंत कोणाकडे ही ना बघता एकटक फक्त राजदरवाजा कडे पाहून फक्त पुढे जात होत्या त्यांचे पाऊल घट्ट जमिनीत रोवले गेले आणि त्यांची नजर शंभूराजेंवर टाकून त्यांना दोन्ही हाताने आपल्या मिठीने आवळून घेऊन आसवांच्या धारा त्यांचा डोळ्यातून वाहू लागल्या आणि शंभू बाळा!! लेकरा !!! म्हणून रडू लागल्या.

अचानक त्या सावरून आतापर्यंत आपल्या आसपास काय सुरू होते यांचे भान विसरून गेलेले आऊसाहेब जणू भानावर आल्या होत्या. आणि सर्वांनी सुटकेचा मोकळा निःश्वास सोडला. आऊसाहेबांनी सतीचा विचार त्या क्षणी मनातून काढून जणू राजगडाच्या बुरुजाहून आणि सह्याद्रीच्या घनदाट झाडीमध्ये दूर फेकून दिल्याप्रमाणे मुक्त झाल्या. आणि सर्व सदर दरबार, राणीवसा डोळ्यात आसव आणि चेहऱ्यावर हास्य घेऊन एकटक त्या आजी आणि नातवाकड पाहतच राहिले. आणि बाजूला असलेले शिवराय आपल्या पूत्राकडे पाहून मनोमन अभिमानानं फुलून गेले होते.त्यांच्या मनावरील आतापर्यंत चे जड झालेले ओझे जणू बाळ राजेंनी अलगद उचलून त्यांचं मन हलकं करून टाकलंय की काय असे राजेंना भासू लागले होते. आणि शिवरायांनी हात छातीवरच्या कवड्यच्या माळेवर हाथ ठेऊन कार्यपूर्तीचे शब्द ओठांवर आले..जगदंब... जगदंब !!!

राजगडावर दिवस सरत गेले, पण आऊसाहेब पूर्वीप्रमाणे बोलते राहिले नाही त्यांना अन्न ही गोड लागेना सदरेवर ही येऊ वाटेना आणि आऊसाहेबांना असे पाहून शिवराय ही मनोमन खचले जाऊ लागले. आणि राजेंनी बेत आखला आऊसाहेबांच्या मनात सुरू असलेल्या कल्लोळात त्यांना अडकू न देता त्यांना आपल्या बाळराजेंच्या लग्नघाई मध्ये गुंतवण्याचा!! शंभू राजेंचे लग्न आयोजित करावे जेणे करून आऊसाहेब

आपल्या नातवाच्या लग्न कार्यात विलीन होऊन सर्व सरबराई करून घेतील. गडावर लोकांची ये-जा होईल आणि मंगलमय वातावरणात आऊसाहेब सरत्या दुःखातून सावरून आपल्या नातवाच्या लग्न सोहळ्यामध्ये मन रमावतील. आणि शिवरायांनी शंभुराजे साठी आणि स्वराज्याची भावी महाराणी कशी असेल हे सर्व गुण हेरून कोकणातील शृंगारपूरचे पिलाजीराव शिर्के यांची सुपुत्री 'राजाऊ' अगोदरच शोधून ठेवली होती.'राजाऊ' म्हणजेच येसूबाई लहानपणापासून च ती पोरं स्वराज्य आणि शिवाजीराजे या २ शब्दानं पुरती पेटून उठायची. वडील सरदार पिलाजी राजे कडून आणि मावळातून सर्वांच्या तोंडी शिवरायांचे पराक्रम आणि आऊसाहेबांची शिकवण जिद्द,संस्कार या सर्व गोष्टीं ऐकून येसूबाई वर जणू भुरळ च पडली होती. स्वराज्य म्हणजे या जुलमी आणि कपटी शाहींच्या काळजात घातलेला खोलवरचा घाव होता.स्वराज्याचा हाच विचार येसूबाई करायच्या. त्यामुळे आऊसाहेब जिजाऊ आणि शिवरायांना देव्हाऱ्यात असलेल्या देवासारखे पुजत असे.येसूबाईंची स्वराज्य निष्ठा आणि प्रेम शिवरायांनी हेरून त्यांना स्वराज्याच्या भावी राणीसाहेब आणि शंभू राजेंच्या अर्धांगिनी म्हणून राजगडी आणायचे मनात पक्के केले. पिलाजीराव सहकुटुंब राजाऊ ला घेऊन राजगडावर आले आणि प्रत्यक्ष बोलणी करून महाराजांनी स्वतः पिलाजी रावांना लग्नाची मागणी घातली तसेच आपली लेक राजकुंवर यांना पिलाजी

रावांचे पुत्र गणोजी शिर्के सोबत लग्न करून देण्यासाठी असे साटेलोटे करण्याची इच्छा दर्शवली आणि ती पिलाजी रावांनी हसतमुख व कृतकृत्य होऊन स्वीकारली.आणि अशाप्रकारे शंभू राजांच्या लग्नाचे मंगलमय वारे गडावर वाहू लागले. सनई चौघडे , लग्न सराई,गाव गड सगळा गडावर वावरू लागला. लग्नाच्या लगाबगी मध्ये प्रत्येक बाई, लेकी,मावळे, पंत सर्व आपआपली कामे आणि जबाबदाऱ्या घेऊ लागली. अत्यंत देखणे आणि थाटामाटात शंभुराजे आणि राजाऊ दोघांच्या लग्नाचा मुहूर्त आला आणि मांडव सजला गडावर अतिशय मंगलमय वातावरण निर्माण झाले. राजे लग्नासाठी २-३ महिने गडावर च होते कोणतीही मोहीम ना काढता. सर्व राणीवसा लग्न घाई मध्ये अतिशय उत्साहाने आपआपली कर्तव्य निभावत होते.जिजाऊ आऊसाहेबांच्या अख्तियार आणि मार्गदर्शनाने सर्व काही होत होते. आऊसाहेब शंभू राजेंना पाहून भारावून गेल्या. थोरले महाराज साहेबांच्या आठवणी ने त्यांचे डोळे कधी पाणावायचे त्यांना ही भान नसे. अस म्हणतात आऊसाहेबांना नेहमी शंभू राजेंमध्ये शहाजी राजेंची प्रतिमा दिसायची.शंभूराजे नाकी डोळी आणि रंग रूपामध्ये हुबेहूब शहाजी राजे सारखे दिसायचे आणि नेहमी आऊसाहेब शंभुराजे ना पाहून हरवून जायचा ही आणि सावरायच्या ही.सर्व विधी प्रमाणे लग्न लागले वाजनारी सनई चौघडे आणि नगाऱ्याच्या अतिशय मधुर संगीतामध्ये लग्नसोहळा पार पडला आणि

वऱ्हाडी मंडळ आणि गडावरील सर्वांनी उत्कृष्ट आणि रुचकर अशा मेजवानीचा आस्वाद घेतला.तृप्त आणि संतुष्ट करून उल्हसित करणारा असा शंभुराजे आणि राजाऊ ( येसूबाई) यांचा विवाह संपन्न झाला. सर्व थोर मोठे सरदार पै - पाहुण्यांचा या वधु - वराने आशीर्वाद घेतले. राजेंनी शंभू राजेंना डोळे भरून पाहिले आणि मुंडवळे बांधलेल्या कपाळावर आपले ओठ टेकवले आणि नवीन जोडप्याच्या खांद्यावर थाप देऊन भावी वाटचालीसाठी मनातून शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर डोळेभरून दोघांना पाहून राजेंना आठवण झाली ती सईबाईंची !!! सई बाईंनी जबाबदारीने शंभू राजांचा हाथ राजेंच्या हातात देऊन सईबाई राजेंना म्हणाल्या होत्या, " आमचे शंभूबाळ... एकला जीव. आज स्वारींच्या पदरी घातला! आता स्वारीच त्यांचे आऊ आणि आबा! हे एवढंच आमचं मागणं." आज आशीर्वाद देताना राजेंना सईबाईंचे हे शब्द शब्द आठवू लागले आणि क्षणभर राजे हरवल्यासारखे नवरदेव आणि राजाऊ कडे बघताना राजांच्या मनात विचार येऊन गेला, "सई, एकला जीव म्हणून बाळ राजांना आमच्या हवाली करताना, ना तुमच्या ध्यानीमनी आले ना आमच्या की, एकट्या जीवाचा पायमाग घेत आणखी ऋणानुबंध असलेले जीव यायचे असतात!!! आता यांना मणभर उदंड आशीर्वाद द्या!!!" जेवढ्या हलक्या हाताने राजे छातीवरच्या कवड्यांना कुरवाळीत आले होते तेवढ्याच हलक्या हातानी दोघांचे खांदे थोपटले.

आता नव वर - वधु आऊसाहेब जिजाऊंच्या समोर येऊन उभे राहिले आणि नव वधूचे नाव काय ठेवायचे अशी चर्चा सुरू झाली आणि जिजाऊ म्हणाल्या ' 'यशोदा' ठेवा. भरल्या डोळ्यांनी जिजाऊ आपला लग्णसाज घेतलेल्या बाळ राजेंना बघतच राहिल्या. शंभुराजे आणि राजऊनी आऊसाहेबांच्या पायावर मस्तक ठेऊन आशीर्वाद घेतले जिजाऊंनी शंभू राजेंना पोटाशी बोलावले आणि नव वधूला जवळ घेऊन दोन्ही हाताने हनुवटीला वर करून मायेने म्हणाल्या , ' येसू... ' राजाऊ आऊसाहेबांच्या डोळ्यात पाहीले, केवढी ती माया त्यांना जिजाऊंच्या शांत डोळ्यात दिसत होती. शिर्क्यांच्या राजस राजाऊ आता भोसलेंच्या यशवंत ' यशोदा ' झाल्या होत्या.जिजाऊ साहेबांनी मायेने ' येसु ' म्हणून हाक घालताच यशोदेच्या ' येसूबाई ' झाल्या. अशाप्रकारे शंभुराजे आणि येसूबाई एका अतूट अशा लग्न बंधनात अडकले आणि नवीन आयुष्याची सुरुवात या जोडप्याचे सुरू झाले. शंभु राजेंना आऊसाहेब जिजाऊ व शिवराय नंतर जर कोणी जाणून - समजून घेतले असेल तर ते फक्त येसूबाईंनी!! इथे एक नमूद करावं वाटत की शंभुराजे आयुष्यातील संघर्ष आणि वेदना मध्ये जेव्हा कधी गुंतून जायचे तेव्हा येसूबाई त्यांना पावलो पावली साथ द्यायचा.शंभू - येशू ही जोडी म्हणजे सदैव अतूट प्रेम आणि निखळ विश्वासाचे नाते!!

( श्री सखी राज्ञी जयति )

आता शंभुराजे गडावरील सदरेवर न्याय निवाड्याच्या कामात आऊसाहेब सोबत लक्ष देऊ लागले होते.त्याच बरोबर शंभुराजे हे वेगवेगळ्या भाषेचं ज्ञान प्राप्त करून घेऊ लागले त्यांना मराठी,संस्कृत, हिंदी, फारशी, उर्दू ई. अशा एकूण १२ ते १६ भाषा अवगत झाल्या होत्या. संस्कृत मध्ये शंभुराजे काव्य ही करू लागले.साहित्य आणि काव्य वाचून त्यामध्ये शंभुराजे स्वतः काव्य रचू लागले. शस्त्रा सोबतच शास्त्रात ही पारंगत होत चालले. आणि गडावरील राजकीय डावपेच आणि न्याय निवाडे ही सोडऊ लागले. शिवरायांच्या मोहिमेच्या खलबतखान्यामधील मसलती मध्ये ही शंभुराजे सहभागी होऊ लागले.

शंभु राजेंचा राजकारणामध्ये प्रत्यक्ष प्रवेश झाला तो मिर्झाराजे जयसिंग स्वराज्यावर चालून आल्यानंतर!! औरंगजेबाने स्वराज्यावर सर्व हातखंडे वापरून झाल्यास हुशार व राजकारणी मिर्झाराजे जयसिंग यांना पठाण दिलेर खान यास पाठवले आणि दोघांनी स्वराज्यात दहशत माजवली आणि मोठ्या फौजेनिशी किल्ले पुरंदरला वेढा देऊन मोठे संकट स्वराज्यापुढे उभे राहिले. सर्व ते प्रयत्न करून शेवटी महाराजांनी नाईलाजाने तह करण्याचा निर्णय घेतला. यावेळी शंभु राजेंचे वय अवघे 8 वर्ष असावेत.या तहामध्ये

ठरल्याप्रमाणे 23 किल्ले मिर्झा राजेंना हस्तांतर करेपर्यंत महाराजांनी शंभुराजे यांना ओलीस ठेवावे अशी अट मिर्झा राजेंनी शिवरायांपुढे ठेवली आणि इथे शंभुराजे यांचा खरा राजकीय प्रवेश झाला. शिवरायांनी सर्व डावपेच शंभु राजेना सांगून तिथे ठेवले होते.शंभुराजे मुघलांच्या छावणीत ही आपले शौर्य आणि पराक्रम वेळोवेळी दाखवत असतं. दिलेरखान सोबत बरेच वेळा शंभू राजांचा वाद होत असे. पण शंभू राजेंचे तेज आणि हुशारी मिर्झा राजांना भुरळ घालत होती. प्रत्येक वेळी शंभू राजे आपले ज्ञान आणि कौशल्याच्या जोरावर दिलेरखान ला त्याचा छावणीत राहून धूळ चारत असे. शंभू राजांच्या ज्ञानाची प्रचिती मिर्झा राजांना आली होती. काही काळ लोटल्यानंतर याच दरम्यान शिवरायांना पाच हजारी व शंभू राजेना सात हजार मनसबदारी मुघलशाहीकडून देण्यात आली. धूर्त राजकारण करणाऱ्या औरंगजेबाच्या मनात यावेळी वेगळेच खलबत सुरू होते .आणि त्यांनतर बादशहाच्या वाढदिवसानिमित्त सर्व मनसबदार आग्र्यास भेटी येणे असे फर्मान दिल्लीहून आले. सर्वात कठीण पेच महाराजांसमोर उभा राहिला. मिर्झा राजे जयसिंग ने महाराजांच्या सुरक्षितेची हमी दिली व आम्ही तुम्हास संरक्षण देऊ असे बेलभंडारा उचलून शपथ घेऊन राजांना दिल्ली जाण्यास तयार केले. बालवयातील शंभूराजांनी राजकारणातील बारकावे भराभर आत्मसात केले होते. मुघल दरबारातील घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच

कळले तर त्याचा त्यांना भविष्यात उपयोग होईल या विचाराने ही शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेण्याचा विचार केला.आणि अवघ्या ९ वर्षाच्या आपल्या लेकराला घेऊन एवढी दूर मजल मारणे त्याचबरोबर धूर्त व कपटी राजकारणी असलेल्या औरंगजेबाच्या राजकारणात शंभू राजेंना घेऊन जायचे ठरवून खूप मोठा धोका महाराजांनी पत्करला होता. स्वराज्यावर येणाऱ्या सर्वात मोठ्या शत्रू ची खरी ओळख व्हावी. तसेच आपला शत्रू आपल्यापेक्षा किती बलवान आहे. मुघली दरबारातील राजकीय डावपेच काय असतात? या सर्व गोष्टीं शंभू राजेंना समजून घेता याव्यात म्हणून शिवरायांनी आग्र्याला शंभूराजेंना सोबत घेऊन जाण्याची मोहीम हाती घेतली म्हणता येईल. आऊसाहेब, पुतळा राणीसाहेब सर्वांना काळजी तर वाटू लागली. अवघे ८-९ व्या वर्षी शंभुराजे स्वराज्यापासून ते आग्रा एवढी मोठी मजल कशी मारतील. ३-४ आणि त्याहून ही अधिक महिन्याचा प्रवास घोड्यावर किंवा पालखी मध्ये ही म्हणलं तरी अवघड च ना!काय म्हणलं असेल जिजाऊ साहेबांचं मायेचं काळीज !! एकीकडे नातवाकडे मन हेलकावत होतं तर दुसरीकडे आपल्या पुत्राचे राजकारण या दोन्हींमध्ये तळमळत होतं.

आज तुम्ही विचार करा आपल्या आजकालच्या पिढीतील लहान मुलांना मामाच्या - आजीच्या जरी गावाला जायचं म्हणल तर माय - बापाला

बेचैनी होते. कस जाईल?कस पाठवावं? कस राहील माझं बाळ?करमेल का त्याला? असे एक ना अनेक प्रश्न येतात त्यांच्या मनात . त्यात पुन्हा ते बाळ तर ऐसपैस ए.सी. गाडीमध्ये, ट्रेनमध्ये किंवा अगदी फ्लाईट मध्ये ही जात असतं तरी या पिढीच्या माय - बापाचा जीव टांगणीला लागतो.तर विचार करण्याची गोष्ट आहे की इथं एक बाप आपल्या मुलाला अशा जागी नेत आहे की जिथे सर्व बाजूंस लोक धोका,मत्सर, द्वेष , राग मनात घेऊन बसलेली आहेत. असे जंगल आहे ज्यात सर्व हपापलेले लांडगे एखाद्या बछाड्याची वाट बघत आहेत शिकारी साठी.अशा वातावरणात शिवराय व शंभुराजे जाणार होते. तरी काय ते शिवरायांचे शौर्य आणि धैर्याचे राजकारण असेल अकल्पनीय!! किंबहुना शंभुराजे ही त्याच उत्साहाने आणि जोमाने आपल्या आबासाहेबांच्या सहवासात जास्त वेळ राहता यावं आणि आपल्या आबासाहेबांकडून राजकारणाचे धडे घेण्यासाठी तयार होते.शिवचरित्र असो की शंभूचरित्र असो त्यामध्ये आजकाल च्या जीवनाचे सार नक्कीच आपल्याला मिळते हा माझा विश्वास आहे..

आग्र्याला जाण्यासाठी सर्व बेत आखून पुढे वाट मोकळी करण्यासाठी आणि आग्रा शहरातील हाल - हवाला घेण्यासाठी तेथील मार्गातील ठाव ठिकाण घेण्यासाठी राजेंनी बहिर्जींना पुढे रवाना केले.गडावर सर्व शिबंदी - शिदोरी ची जोरदार तयारी झाली. पुतळाबाई, सोयराबाई ई. अशा राणीसाहेब

यांनी प्रवासात लागणाऱ्या जिन्नस, कपडे आभूषणे आणि खाण्याचे सर्व शिदोरी वगैरे कित्येक वस्तू राजे आणि शंभू राजेंच्या सोबती देण्यासाठी बांधून ठेवल्या. लगबग सुरू होती सर्वांना काळजी तर होतीच आणि जिजाऊंचे काळीज मात्र शांत नव्हते. मनात कित्येक प्रश्न कल्लोळ घालत होते. पण सर्वांनी प्रवासाची आणि मनाची तयारी पूर्ण केली आणि बघता बघता आग्रा प्रवासाचा दिवस ही उजाडला! शंभुराजे सर्व आईसाहेब, धाराऊ आणि आऊसाहेब यांचे आशीर्वाद घेऊ लागले. चरण स्पर्श करून सर्वांकडून मायेचे प्रेमाचे आणि खुशालीचे आशीर्वाद घेऊ लागले. शिवरायांनी ही गडावरून जिजाऊ साहेबांच्या पाया पडून आशीर्वाद घेतले. आणि ही सगळी मंडळी पायउतार होऊ लागली. असे भासू लागले की आग्रा भेटीस निघालेले राजे हे स्वराज्याच्या भावी - पिढीसाठी, गोर गरीब रयतेसाठी स्वतःच्या जीवाची, परिवाराची पर्वा न करता कपटी आणि धूर्त मनसुबा मनात धरून मूठभर स्वराज्य धुळीत मिळवायची स्वप्न पाहणाऱ्या औरंगजेबाच्या मगरमिठीच्या विळख्यामध्ये जाऊ लागले आहेत. शिजंगलातवराय जणू शिवसिंह आपल्या छाव्यासोबत आहे जाणार होते जिथे त्यांची वाट बघत बसले आहेत हपापलेले लांडगे, कुत्री आणि लालसेने आतुरलेले गिधाड!! प्रवासामध्ये राजे आपल्या बाळ राजेंना अनेक राजकीय गोष्टी आणि कौशल्याचे धडे देऊ लागले. शंभू राजेंसाठी ही हा प्रवास तेवढाच महत्वपूर्ण आणि रोमांचक होता.

स्वराज्याच्या बाहेर पडून पर मुलुखात जाताना दिसणारी मोठ मोठी डोंगर नद्या सौंदर्य हे पाहून त्यांचं मन प्रफुल्लित झाले होते.

आपल्या नऊ वर्षांच्या युवराज संभाजीराजांना बरोबर घेऊन दि. ५ मार्च १६६६ या दिवशी शिवाजीराजांनी राजगडावरून आग्र्यास जाण्यासाठी गडाबाहेर पाऊल टाकले. त्यांचेबरोबर फक्त तीनशे सैनिक होते. मिर्झाराजांनी आपला एक खास प्रतिनिधी महाराजांबरोबर दिला. त्याचे नाव तेजसिंह कछवा. औरंगजेबाचाही एक खास प्रतिनिधी महाराजांबरोबर देण्यात आलेला होता. त्याचे नाव गाझीबेग तवझुक.शृंगारलेले हत्ती, घोडे, सोन्याच्या पालख्या पुढे हत्तीवर डौलाने फडकणारा भगवा झेंडा अशा राजाला शोभेल असा वैभवी लवाजम्यासह ते प्रवास करत होते. मार्गातील प्रवासात त्यांची बडदास्त शहाजाद्याप्रमाणे ठेवावी, असे मिर्झा राजाचे हुकूम होते. त्यामुळे आग्र्यापर्यंतचा प्रवास सुखद झाला.आता आग्रा नजरेस पडू लागला. आग्र्याजवळच्या मुलूकचंद सराईत महाराजांचा शेवटचा मुक्काम असताना त्यांचे स्वागत एखाद्या बादशाही उमरावांकडून व्हावे असा राजनैतिक संकेत असतानाही रामसिंगाच्या एका सामान्य मुन्शीकडून ते झाले; इथेच त्यांच्या मनात धोक्याची पाल चुकचुकली. महाराजांच्या प्रवासातील बातम्यांनी औरंगजेबास सतत कळत होते की , शिवाजीराजे कसे कसे आपल्या जवळ येत आहेत! या वर्षी त्याचा पन्नासावा वाढदिवस आग्र्याच्या दिवाणे - आम

मधल्या शाही दरबारात साजरा होणार होता. त्याच दरबारात शिवाजीराजे हजर व्हावेत अशी त्याची इच्छा होती. हजारो दरबारी उपस्थितांच्या देखत तो आजपर्यंत बेलगाम बंडखोरासारखा वागलेला सिवा मरहट्टा कसा आदबीने मुजरे करीत येतो ते त्याला जनतेला दाखवायचे होते आणि महाराजांनाही मोगल साम्राज्याचा तळपता दिमाख दाखवायचा होता. क्षणाक्षणाने तो क्षण जवळ येत होता. महाराजांनी चंबळ नदी ओलांडली होती. नरवर या ठिकाणी महाराज पोहोचले दि. ९ मे १६६६ या दिवशी. दि. १२ मे १६६६ या दिवशी बादशाहाची पन्नासावी सालगिरा होती.शिवाजीराजांची सर्व व्यवस्था संपर्क मध्यस्त म्हणून कुँवर रामसिंग याच्यावर बादशाहाने सोपविली होती. त्याच्या मदतीस मुखलीसखान या नावाचा सरदार देण्यात आला होता. शिवाजीराजांचे आग्र्यास भरदरबारात येणे सर्वांना उत्सुकतेचे होते. पण काही शाही रिश्तेदारांना अजिबात पसंद नव्हते. पण औरंगजेबाने त्यांचे सल्ले कधीच ऐकले नाहीत. कारण त्याला पाहायचे होते , शिवाजीराजांचे तख्तापुढे झुकलेले मस्तक. अन् नंतर पाहायचे होते तुटलेले मस्तक. शिवाजीराजे आणि औरंगजेब या दोन प्रचंड महत्त्वाकांक्षा होत्या.पण पुढं जे घडणार होते ते त्याला माहित नव्हते की त्याचा स्वप्नांचा चुराडा एका झटक्यात राजे करणार आहेत ते.शंभुराजे हा संपूर्ण प्रवास निरखून पार पाडत होते. आग्र्याच्या जवळ येत असताना शंभुराजे सर्व मुघली

सत्तेचा डौल आणि औरंगजेबाच्या अनेक वर्षाच्या गुलामगिरीतून आपली उपजीविका भागवणारी आणि गुलामीच्या ओझ्याखाली दिवस घालवणारी प्रजा हे सर्व बारकाईने शंभुराजे पाहत होते.एकीकडे बादशहा औरंगजेबाचे वैभव आणि एकीकडे त्या वैभवाखाली चिरडून जात असलेली प्रजा!! औरंगजेबाच्या वाढदिवसाची तारीख होती १२ मे १६६६ . त्याने तीन दिवस आधीच रामसिंग आणि मुखलीसखान यांना हुकूम केला की , ' शिवाजीराजे वाढदिवसाच्या दरबाराला हाजिर राहिले पाहिजेत. त्यादृष्टीने राजांना कळवा. म्हणजे ते आदल्याच दिवशी (दि. ११ मे रोजी आग्र्याजवळ येऊन पोहोचू शकतील. त्याप्रमाणे रामसिंगने तातडीने महाराजांच्या वाटेवर स्वार पाठविले आणि कळविले की , वाढदिवसाच्या आदल्या दिवशी आपण आग्र्यापर्यंत येऊन पोहोचावे. महाराज त्याप्रमाणे खरोखरच दक्षता घेऊन आग्र्यापासून जवळच सुमारे १० कि. मी. वर दिवस मावळता येऊन पोहोचले. याच ठिकाणी फक्त एक धर्मशाळा होती. तिचे नाव मुलुकचंदकी सराई.

महाराजांच्या या टप्प्यावरील आगमनाची वार्ता रामसिंग आणि मुखलिस यांना वेळेवर समजली. ते त्याप्रमाणे महाराजांच्या स्वागताकरिता साजसरंजामानिशी निघाले. ते निघणार एवढ्यात प्रत्यक्ष औरंगजेबाने या

दोघांना समोर बोलावून घेतले आणि हुकूम केला की , ‘ या क्षणापासून सलीमगड महालाची गस्त पहारेदारी तुमच्यावर सोपविली आहे. ‘ सलीमगड महाल आग्र्याच्या किल्ल्यातच आहे. बादशाहाचे आपल्या कुटुंबासह वास्तव्य त्यात होते.

सलीमगडची गस्त म्हणजे रात्रंदिवस पहाऱ्याची जबाबदारी कोणा ना कोणातरी महत्त्वाच्या सरदारांवरच सोपविली जात असे. ही परंपराच होती. पण एका बाजूने रामसिंग आणि मुखलिस यांना शिवाजीराजांच्या स्वागताची जबाबदारी बादशाहाने फर्मावली होती अन् त्याचवेळी त्याने महालावर गस्त घालण्याचीही जबाबदारी या दोघांवर सोपविली. दोघेही अवाक् झाले. बादशाहापुढे बोलता येत नसे. शिवाजीराजांच्या स्वागताला जाण्याचा सारा सरंजाम रद्द करून मुकाट्याने हे दोघे (अर्थात आपल्या सैन्यानिशी) सलीमगड महालाच्या गस्तीवर दाखल झाले. हा शिवाजीमहाराजांच्या स्वागताच्या सोहोळ्याची मुद्दाम फजिती करण्याकरिता बादशाहाने योजलेला डाव. महाराज तर सराईपाशी येऊन पोहोचले होते. आपल्या स्वागताला शाही प्रतिनिधी , आपल्या योग्यतेस शोभेल अशा पद्धतीने आणि शाही रिवाजांप्रमाणे नक्कीच येणार ही महाराजांची अगदी रास्त अपेक्षा होती. पण रामसिंगने पाठविलेला लाला गिरीधरलाल मुन्शी या नावाचा एक सामान्य

कारकून एकटा महाराजांना भेटावयास आला. त्याने नम्रतापूर्वक महाराजांना म्हटले की , ‘ जरा व्यवस्थेत अचानक घोटाळा झाला आहे. तरी आपल्या स्वागतास उद्या सकाळी ( दि. १२ मे) शाही सरंजाम येईलच. तूर्त आजची रात्र आपण येथेच काढावी. महाराजांना हे खटकले. एवढ्या मोठ्या शाही दरबारात अशी अनास्था असावी ? हा अपमान हेतुपूर्वक आखला गेलाय हे महाराजांच्या लक्षात आलेच होते पण महाराजांनी तोही गिळला. समजूतदारपणे त्यांनी एक रात्र इथेच काढली. आणि राजे आणि शंभुराजे झोपी शांत गेले.

दि. १२ मे बादशाहाचा वाढदिवस उगवला. सामान्यपणे सकाळी १० चे सुमारास हा वाढदिवसाचा कार्यक्रम आग्रा किल्ल्यात सुरू होणार होता. म्हणजेच महाराज आणि संभाजीराजे यांना किल्ल्यात सुमारे १० वाजता पोहोचणे जरूर होते. पण बादशाहाने सलीमगडची गस्त सोडून रामसिंगला आणि मुखलिसखानला महाराजांच्या स्वागतास जाण्याची अनुज्ञा दिलीच नाही. त्याला महाराजांचा एक वेगळाच नाटकी देखावा करून घेण्याची इच्छा होती. ती म्हणजे शिवाजीराजे दरबारात उशीरा यावेत. ते आलेले दरबाऱ्यांना जाणवावेत. तेथे महाराजांनी आणि संभाजीराजांनी आपणास केलेले मुजरे आणि अर्पण केलेले नजराणे सर्वांस दिसावेत.

शिवाजीसारखा भयंकर माणूस तख्तापुढे कसा वाकतो याचे कौतुक लोकांनी पाहावे ही औरंगजेबाची खरी इच्छा आणि योजना होती. म्हणून त्याने प्रत्यक्ष दरबार सुरू झाल्यानंतर शिवाजीराजांना घेण्यासाठी रामसिंग आणि मुखलिसखान यांना पाठविले. तोपर्यंत उशीर खूप झाला. त्यातून पुन्हा रस्ते चुकल्यामुळे महाराजांना आणण्यास रामसिंगलाही उशीर झाला. अनेक घोटाळे झाले. रामसिंग ने राजेंना भेटून झालेल्या गैरसोयी साठी राजेंची माफी मागितली आणि दरबारी रिवाज महाराजांना व शंभू राजेंना सांगू लागला.शंभुराजे ही ऐकत होते आणि त्यांना या सगळया रिवाज रीती वेगळ्या वाटू लागल्या पण आपल्या आबासाहेबासोबत सर्व ऐकून घेऊ लागले. रामसिंगने शंभू राजेंना ही संगितले की अदब राखावी आणि बादशहांना कुर्निसात करावा तसे शंभुराजे त्यांचा बालमुखातून वधले, "जरूर करू पण तुमचा बादशहा ही आमच्या आबासाहेबांना मुजरा करतील ना?" रामसिंगला काही समजले नाही त्याने परत काय म्हणालात विचारले पण महाराजांनी मध्यस्ती करून पुढे केले.या प्रसंगातून कळते आपल्याला की स्वाभिमान काय असतो आणि आपला कणखर बाणा कधी ही ताठच ठेवायचा हे संस्कार शंभू राजेंच्या रक्तातच होते. अवघ्या 9 वर्षाच्या बाळ राजेंना आपल्या आबासाहेबांचा काय आदर आणि स्वाभिमान होता याचे हे उदाहरण!! सर्व रामसिंगकडून सूचना ऐकून राजे रामसिंग सोबत दरबारात पोहचले. समोर

सरदारांच्या रांगा उभ्या राहिल्या होत्या. बादशहा समोर उंच अशा आपल्या तख्तावर थाटात बसला होता. सूर्याचे तेज जसे उघड्या डोळ्यांनी बघणे शक्य नसते त्या प्रमाणे बादशहा प्रत्यक्ष राजें कडे नजरेस नजर देऊन ना बघता सरदारांच्या रांगाकडे बघू लागला.

बादशाहाच्या अगदी समोर आणि सरदारांच्या मधून सरळ रेघेत पाण्याचा आयताकृती सुंदर हौद आणि त्यात एका ओळीत अनेक कारंजी होती. बादशाहचे तख्त जरा उंचावर होते. डाव्या उजव्या बाजूस त्याचे ज्येष्ठ अधिकारी उभे होते. महाराज आणि संभाजीराजे बादशहासमोर उभे राहिले सत्कार नजराण्याची ताटे घेतलेले दोन नोकर असे औरंगजेबाच्या पुढे गेले. शाही आसनापासून महाराज बहुदा सात- आठ फुटांवर पोहोचले. बादशाहाने त्यांच्याकडे बघितलेसुद्धा नाही. एका शब्दानेही बोलणे , चौकशी करणे , निदान चेहऱ्यावर स्मित व्यक्त करणे हे सुद्धा औरंगजेबाच्या विचित्र स्वभावाला यावेळी परवडले नाही. तो जपमाळ ओढीत होता. महाराजांनी आणि संभाजीराजांनी रिवाजाप्रमाणे सत्कार नजराणा अदा केला .नंतर लगेच बादशहाने अकिलखानास फर्मावले की , यांना जागेवर सुपूर्द करा.

हा साराच शाही वर्तनाचा प्रकार अपमानकारक होता. पाचशे कोसावरून आपल्या भेटीस आलेल्या एका दिलदार समशेरबहाद्दराचं

कालपासून आतापर्यंत हे असं स्वागत होत होतं. आश्चर्यच! महाराजांना समोरच्या सरदारांतील जरा मागच्या रांगेत अकीलखानाने नेऊन उभे केले. शंभूराजे शेजारीच होते. नंतर बादशाहाने एकमागोमाग एक बड्या दरबाऱ्यांना मानाची खिलत (आहेर) सुपूर्द केली. त्यात महाराजांना अजिबात दुर्लक्षित करून मुद्दाम वगळले. हाही केवढा अपमान होता! त्यात पुन्हा महाराजांच्याच पुढच्या एका रांगेत जोधपूरचा जसवंतसिंह उभा होता. अर्थातच त्याची पाठ महाराजांकडे होती. त्यालाही मानाची खिलत देण्यात आली. याच जसवंतसिंहाचा सिंहगडावरच्या मराठ्यांनी सपाटून पराभव केला होता. तो सैन्यासह पळत सुटला म्हणून बचावला. त्याचा आत्ता बादशाह महाराजांच्या देखत सत्कार करीत होता. अन् सन्मानाचे पाहुणे म्हणून आलेल्या महाराजांकडे पुरेपूर दुर्लक्ष करीत होता. हा केवढा अपमान!आग्र्याच्या दरबारात एकामागोमाग होत गेलेले अपमान आणि त्यातल्यात्यात आपल्या सामनेसामने एका पराभूत जसवंतसिंहाचा केलेला सन्मान पाहून महाराजांना आपला अपमान अतिशय असह्य वाटला. ते रागाने लाल झाले.आणि भर दरबारात जिथे बादशहा समोर टाचणी पडलेला आवाज ही मंजूर नाही तिथे महाराज कडाडले, "रामसिंगSS!!!" सर्व दरबार या सिंह गर्जनेने महाराजांच्या आवाजाने हादरून गेला आणि सर्व सरदार कावरेबावरे झाले. रामसिंगला महाराजांनी तिथल्या तिथेच दरडावून विचारले , "हा सारा कसला प्रकार

चालविला आहे ? अपमान! याच्यापेक्षा मृत्यू परवडला. आम्ही राजे आहोत..आणि आम्हाला ही वागणूक दिली जाते. पाठीला पाय लावून पळून जाणाऱ्या या जसवंतसिंग च्या मागच्या रांगेत आम्हाला उभे केले जाते . आम्ही सरदार नसून राजे आहोत, असे राजे ज्याने तुमच्या बादशहाला २३ किल्ले दिले.ज्याने शाहिस्तेखानाची बोटे छाटून पळता भुई थोडी केली आदिलशाही सरदार अफजलखानचा कोथळा बाहेर काढला. आणि तुमचा बादशहा काय समजतो आमचा वारंवार होणारा अपमान आमच्या लक्षात येत नाही असे वाटते का तुम्हाला??" महाराजांचे ते रुद्र रूप पाहून रामसिंगला घाम आला. तो घामाघूम झाला आणि राजेंना शांत करू लागला.आपल्या आबासाहेबांचा तो कणखर आणि स्वाभिमानी बाणा बघून शंभू राजेंची छाती फुगून आली होती. त्यांचा हाथ महाराजांच्या हातात च होता. त्यांना महाराजांचा हात गरम भासू लागला. त्यांना हाताची गरमी जाणवत होती

ज्या दरबारात शिंक आली तर ती सुद्धा अत्यंत अदबीने शिंकायची , तिथे शिवाजीराजे वाघासारखे चवताळून मोठमोठ्याने या अपमानांचा निषेध करीत असलेले पाहून हे सगळे शाही सरदार अत्यंत बेचैन झाले होते. रामसिंग राजेंना समजावून सांगण्याचा प्रयत्न करू लागला. बादशहा नाराज होईल दरबारी रिवाज - अदब वगैरे गयावया करू लागला. बादशाह मात्र शांतपणे समोरचा आरडाओरडा ऐकत होता आणि असे जणू

काही भासवीत होता की त्याला हे बोलणे ऐकू येतच नाही. त्याने रामसिंगला संथपणे फर्मावले , ‘ रामसिंग , क्या बात है , सिवा की त्यौंरीयाँ क्यू चढ गयी है ?

रामसिंग ने उत्तर दिले," हुजुर, राजेंना आग्र्याच्या गरमीचा त्रास होत आहे" असे म्हणून सावरण्याचा प्रयत्न करू लागला. आणि बादशहाने राजांना खिल्लत देण्याचे आदेश दिले.आणि खिलतीचे ताट महाराजांकडे पाठविले. अकीलखानाने ताट पुढे करताच महाराज कडाडले , 'इथे वाटणाऱ्या अशा खिल्लत आम्ही रोज आमच्या मावळ्यांना वाटतो.'

‘आम्ही बादशाहाची खिल्लत झिडकारतो.आम्हास ही खिल्लत नामंजूर!!! खरं म्हणजे महाराजांचे सगळे बोलणे बादशाहाला नक्कीच ऐकू जात होते. तो काय समजायचे ते समजून गेला होता. मराठी रक्त लाव्हा-रसासारखे उसळलेले सारा दरबारच पहात होता. ना बादशहा ला कधी ना सह्याद्रीच्या या मराठी रक्ताला मान खाली घालून अपमान सहन करण्याची सवयच कधी नव्हती.महाराज बादशहाकडे पाठ दाखवून शंभू राजांचा हाथ पकडुन दरबारातून धडक निघून जाऊ लागले.रामसिंग बादशहाला कुर्निसात करून महाराज आणि शंभूराजांच्या मागे जाऊ लागला. महाराजांनी बादशाहाकडे वळूनसुद्धा पाहिले नाही. भेटून जाणे तर दूरच.दरबारातून मुक्कामावर पोहोचेपर्यंत महाराज वा रामसिंग काहीच बोलले नाहीत.

पोहोचल्यावर रामसिंग एवढेच म्हणाला की , ‘ महाराज , आपण एवढं रागवावयास नको होतं ‘ तेव्हा महाराज एकदम म्हणाले , ‘ तुमच्या बादशाहास काही रीतरिवाज समजतात का , पाहुण्याशी कसं वागायचं ते ?’मग रामसिंग आपल्या वाड्यात निघून गेला. त्याच्या वाड्याच्या विशाल प्रांगणातच अनेक तंबू ठोकून महाराजांसह सर्वांची राहण्याची व्यवस्था या छावणीत करण्यात आली होती. महाराजांचा खास शामियाना स्वतंत्र होता. म्हणजेच त्यांची राहण्याची व्यवस्था इमारतीत नव्हती , तर ती या छावणीत होती.पण आता एक गोष्ट महाराजांना स्पष्ट लक्षात आली होती की , आपल्यावर बादशाहाची सक्त नजर आहे. येथून एकदम निसटून पसार होणे आत्ता शक्य नाही. पण प्रत्यक्ष आघात करून महाराजांना बेड्या घालणे किंवा ठार मारणे असे धाडस औरंगजेबाला करणे अवघडच होते.कारण मिर्झा राजे जयसिंग ने तुळशी बेलाच्या साक्षीने घेतलेली महाराजांच्या जीवाची हमी! आणि रामसिंग हा आपल्या बापाइतकाच तुळशीबेलाच्या शपथेला बांधील होता. राजपुताचा शब्द म्हणजे ‘ प्राण जाय पर वचन न जाय ‘ असा लौकीक सर्वत्र होता. त्याची धास्ती त्याला होती. म्हणून तो भडकलेला पण वर्तनात शांत असा राहिला होता. शाही कुटुंबातील त्याची बहीण जहाँआरा , मामी , मावशी , इतर नातलग आणि अनेक सरदार ‘ तो ‘ दरबार संपल्यापासून औरंगजेबाला आग्रह करकरून म्हणत होते की ‘ सीवाने भयंकर वर्तन करून

आपला अपमान केला आहे. आपण त्याला ठारच मारा. ‘ पण बादशाह कोणताही अभिप्राय व्यक्त न करता त्याला ठार कसे मारता येईल याचा विचार करीत होता.महाराजांना लक्षात आले होते की आता आपण इथे सुरक्षित नाही. बादशहाने हळू हळू करत महाराजांवर स्वतःचे पहारे घट्ट केले होते. रामसिंगला विश्वासात घेऊन आपल्या धूर्त आणि कपटखेळाने तो राजांच्या भोवती आपला विळखा आवळत होता. या सर्वांमध्ये एक गोष्ट महाराजांच्या हिताची होती ती म्हणजे महाराजांना दालनाबाहेर पडण्यास मनाई होती पण शंभुराजे वर कुठलीही बंदी नव्हती. महाराजांच्या छावणी तून शंभुराजे कधी ही कुठे ही येऊ - जाऊ शकत होते.दिवसभर शंभुराजे बादशहाच्या महालात आणि आग्र्यामध्ये फिरू शकत होते.दिवस सरत होते पण महाराजांनी हा विळखा तोडून बाहेर पडण्याचा बेत आखायला सुरू केला आणि आग्र्यातुन बाहेर पडून स्वराज्यात परतण्यासाठी गरुडझेप घेण्याची मोहीम महाराजांच्या डोक्यात फिरू लागली. शंभुराजे हे या अवघड मोहिमेचे महत्वाचे आणि प्रथम केंद्रबिंदू होते.

जणू आता या शिव-सूर्याला औरंग्याच्या या काळकोठडीतून बाहेर काढण्यासाठी शंभु-चंद्र आपल्या मंद प्रकाशाने वाट दाखवणार होते.( चंद्र झाले सूर्याचे डोळे!!)

१३ मे रोजी मधूनमधून रामसिंग आपल्या प्रांगणातल्या शामियान्यात

महाराजांना भेटून गेला. औरंगजेबाचे काही काही सरदार असेच भेटून गेले. हे सर्व औपचारिक पण सुसंस्कृतपणे घडत होते. महाराजही त्यांच्याशी शांतपणे बोलत होते. पण एक गोष्ट महाराजांना स्पष्ट लक्षात आली होती की , आपल्यावर बादशाहाची सक्त नजर आहे. येथून एकदम निसटून पसार होणे आत्ता शक्य नाही. पण प्रत्यक्ष आघात करून महाराजांना बेड्या घालणे किंवा ठार मारणे असे धाडस औरंगजेबाला करणे अवघडच होते.बादशहाने कपट कारस्थाने करून महाराजांना संपवण्याची योजना आखु लागला पण मिर्झाराजे आणि रामसिंग ने महाराजांच्या सुरक्षिततेची हमी घेतली होती त्यामुळे औरंगजेब हतबल होता. असेच काही दिवस सरले.महाराजांच्या छावणी / दालानासमोर आता फौलादखान चे पहारे बसविण्यात आले. या नजरकैदेत असलेल्या महाराजांनी शंभुराजे वर पूर्ण मोहीम सोपवली होती. शंभुराजे रोज दरबारात आणि आग्ऱ्या मध्ये जाऊन लोकामध्ये सामील होण्यास सांगितले आणि योजनेप्रमाणे शंभूराजे रोज दरबारी जाऊ लागले आणि आग्र्याच्या बाजारपेठेत फिरून शहराची माहित आणि बाहेर पडण्याच्या वातांचा पूर्ण आराखडा घेऊ लागले आणि महाराजांना पूर्ण अहवाल देऊ लागले. असेच एक दिवस शंभुराजे दरबारात असताना औरंग्याला मनात आले की शंभूराजे यांना आपल्या सरदाराची आणि शाही पैलवानाचा वकब दाखवावा म्हणून औरंगजेब शंभुराजे दरबारात कुस्ती पाहात असताना म्हणाला, " शंभुराजे,

हमने सुना है, आप भी कुस्ती लढते हो. जरा हमारे पैलवानो से करो दो - दो हात आखाडे मे उतरकर." औरंगजेब किती ही धूर्त आणि कपटी असला तरी आपले शंभुराजे सह्याद्रीच्या कुशीत आणि रायगडाच्या मुशीत वाढलेले स्वाभिमान हा त्यांचा रक्तात च भिनलेला! शिवरायांच्या प्रत्येक पाऊलखुणा आपल्या मनात रुजवून नेहमी त्यावर चालत आलेले शंभुराजे औरंगजेबाचा मनसुबा जाणून होते आणि त्यांनी लगेच उत्तर दिले, " जरूर, का नाही? आम्ही कुस्ती लढू पण तुमच्या या आखाड्यात आमच्या बरोबरीचा पैलवान असेल तर नक्की आम्ही उतरू आखाड्यात! आम्ही एक राजांचे पुत्र आहोत, आमच्या बरोबरीच्या पैलावानासोबतच आम्ही लढू, आपल्या शहाजाद्याला उतरवा आखाड्यात आम्ही खेळू कुस्ती त्यासोबत!!" हे ऐकून बादशहाला कळले की आपण कोणाशी पंगा घेतलाय ते! शंभुराजे समोर तोंडावर पडल्यासारखे तो उठून दरबारातून निघून गेला!

मित्रानो! वयाच्या 9 व्या वर्षी शंभुराजे त्या औरंगजेब समोर उभा राहून निडर आणि स्वाभिमानी ताठ मानेने उभा रहायचे. शंभुराजे नी आता आता आग्र्यातून बाहेर जाण्याची वाट होती ती शाधुन काढली. तिथे एक मोठी भट्टी होती काळोजी ची भट्टी जणू आग्र्यात येण्या - जाण्याची वाट दाखवणारी ती भट्टी! योजनेप्रमणे शंभुराजे त्या भट्टी वर जाऊन तिथे काळोजीला विश्वासात घेऊन त्यांना सांगितले की आम्ही सांगतो तो पर्यंत रोज भट्टी पेटवून धूर

करावा. त्यासाठी त्यांना मोबदल्यात रोज मोहरा देऊ केल्या. आता कैदेतून सुटून सर्वांनी आपापल्या मार्गाने धुराच्या दिशेने यायचे ठरले.या सर्व योजनेत बहिर्जीनी योग्य ती योजना आखली होती. आणि शंभुराजे सोबत बहिर्जी ही आपल्या गुप्तहेर खात्याला घेऊन संपूर्ण योजना आखु लागले.महाराज आपल्या दालनातून शंभुराजे करवी संदेशाची देवाण-घेवाण करू लागले. आग्र्यतून बाहेर पडण्यासाठी केंद्र बिंदू होते ती काळोजीची भट्टी !! सर्वांनी भेटायचे ठरले काहीजन यमुना तीरी घोडी घेऊन तयार राहणे. राजांनी आता योजना आखली त्यानुसार आजरी असल्याचा बनाव सुरू झाला. दिवसेंदिवस राजांची तब्येत खराब होऊ लागली. वैद्य - हकीम महाराजांच्या उपचारासाठी येऊ जाऊ लागले. महाराजांनी बादशहाला अर्जी केली की आमची तब्येत आता बरी होईल असे दिसत नाही आणि आमचा खर्च वाढत चालला आहे. आम्ही आमच्या सरदार - फौजेचा खर्च आता उचलू शकत नाही आमच्या मुळे त्यांना  येथे अडकून ठेऊ नये. त्यांना स्वराज्यात परत जाऊ द्यावे. घे ऐकून बादशाह मनात खूषच झाला त्याला वाटले शिवाजीच्या आसपास जेवढे कमी लोक रहातील तेवढं त्याला सोप होईल. आणि त्याने त्या लोकांना परवाने देऊन परत जाण्याची सोय करून दिली. आता महाराजांसोबत ठराविक आणि मोजकी माणसे राहिली. शंभुराजे रोज शहरात आणि दरबारात जाऊन लोकांशी ओळखी वाढवू लागले. शहाजाद्यासोबत ही चांगली मैत्री झाली.

आता महाराजांची तब्येतीत काही फरक पडत नव्हता म्हणून त्यांना आता दुआ आशीर्वादाची गरज आहे असा बनाव केला. आणि बादशहाकडे अर्ज केला की आम्हाला फकीर बाबा आणि गोर गरिबांमध्ये मिठाई वाटून पुण्य आणि आशीर्वाद - दुआ घ्याव्यात त्यासाठी मिठाई वाटण्याची परवानगी मिळावी असा अर्ज केला.आणि बादशाह ने ती मंजूर केले. आणि शंभुराजे आता रोज मिठाईच्या दुकानाला भेटून रोज त्यांना मोहरा देऊ लागले. मिठाई आणि पेटारे आता महाराजांच्या दालनात येऊ लागले. आणि महाराज त्याना स्पर्श करून ते लोकामध्ये वाटण्यात येऊ लागले. हा नित्यक्रम रोजचा झाला होता. सकाळ संध्याकाळ पेटारे दालनातून शहरामध्ये जाऊ लागले. पहारेकऱ्यांना रोजचे काम झाले होते प्रत्येक पेटारे तपासणी करून बाहेर सोडणे. असेच काही दिवस सुरू राहिले. महाराजांनी योजना च अशी आखली होती की रोज पेटारे जाणार आणि ते तपासले जाणार हे राजांना माहीत होते. आणि एखादी गोष्ट रोजची झाल्यास कालांतराने माणूस त्या कामात कामचुकारपणा करतोच आणि महाराज त्याची वाट पाहू लागले. अशामध्येच महाराजांना बहिर्जी कडून खबर मिळाली की राजांना येत्या शुक्रवारी बांधकाम पूर्ण होऊन तयार झालेली फिदाई हुसेनच्या कोठी मधे रवाना करणार आहेत आणि तिथेच राजांना संपवण्याचा बेत औरंग्याने आखला होता. शंभुराजे ठरलेल्या योजनेप्रमाणे पूर्ण तयारी करून तयार होते. आग्र्याच्या वाटा - पथके

कोण कुठे मिळणार याची सर्व योजना झाली होती आता महाराज फौलाद खानाचा पहारा तोडून दालनाबाहेर कसे पडतील याचा विचार करत होते. कारण मिठाई वाटत - वाटत पेटाऱ्याचे आकार वाढवून आतमध्ये माणूस बसून येऊ - जाऊ शकेल येवढे केले होते ते ही पहारेकऱ्यांना लक्षात येऊ दिले नाही पण प्रत्येक पेटारा तपासून च बाहेर जाऊ लागलं त्यामुळे पेटाऱ्या मध्ये बसून बाहेर जाणे सुरक्षित नव्हते. आणि दिवस कमी असल्यामुळे बाहेर पडण्याच्या योजनेने दिवस निवडला महाराजांनी गुरुवार !! सर्व सरदार, बहिर्जी शंभुराजे यांना महाराजांनी आपापली जागा घ्यायला सांगितले. शंभुराजे योजनेप्रमाणे अगोदर कालोजी च्या भट्टीवर जाऊ थांबले. बहिर्जी ठरलेल्या ठिकाणी नदीजवळ घोडी घेऊन उभे राहिले. आता दालनातून बाहेर निघण्यासाठी योजना आखली त्यासाठी महाराजांनी आपल्या सोबत असलेले सरदार हिरोजी फर्जंद जे हुबेहूब शरीर आणि राहणीमाना ने महाराजांसारखे दिसायचे दाढी मिशा चेहरा पट्टी पूर्णपणे महाराजांचे सारखी होती. महाराजांच्या जागी बिछान्यावर ते झोपतील आणि महाराज हिरोजी चा वेश घेतील असे ठरले. महाराजांनी इतके दिवस पहारेकऱ्यांच्या नजरेत आपली प्रतिमा जशी ठेवली होती त्या प्रमाणेच हिरोजीना झोपण्यास संगितले. महाराज रोज झोपून डोक्यावर पांघरून घेऊन हाथ बाहेर पोटावर ठेऊन झोपत असत. मदारी मेहतर नावाचा सेवक त्यांचे पाय चेपत असे आणि अधून मधून

महाराजांना खोकला यायचा. हे सर्व हिरोजी ला ३-४ दिवस निरीक्षण करण्यास सांगितले होते.त्याप्रमाणे हिरोजी महाराजांचे पूर्ण वेश घेऊन महाराजांना मुजरा करून आणि राजांनी ही त्यांची मनातून गळाभेट घेऊन लवकर स्वराज्यात परत या असे सांगून त्यांना अशी कळवळून मिठी मारली आणि हिरोजी बिछान्यावर झोपले. मदारी त्यांचे पाय चेपत बसला.मिठाई चे पेटारे उचलणारे काही मावळे दालनात होते. हिरोजी रोज त्यांना घेऊन पेटारे घेऊन जायचे त्याप्रमाणे राजेंनी हिरोजी फर्जंद चा वेश परिधान केला डोक्याला फेटा बांधून राजे तयार झाले.शंभुराजे आणि महाराज दोघांनी एकेमकासोबत समन्वय साधून ही योजना पूर्णपणे आखली होती. शंभुराजे यांचा राजकारणी प्रवास या प्रसंगाने झळाळून निघाला होता.महाराज कोणते राजकारण कसे काय करायचे हे सगळ शंभुराजे बारकाईने निरखत होते. एका बापाचा किती तो विश्वास आणि त्याच विश्वासाला सार्थ शंभुराजे यांनी केले होते. महाराज मोठ्या शिताफीनं दालनातून बाहेर पडले मिठाईचे पेटारे वाहून नेणाऱ्या मध्ये महाराज असावेत. (अनेक कादंबरी बखरीमध्ये या बद्दल एकमत नाही. कोणी हे ठोस सिध्द करू शकत नाही की महाराज नेमके कसे बाहेर पडले. महाराज स्वतः पेटाऱ्यात बसून बाहेर आले का पेटारे वाहणारे माणसामध्ये महाराज होते याची इतिहासात नोंद नाही.) पेटारे घेऊन महाराज बाहेर पडले आणि शंभुराजेनी सांगितलेल्या भट्टीच्या धुराच्या दिशेने निघाले आणि भट्टिवर

पोहचले.आणि काही प्रहरा नंतर हिरोजी फर्जंद ही उठून वेषांतर करून औषधी आणण्यासाठी म्हणून आपले सहकारी सोबत घेऊन तेही दालनाबाहेर पडले. इकडे शंभुराजे यांनी भट्टी आता बंद केली तरी चालेल आणि बक्षिसी मोहरा काळोजी ला देऊन त्यांचा निरोप घेतला. महाराज आणि शंभुराजे सोबती सहकारी घेऊन बहिर्जी जिथे आहेत तिथे जायला निघाले. इकडे पहारेकऱ्यांना संशय आल्याने फौलाद खानने दालनात येऊन बघितले तर तिथे महाराज नव्हते हे पाहून त्याला घाम च फुटला त्यांचा रागाने तिळपापड झाला होता. रागाने लालबुंद होऊन तो ओरडला... सिवा भाग गया !!! सिवा गायब हो गया!!! सगळीकडे एकच कल्लोळ उडाला पूर्ण छावणीत धावपळ सुरू झाली. आणि ही खबर बादशहाला कळली त्याचा पायाखालची जमीन च सरकली. इकडे महाराज शंभुराजे आणि सोबतीने सरदार छुप्या मार्गाने नदीकडे निघाले. बादशहाने जागोजागी नाकेबंदी केली आणि आपली फौज पूर्ण शहरामध्ये दौडवली जिकडे तिकडे मुघली हशम महाराजांना शोधायला दौडू लागली. महाराजांच्या वाटेमध्ये अडथळे निर्माण झाले. जिकडे तिकडे चर्चा आणि गोंधळ सुरू झाला सिवा भाग गया!! सिवा भाग गया!!! शंभू के साथ सिवा भाग गया. जिथे कुठे ९ वर्षाच्या मुलांबरोबर कोणी दिसेल त्यांना बंदी करून तपासणी होऊ लागली. पहारे कडक होत गेले. महाराज शंभुराजे ना घेऊन जंगलामध्ये छुप्या मार्गाने मथुरेला पोहचले कारण आग्र्यात सर्वांना

कळले होते की महाराज स्वराज्यात परतीच्या मार्गाने जातील म्हणून महाराजांनी मथुरे कडे धाव घेतली. तिथे पेशवे मोरोपंत यांचे सोयरे होते तिथं गेले. आणि तिथे चर्चा सुरू झाली की सर्वत्र पहारा कडक झालाय येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाची खूप कडक तपासणी होत आहे. त्यात ज्याचासोबत ९ वर्षाचे मुल आहे त्यांना तर बंदीच करत आहेत. शिवाय इतकी भाग दौड बाळ शंभुराजे ना झेपणार ही नव्हती किती पळावे लागेल याची काही कल्पना नव्हती. या सर्व बाबींचा विचार करून महाराजांनी निर्णय घेतला की शंभुराजे मथुरेत च राहतील. कृष्णाजी - केसोपंत त्रिमल यांच्या घरी त्यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई या पण होत्या. (कृष्णाजी, काशीराव किंवा काशीपंत, विसाजीपंत किंवा विश्वनाथ (कृष्णाजी हे मोरो त्रिमल पिंगळे म्हणजेच मोरोपंत पेशव्यांचे मेव्हणे होत. कृष्णजींनी अनेकदा उत्तरेच्या यात्रा केलेल्या होत्या. त्यांनी शंभू राजेंना पुन्हा दख्खन ला सुखरूप पोहोचवण्याची जबाबदारी स्वीकारली) त्यांनी राजेंना शंभू राजांच्या सुरक्षिततेची हमी दिली. अतिशय जड अंतःकरणाने महाराजांना हा निर्णय घ्यावा लागला होता. पण शंभुराजे ही तेवढे च समजूतदार होते त्यांनी महाराजांना पुढे जाण्यास सांगितले आम्ही आपल्या आज्ञेप्रमाणे राहू इथे असे म्हणून बापलेक एकमेकांना बिलगून निरोप घेत होते. आम्ही स्वराज्यात पोहचून इथले वातावरण शांत झाल्यास तुम्हाला परत नेण्याचा निरोप पाठऊ आणि सुखरूप तुम्हाला स्वराज्यात घेऊन जाऊ

असे वचन दिले आणि महाराज पुढील प्रवासाला अतिशय त्रासदायक तो क्षण होता पण महाराजांनी स्वतःला सावरून पुढे चालते झाले.आणि शंभुराजे एक टक आपल्या पाठमोऱ्या पित्याला पाहत राहिले डोळ्यात आसवे होती पण आपल्या आबासाहेब आणि स्वराज्याच्या हितापुढे त्यांना काहीही किंमत नव्हती. जैसे बाप शिव छत्रपती स्वराज्यासाठी कधी ही झुकले ना थांबले नाही तैसे शंभू बाळ ही तेची मार्ग चालण्या धजले नाही!!!.कधी साधू बैरागी फकीर अशे वेषांतर करीत बहिर्जी नाईक यांचे नियोजनाने महाराज आग्र्या तून बाहेर ही पडले आणि इतिहासात ज्याचे गुपित आहेत त्या मार्गाने महाराज राजगडावर पोहचले देखील. होय! आजपर्यंत इतिहासात कोणाला माहित नाही की महाराज कोणत्या मार्गाने स्वराज्यात पोहचले ते ही अगदी कमी वेळात जिथे महाराजांना आग्रा जाण्यासाठी 2 ते ३ महिने कालावधी लागला होता ते महाराजांनी आग्रा ते स्वराज्य राजगड ला अवघ्या २५ ते २८ दिवसांमध्ये पूर्ण केला होता. काय ते महाराजांचे नियोजन आणि दुरदृष्टी असेल. इकडे शंभुराजे कृष्णाजी च्या घरी त्यांचे बहिणीचे मुल म्हणून राहू लागले.घरामध्ये संस्कृत श्लोक शास्त्रांचा अभ्यास करू लागले समजावून घेऊ लागले. वेळी प्रसंगी काही हशमाना आपल्या समशेरीने ही तोंड देण्याची वेळ आली होती. पण इकडे औरंगजेबाच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी महाराजांनी राजगडावर अशी बातमी पसरवली की प्रवासामध्ये येताना

शंभुराजे निधन पावले आम्ही आमचे पुत्र गमावले असे सर्वत्र खबर पसरवली अर्थात हा त्यांचा गनिमी कावा च होता कारण शंभुराजे राहिले नाहीत आणि महाराज स्वराज्यात पोहचले हे समजल्यास बादशहा गस्त आणि पहारा कमी करेल आणि शंभुराजे यांना स्वराज्यात परत येण्यास अडथळा राहणार नाही.. पण एका पित्याला काय यातना झाल्या असतील आपल्या स्वतःच्या मुलांचे असे जिवंतपणी मरण बघण्याचा त्रास राजेंना किती झाला असेल याचा आपण विचार ही करू शकत नाही. येवढे काय तर महाराजांनी राजगडावर शंभू राजांच्या मरणोत्तर सर्व विधी दिवस घातले होते. विधी नुसार सर्व दहावे तेरावे घातले होते.स्वराज्यावर सर्वत्र या बातमी ने काळाचा घाला घातला होता. जेणे करून या सर्व बातम्या औरंग्याच्या कानी जाव्या आणि शंभुराजे ना परत येण्यास काही अडचण येऊ नये यासाठी हा सर्व खटाटोप!!! पण... मित्रानो इथे एक मनातून सांगावं वाटत की माझ्या राजेंची दुरदृष्टी किती अलौकिक होती हे तर आपण जाणतो च पण इथे या प्रसंगी जे महाराजांनी शंभुराजे यांचे विधी दिवस घातले होते त्याचा खोलवर त्रास होतो कारण आपल्याला माहीत आहेच की आपले शंभुराजे यांची हत्या ज्याप्रकारे झाली आहे त्यांचे शरीराचे जे हाल झाले त्यांच्या. मरणोत्तर विधी होऊ शकणार नाही हे जणू महाराजांना कळले असावे म्हणून माझ्या राजांनी आपल्या शंभूराजेंचे विधी दिवस तेव्हाच घातले की काय असा भास होतो !!!

अंगावर शहारा येतो..केवढी कठीण साधना..औरंग्याचा पोलादी पिंजरा तोडुन महाराज राजगडावर परतले तेंव्हा नऊ वर्षाच्या कोवळया शंभुराजांना त्यांनी उत्तरेतच ठेवले..आणि शत्रुला हुल देण्यासाठी अफवा उठवली शंभुराजे गेले..एवढ्यावरच थांबले नाहीत तर राजगडावर त्या लेकराचे दिवस सुधा घातले..काय झालं असेल एका पित्याच्या काळजाचं जेंव्हा जिवंत असलेल्या आपल्या गोजीरवाण्या बाळाच्या पिंडाला कावळा शिवताना महाराज बघत असतील..जणु महाराजांना आधीच कळले होते..या माझ्या रुद्रप्रतापी शंभुराजाच्या नशीबात त्याच्या बलीदानानंतर हे कुठलेच विधी नाहीत..ही राज्यसाधना..हा त्याग..हा महायोग..काय लिहावे पुढे??

मथुरेत शंभुराजे या ब्राह्मणी कुटुंबात राहून शास्त्र आणि संस्कृत श्लोक यांचा अभ्यास करून अजून तेजस्वी आणि ज्ञानी झाले.आणि काही कालावधीनंतर शिवाजीराजे राजगडी पोहचल्याची बातमी आग्र्याला पोचली आणि शंभुराजे हि त्यात वारले ही बातमी ऐकून तेंव्हा मुघलांची शोध मोहीम थांबली. रस्ता अधिक सुरक्षित झाल्यावर संभाजीराजांना घेऊन खुद्द राजगडी येण्याचा राजांनी निरोप पाठवून शंभू राजेंना स्वराज्यात परत आणण्याचे आदेश दिले. आणि शंभुराजे त्रिमल पिंगळे परिवारासोबत राजगडाच्या प्रवासासाठी निघाले. वाटेमध्ये काही ठिकाणी अडविण्यात आले पण

आपल्या बुद्धी चातुर्याने आणि गरज भासेल तिथे आपल्या तलवारीने पुढे प्रवास सुरू ठेवला आणि शेवटी स्वराज्यात जेव्हा राजगडावर डौलाने फडकत असलेला भगवा नजरेस पडला तेव्हा शंभुराजे च्या डोळयात सामावणार नाही एवढा तो आनंद आणि आभाळ भरून वाहणाऱ्या आसवांना जागा नव्हती त्यांनी झुकून आपल्या स्वराज्यभुमिवर आपले मस्तक टेकविले आणि नमन केले. गडावर ही महाराजांना खबर मिळताच पालखी मेना पाठवून सर्व लवाजमा घेऊन आऊसाहेब जिजाऊ, महाराज,शंभुराजेच्या सर्व मातोश्री आणि सदर मंडळी शंभूराजे यांच्या स्वागतासाठी पुढे गेले.आऊसाहेब पुढे होऊन शंभू बाळाला बिलगल्या चेहऱ्यावर मुके घेऊ लागले गोंजरू लागले. सर्वांचे डोळे पाण्याने भरून गेले. शंभुराजे जणू हरवलेले गाईचे वासरू आपल्या आई ला गोंजारत राहते तसे आऊसाहेब शंभू बाळाला गोंजारू लागले. महाराज ही पुढे होऊन शंभू बाळाला मनभरून पाहू लागले आणि आपल्या मिठीत सामावून घेऊ लागले. गडावर अगदी सणा सुदीचे वातावरण सर्वत्र होते. आणि अशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज औरंग्याच्या हाती तुरी देऊन मराठी स्वाभिमान जागा ठेऊन दिल्ली तख्त हादरवून सोडले आणि सुखरूप स्वराज्यात पोहचले आणि शंभुराजे सुद्धा स्वराज्यात सुखरूप पोहचले आणि शेवटी औरंग्यारुपी लांडग्याच्या काळ कोठडीतून शिव सिंह आणि छावा यांनी निसटून शिवप्रताप गाजवलाच आणि मराठी स्वाभिमान

उंचावण्यासाठी स्वराज्याच्या उंच आकाशात भरारी घेऊन अलौकिक अशी गरुडझेप घेतली !!!

राजगडावर देवीचा जागर पूजा ई. पार पडू लागले रयतेच्या पंगती झाल्या. रयतेमध्ये सुखं समाधनाचे वातावरण होते.

लष्करी फौजा आता पाऊसकाळात चार मास आपल्या मुलूखात परतून शेतीची कामे पहावी पीक पेरणी करावी कुटुंबासोबत वेळ घालववा. दसरा धरून कामावरती रुजू व्हावे आणि आठ मास मुलूखगिरी कामे करून पोट भरावे अशी स्वराज्यात पद्धत होती. सगळे काही सुरू होते. तेवढ्यात खबरी आल्या की शहजादा मुवाज्जम दक्षिणेत उतरला आहे. औरंगाबादची जसवंतसिंगची सुभेदारी काढून शहाजादे मुवाज्जम कडे ती सोपविण्यात आले आहे. राजांनी आपला गनिमी कावा बाहेर काढून हुजुरी करून शहजदयास बादशाहकडे रतबदली साठी आपला खलिता पाठवला. लगोलग आम्हाला आग्र्यातून निघावे लागले. बादशहास भेट घेणे शक्य झाले नाही त्याबाबत आम्हाला खेद आहे. तरी तुम्ही समजूत काढावी. तरी आपल्या पातशाहीमध्येच आमचे फर्जन्द संभाजी मनसबदार आहेत आमचे गडकोट तुमचेच आहेत, हे समजोन घ्यवे. सदरेवर या बाबत चर्चा सुरू असताना महाराज शंभुराजेकडे पाहत म्हणाले. “ शंभुराजे, हा सुलूख मान्य झाला तर तुम्हास शहजादे भेटीस औरंगाबाद जाणे पडेल, एकटे! जाल का ?” तसे

शंभुराजे म्हणले, " जी. जरूर आबासाहेब!" असा तो वीर पुत्र पित्याच्या एका शब्दावर कोणत्याही परिस्थितीसमोर तत्पर असायचा तो शिवपुत्र!!आणि सर्व नियोजन - खलबते करून ठरले आणि शंभुराजे शहाजादा मुवज्जम ला भेटायला निघाले सोबती काही मातब्बर सरदार घेऊन औरंगाबाद स्वारी! तिथे जाऊन शंभुराजे नी राजेंच्या मनी जे होते तसे सर्व कार्य सिद्धीस नेले. शहाजादा सोबत जवळीक साधून आपल्या कौशल्य बुद्धीने त्यांचे मनासारखे वागून मुघली मनसबदारी मिळवून स्वराज्यावरील मुघली संकट ही काही काळासाठी रोखून धरली. आता स्वराज्याला आदिलशाही बरोबरच मुघल शाही कडून ही काही काळ धोका टळला होता.शंभूराजे आपल्या पित्याच्या आदेशानुसार योग्य ती मुत्सद्देगिरी करून त्यांनी औरंगाबादची कामगिरी पार पडली होती आणि एक अस्सल राजकारणी खेळी करून ते स्वराज्यात पोहचले. आता महाराजांनी शंभुराजे यांना सदरेवर वेगळे हक्क अधिकार देऊ केले जेणे करून शंभुराजे स्वराज्याच्या राज्यकारभाराच्या कामकाजात लक्ष देऊ लागले आणि न्याय निवाडे ही करू लागले. आणि हे करत असताना त्यांचा मनातील लेखक, कवी नेहमी जागृत असायचा त्यांना वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी १२ ते १४ भाषा अवगत होत्या राजकारभार आणि राजकारणाशी जेव्हा. ते दूर असतं तेव्हा त्यांचं कवी मन नेहमी बाहेर डोकावत असे आणि आपल्या आबासाहेब, त्यांचे पराक्रम आणि स्वराज्य कारभार या सर्व गोष्टी त्यांचा कवी

मनात घर करून गेल्या तर होत्याच त्यांनी तेव्हा एव्हढ्या लहान वयात संस्कृत भाषेमध्ये ग्रंथ लिहला ज्याचे नाव होते ' बुधभूषणम'. 1671 साली संभाजी राजेंनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी आपल्या वडिलांच्या गुणवत्तेचे प्रतिभाशाली भाषेत वर्णन केलेले आहे. तीन भागांतील बुधभूषण या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विविद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. तसेच राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लगार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेंची माहिती दिली आहे. संभाजीराजांना आपल्या पराक्रमाचा, विद्वत्तेचा अहंकार नव्हता, बडेजाव नव्हता. प्राच्यविद्या पंडित शरद पाटील यांच्या मते, संभाजीराजांनी केवळ संस्कृतच नव्हे तर हिंदी, पर्शियन, इंग्रजी भाषेवरदेखील प्रभुत्व संपादन केलेले होते. त्यांनी ‘नखशिख’ , ‘नायिकाभदे’ आणि ‘सातसतक’ हे तीन हिंदी ग्रंथ लिहिले होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या शिष्टमंडळाबरोबरच ते रायगडावर इंग्रजीमध्ये बोललेले आहेत. यावरून स्पष्ट होते, की संभाजीराजे महाबुद्धिमान, विवेकी राजकारणी होते. पुढे राजांनी पुत्राकडून सदरेवर तो ग्रंथ ही वाचन करून घेतला आणि ते ऐकून सर्व मंत्री सरदार आणि मातोश्री अगदी भारावून गेले. महाराज ही शंभुराजे आणि त्यांचे ज्ञान पाहून अगदी अभिमानाने फुलून गेले.त्याचबरोबर

शंभुराजे आणि येसूबाई मध्ये ही काव्यावर नेहमी चर्चा होत असे. येसूबाई शंभूराजेच्या लेखनाला नेहमी योग्य ती दाद द्यायची. त्यात शंभुराजे नी आपल्या यूवराज्ञी येसूबाई यांच्यासाठी अतिशय सुंदर असे एक ओळीचे काव्य लिहले होते.जे असे होते," श्री सखी राज्ञी जयति !* काव्य जरी एक ओळीचे होते पण त्यामध्ये खूप मोठा अर्थ होता.पत्नी प्रेम आणि स्त्री आदर याचे ते उदाहरण च होते.आपल्या सहचारिणी बद्दल प्रेम आणि मान वाढविणारे होते. आता वेळ होती ती पराक्रम गाजवण्याची!! शास्त्र तर पाहीले शस्त्रावरील शंभुराजे यांची उत्तम पकड तर होती आता शस्त्र ज्ञान परखण्यची वेळ होती. आणि महाराजांनी आदेश दिला आणि शंभुराजे ची प्रत्यक्ष पहिली लढाई त्यांच्यावर सोपवली. गुजरात मधील खंबत प्रदेशवर चालून जायची. आणि तेथील गड जिंकून आणायची. आणि शंभुराजे नेहमी प्रमाणे आबासाहेब आणि त्यांचा शब्द जीव की प्राण मानून तलवार म्यानात घेऊन लगेच घोड्यावर टाच मारायला तयार!!

1667 साली शिवरायांनी शंभूराजांना गुजरात मोहिमेवर पाठविले होते. त्याप्रसंगी संभाजीराजे आपल्या सैनिकांशी कसे वागले, याचे वर्णन फ्रेंच लेखक आबे कॅरे यांने केलेले आहे. संभाजीराजे आपल्या ज्येष्ठ सरदारांशी अत्यंत आदराने वागतात. सहकारी सैनिकांना अत्यंत प्रेमाने वागवितात. जखमी सैनिकांची स्वत: विचारपूस करून त्यांना आस्थेने मदत करतात.

संभाजीराजांच्या पराक्रमाबरोबरच त्यांच्या विनयशील आणि प्रेमळ स्वभावाचेही आबे कॅरे वर्णन करतो. आणि आपल्या पराक्रमाने शंभुराजे हा गड सर करून स्वराज्यात आपली पहिली लढाई जिंकून भगवा फडकवितात. आपल्या मावळयासोबत अतिशय अवघड अशी मोहीम आखून कडवी झुंज देऊन जिंकलेल्या गडाला नाव देतात ते ' झुंजारगड ' आणि इकडे महाराजांना जेव्हा ही खबर मिळताच अभिमानाने सदरेवर शंभुराजे यांचा पराक्रम ऐकून गर्वाने बापाची छाती फुगून येते. नंतर पेशवा मोरोपंत पिंगळे यांच्यासोबत संभाजी यांनी कोलवान येथे विजय अभियानात मराठा सेनेचे नेतृत्व केले होते.हे सर्व सुरू असताना

एके दिवशी मथुरेहून कवी कलश नावाने एक व्यक्ती स्वराज्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम आणि संभाजी महाराजांचे अलौकिक ज्ञान आणि लेखन यांच्या ओढीने तो सर्व घरदार सोडून स्वराज्याच्या रायगडी पोहचला. स्वतः एक उत्तम कवी असून त्यांना शंभुराजे च्या लेखनाची भूरळ पडली होती. आग्रा स्वारीत जेव्हा शंभुराजे मथुरेत राहिले होते त्या ठिकाणी कृष्णाजी पंत कडून शंभुराजे चे संस्कृत ज्ञान आणि लेखन यांच्याबद्दल ऐकून तो हरवून गेला होता आणि त्या ओढीने तो स्वराज्यात पोहचला होता. शंभुराजे यांनी कवी कलश मधील कवी मन आणि लेखन हेरले होते. आणि मनाने एकदम स्वच्छ आणि निस्वार्थ भावना ने शंभुराजे

कवी कलश वर खुश झाले.आणि जेव्हा 2 कवी मन जुळतात तिथे मैत्रीचे फुल जोमात बहरते आणि तेच झाले शंभुराजे आणि कवी कलश ची अशी मैत्री झाली की अक्षरशः मृत्यूच्या दारात ही ज्या मरण यातना शंभूराजे नी सोसल्या त्या सर्व कवी कलशावर अगोदर येत होत्या. मरणात ही साथ देणारी ही अतूट आणि आणि अमर मैत्री म्हणजे शंभू - कलश मैत्री !!!. काही कारभारी मंडळी मात्र शंभुराजे वर नाराज होते. काही भ्रष्ट कारभाऱ्यांना शंभुराजे यांचे कडक शासन आणि शिस्तीमुळे ते खुपत असत.त्यातच १६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा डोळे दिपवणारा राज्याभिषेक सोहळा झाला आणि युवराज म्हणून शंभुराजे यांचा अभिषेक करण्यात आला.त्यांचे अधिकार वाढले. आणि तोपर्यंत संभाजीराजे राजकारणातील लहान - मोठे बारकावे आणि रणांगणातील डावपेचांमध्ये तरबेज झाले होते. त्यांच्या विनम्र स्वभावाने राज्याभिषेकासाठी रायगडावर आलेल्या प्रतिनिधींना त्यांनी आपलेसे केले.आणि यातच काळ पुन्हा शंभुराजे वर नजर ठेऊन होता जणू आणि राज्याभिषेकसोहळ्याचे १० दिवस सरतात ना सरतात तो पर्यंत आऊसाहेब जिजाऊ महाराज आणि शंभुराजे यांना सोडून काळाच्या पडद्याआड निघून गेल्या. शंभुराजे च्या डोक्यावरील मायेचे दुसरे छत्र ही हरवले. जिजाऊ आऊसाहेब शंभुराजे साठी त्यांच्या मातोश्री सईबाई साहेबांच्या ही वरच्या स्थानी होत्या. आणि अशा या राजमाता जिजाऊ आऊसाहेब शंभुराजे ना

पोरक करून अनंतात विलीन झाल्या. जिजाऊ साहेबांच्या पश्चात आता या बालवयापासूनच शंभुराजे वर आता मुद्दाम काही ही आव आणायचा प्रयत्न सुरु झाला. अण्णाजी दत्तो यांना विशेष शंभुराजे खुपत होते. रयतेकडून शंभुराजेकडे अण्णाजी विरुद्ध तक्रारी यायच्या आणि शंभुराजे त्यांना समजावून ही सांगत पण अण्णाजी पंतांनी आपली कपट निती सुरू च ठेवली तसेच सोबती दुसऱ्या कारभारी मंडळी ला घेऊन शंभुराजे विरुद्ध कारस्थाने करू लागली. स्वार्थी कपटी कारभारी मध्ये शंभुराजे वर नाराजी होती.हे महाराजांना ही हळूहळू ते कळू लागले पण त्यांनी दुर्लक्ष केले. मातोश्री सोयराबाई च्या मनात ही आपले पुत्र राजाराम राजे यांची पुत्र लालसा जागृत केली. तुमचे पुत्र हे खरे वारसदार आहेत महाराजांचे सर्व काही शंभुराजे कडे लक्ष आहे असे म्हणून कारभाऱ्यांनी सोयराबाईंचे ही मन वळविले. वेळोवेळी शंभुराजे च्या बदनामी चे कट गडावर रचू लागले. त्यांच्या विरुद्ध खटले निवाडे भरू लागले. अशा निर्मळ आणि स्वच्छ मनाच्या माझ्या शंभू राजांवर या कपटी वृत्तीच्या कारभाऱ्यांनी खालच्या थराला जाऊन स्त्रीलंपट पणाचे आरोप ही शंभुराजे वर करण्यात आले. खुद्द महाराजांसमोर शंभुराजे वर निवाडे चालवण्यात येऊ लागले.पण महाराजांना पूर्णतः विश्वास आपल्या शंभुराजे वर होता. संभाजी महाराजांचा अमात्य अण्णाजी दत्तोंच्या भ्रष्ट कारभाराला सक्त विरोध होता. पण महाराजांनी अण्णाजी हे अनुभवी आणि कुशल प्रशासक

असल्यामुळे त्यांच्या भ्रष्ट कारभाराकडे अनेकदा दुर्लक्ष केले. पण संभाजी महाराजांना ते मान्य होणे कठीण होते.गडावर शंभुराजे यांचे चरित्र खराब करण्याचे षडयंत्र वेळोवेळी रचले गेले. अनेक निनावी आणि बनावटी स्त्रियांशी त्यांचे नाव जोडले गेले त्यांचे चारित्र्य हनन केले गेले त्यासोबत च आय्याश व्यसनी स्त्रीलंपट ई. असे घाणेरडे आरोप त्यावेळी करण्यात आले. आणि या वर निवाडे भरू लागले जेणेकरून या सर्व खोट्या नोंदी ही होऊ लागल्या आणि स्वराज्यावर तर परिणाम होतच पण स्वराज्या बाहेर यांच्या अशा नोंदी गेल्या आणि हेच कारण आहे की या खोट्या नोंदी आजतागायत आपल्या राजांच्या चारित्र्याला बदनामीच्या चिखलात रुजवत गेल्या. येथून च सुरुवात झाली आणि आपले दुर्दैव हेच आहे की या खोट्या नोंदीमुळे माझ्या शंभूराजा आज ही बदनाम करून टाकला काही अण्णाजी च्या बेवारस औलादिने!! चीड येते असल्या फालतू विचारसरणीची जिच्यामुळे माझ्या राजाला एवढी बदनामी आजतागायत भोगावी लागत आहे. पण इथे एक च विनंती आहे वाचकांना की आपल्या संभाजी राजांचे शिल चारित्र्य नेहमी स्वच्छ आणि निस्वार्थ राहिलेले आहे. आपल्या पित्याच्या स्वराज्यासाठी जीवाची आहुती देणाऱ्या माझ्या शंभुराजे चे बलिदान कधीच विसरू नका.

छत्रपती शिवाजी महाराज आता दक्षिण दिग्विजय मोहीम आखू लागले. त्यामध्ये शंभुराजे पण सोबत जाणार हे नक्की होते पण तिथे ही या

कारभाऱ्यांनी कडाडून विरोध दर्शविला आणि महाराजांना इथे पेचात पाडले. वेळोवेळी महाराजांना हे सर्व कळत होते. पण मुत्सद्दी कारभाऱ्यांना विरोध करणे त्यांना स्वराज्याहिताचे वाटले नाही. त्यात बहिर्जी नाईक यांच्याकडून खबरा मिळतच होत्या की औरंगजेबाने स्वराज्यावर चालून जाण्यासाठी आपला कपटी क्रूर अशा दिलेरखान यास फौज घेऊन पाठवण्याचा बेत आहे. आणि दिलेरखान या वेळी कोकणातून स्वराज्यात उतरणार आहे. एकीकडे स्वराज्यावर चालून येणारे दिलेरखानाचे संकट आणि दक्षिण मोहिमेत शंभुराजेला घेऊन जाण्णायास होणारा विरोध या सर्व गोष्टींना महाराजांनी अतिशय हुशारीने सुवर्णमध्य काढला आणि कोणाला ही लक्षात येणार नाही असा तो गनिमी कावा तयार केला. शंभुराजे आणि महाराज या दोघांची बंद दाराआड चर्चा झाली. आणि दोन्ही गोष्टीवर तोडगा महाराजांनी अतिशय चातुर्याने काढला होता. आता शंभुराजे दक्षिण मोहिमेत जाऊ नये असे कारभारी मंडळींना वाटत होते त्याप्रमाणे झाले. महाराजांनी शंभुराजे दक्षिण मोहिमेत न येता शृंगारपूर ला सुभेदार म्हणून जातील असे आदेश देण्यात आले. आणि शंभूराजे नाराज होऊन रागातच गडावरून पायउतार होऊन शृंगारपुरास निघून गेले. या वरून शंभूराजे आणि महाराजामध्ये बे-बनाव निर्माण झाला असे भासवले गेले. आणि बाप - लेकाचा हा कावा इथून सुरु झाला. कारभाऱ्यामध्ये हि कुजबुज सुरु झाली आणि हेरामार्फत हि खबर

दिलेरखानाकडे हि पोहचली. आणि हेच महाराजांना पाहिजे होते. इकडे गडावर कारभारी या गोष्टींना वेगळा दुजोरा देऊन शंभू राजेंविरुद्ध कट-कारस्थाने करू लागले. आणि तिकडे दिलेरखान आता मनोमन खुश होता कि, शंभूराजे आता नाराज आहेत आणि अशा वेळी आपण त्यांच्यापुढे मैत्रीचा हाथ पुढे करून त्यना आपल्या कडे वळवून घेण्यात यशस्वी नक्की होऊ असा गैरसमजात तो राहू लागला. आणि तो आता मैत्रीचे नजराणे - पत्रे शंभूराजेंना पाठऊ लागला. आणि जाणून बुझून ती पत्रे स्वराज्याच्या हेराच्या हाती लागतील अशी हि तजबीज करू लागला. या सर्व गोष्टीने गडावरील कारभारी मात्र शंभूराजेंना स्वराज्यद्रोही सिद्ध करण्यासाठी कंबर कसु लागले. त्यात शृंगारपूरला त्यांनी कवी कलाशासोबत मिळून कालीची उपासना केली आणि नंतर महाराजांच्या मृत्यू हेतूने कलशाभिषेक करून घेतला. असे नको नको ते आरोप शंभुराजे यांच्यावर करण्यात येऊ लागले शृंगारपूरला शंभूराजे असताना असे अनेक त्यांचे मंत्र्यांशी खटके उडत होते. स्वराज्याचे कारभारी शंभुराजे यांना डावलून त्यांना स्वराज्य द्रोही सिध्द करू लागले त्याने शंभुराजे चिडून आता मोघलाई मध्ये सामील होतील आणि दिलेरखानाकडे येतील असा सगळं नियोजनबध्द सर्व महाराज आणि शंभू राजेंच्या गनिमी काव्याप्रमाणे सर्व काही घडत होते. तसेच शृंगारपुरातून शंभुराजे आणि दक्षिणेतून छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामध्ये या सर्व घडामोडी बाबत गुप्त

पत्रव्यवहार होत असे.जो कोणालाही माहित नव्हता. अखेर शंभुराजेना गडावरील मुजोरी आणि आरोपसत्र हे सर्व सहन न झाल्याने आपण दिलेर खानकडे जात आहोत असे ठरलेल्या नियोजनाप्रमाणे भासवून ते सज्जन गडावरून तिथे जवळ च असलेल्या माहुलीच्या तीरावर असलेली दिलेर खानाच्या छावणीकडे आपला घोडा दौडविला. आणि स्वराज्यात ही बातमी पोहचली. इकडे महाराज दक्षिण मोहीम यशस्वी करून गडावर पोहचले होते. आणि सर्वांनी शंभुराजे स्वराज्य द्रोही म्हणून खटले चालवले. पण बाप लेकाचा हा गनिमी कावा इथेच ना थांबता सुरू राहिला.शंभुराजे दिलेरखानच्या छावणी मध्ये राहून स्वराज्य राखीत होते. पण इकडे गडावर कारभारी मंडळी त्यांच्या विरुद्ध कट कारस्थाने रचतच होती पण छत्रपती शिवराय हे सर्व शांतपणे पाहत होते.शंभुराजे यांच्यासोबत त्यांचे अंगरक्षक ज्योत्याजी केसरकर आणि रायप्पा होते. त्यात काही कादंबरी मध्ये किंवा मालिकेमध्ये जसे आपण पाहतो शंभू राजांच्या ताईसाहेब रानु अक्का ही सोबत होते असा ही संदर्भ काही ठिकाणी आहे. कालांतराने दिलेरखान कित्येक वर्षे स्वराज्याच्या सीमेवर जाऊन बसला आहे आणि काही यश मिळाले नाही हे पाहून बादशाह औरंगजेब तिकडे चिडून होता. त्यामुळे त्याने दिलेरखानला आदेश देऊन सुनावले की, शंभुराजे ना स्वराज्यातील किल्ल्यावर चालून जाण्यास सांगितले. शंभुराजे यांनी साफ नकार दिला पण

आपला उत्तर दिग्विजय डोक्यात मनसुबा घेऊन छावणीत आलेले शंभुराजे नाईलाजाने एका मोहिमेसाठी तयार झाले आणि भुपाळगडावर दिलेरखान आणि शंभुराजे ची फौज चालून गेली आणि आपल्या काव्यामद्ये ठरल्याप्रमाणे तो गड दिलेरखान ला जिंकू दिला. आता कालांतराने शंभुराजे काही आपल्या मर्जीप्रमाणे वागत नसल्याचे पाहून औरंगजेबाच्या मनात कपट सुरू झाले शंभुराजे ना कैद करून दिल्लीला घेऊन यावे असे मनसुबे आखू लागला आणि आपल्या हेरखात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांनी शंभुराजे आणि शिवरायांना याची कल्पना दिली. आणि शंभुराजे नी आता छावणी सोडण्याचा विचार केला. आणि त्याप्रमाणे योजना आखु लागले.जोखीम खूप होती पण शंभुराजे, बहिर्जी आणि छत्रपती शिवरायांच्या बुद्धी चातुर्याने शंभुराजे छावणीतून बाहेर निसटण्यात यशस्वी झाले आणि तिथून पन्हाळगडावर सुखरूप पोहचले. छत्रपती शिवराय जेव्हा दक्षिण मोहिमेस निघालेले पाहून जो दिलेरखान स्वराज्यावर चालून येणार होता. महाराजांच्या आणि शंभू राजांच्या या गनिमी काव्यामुळे सीमेवर च घुटमळत राहिला आणि शंभू राजेंनी त्याला एक ते दीड वर्षे तिथेच झुलवत ठेवले. आणि छावणीत सुखरूप बाहेर ही पडले.आता मात्र कारभारी परेशान झाले त्यात ही त्यांनी शंभुराजे गडावर येऊ नाही यासाठी शक्य ते प्रयत्न सुरू ठेवले. आण्णाजी दत्तो, सोमनाथ राहुजी, मोरोपंत पिंगळे आणि सोयराबाई असे अनेक कारभारी

मंडळी या कटात सामिल होते.आणि अखेर दोन ते अडीच वर्षांनी महाराजांनी शंभुराजे ना भेटण्याचे ठरवले आणि ते सरळ निघाले पन्हाळगड कडे. आपल्या छाव्याला भेटण्यासाठी हा शिव सिंह निघाला. त्यात ही कारभाऱ्यांनी अनेक प्रकारे अडविण्याचा कपटी प्रयत्न केला पण आता शिवरायांना शंभुराजे ना भेटण्याशिवाय दुसरे काहीच महत्वाचे नव्हते. आणि कित्येक संकटे पार पाडून पन्हाळगडावर भवानी मातेच्या मंदिरात बापलेक कडाडून मिठी मारून भेटले.सर्व रयतेच्या डोळ्यात पाणी होते.एका बापाचे काळीज आपल्या बाळासाठी किती आसुसले होते हे पाहून पूर्ण रयत भारावून गेली. महाराजांच्या सोबत सरसेनापती हंबीरराव होते. बापाची लेकराला भेटण्याची तळमळ त्यांना वेळोवेळी दिसत होती.तिथे महाराज आणि शंभुराजे बरेच दिवस सोबत राहिले.आपला लेक सुनबाई आणि नातीसोबत खूप सुखाचे क्षण महाराजांनी तिथे घालवले.स्वराज्य विस्तार आणि स्वराज्याचे भविष्य या सर्व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा ही झाली. स्वराज्याचे भावी छत्रपती म्हणून महाराजांनी इथेच शंभुराजे ना इशारा दिला होता आणि हंबीरराव ही हे पाहून खूप आनंदी होते.काही दिवस सोबत राहून महाराज गडावर परत जाण्यास निघाले. आणि शंभुराजे ना पुढील निरोप लवकरच पाठवून रायगडवर बोलावू म्हणून तिथून निरोप घेतला. पण स्वराज्यावर चालून येणाऱ्या संकटाची चाहूल लागल्यामुळे महाराजांनी शंभुराजे ना मागे

ठेवले होते.आणि महाराज एकटे रायगडवर पोहचले. कालांतराने राजाराम राजेंचे लग्न ही ठरले इथे ही कारभारी आणि सोयराबाई कडून शंभुराजे ना जाणीवपूर्वक डावलण्यात आले.त्यांना लग्नाला ना येऊ देण्यासाठी शक्य ते प्रयत्न केले आणि यशस्वी ही झाले. शंभुराजे आपल्या लाडक्या भावाच्या लग्नाला ही नाही येऊ शकले. याच्या वेदना शंभुराजे आणि येसूबाई दोघांना ही झाल्या होत्या. असेच दिवस सरत गेले. पण स्वराज्याला नजर लागावी की काय आणि काही दिवसाने काळ इतका भयंकर वादळ घेऊन स्वराज्यावर आलं की उभ्या स्वराज्याचे दैवत, आपले छत्रपती आता बिछाण्याला खिळले. फुलातून जसा सुगंध नाहीसा व्हावा, फळातून जसा गोडवा नाहीसा व्हावा. निसर्गातून जशी हिरवळ निघून जावं असं सर्व वातावरण झाले होते.महाराज आपले शेवटचे दिवस मोजत होते आणि एकच इच्छा होती त्यांची की शंभुराजे ना गडावर बोलवावे. पण निर्दयी आणि कपटी कारभारी यांनी सोयराबाईंना हाताशी घेऊन आपला डाव साधला होता. गडाचे दरवाजे बंद करून कोणतीही खबर बाहेर जाऊ दिली नाही अर्थात शंभुराजे ना सुद्धा त्यांनी ही खबर लागू दिलीं नाही. बरेच दिवस महाराज शंभुराजे ना भेटण्यासाठी तळमळत राहिले. महाराजांचे खाणेपिणे बंद झाले सतत शंभूबाळ.. शंभुबाळ म्हणून साद घालीत होते. कालांतराने मुखातून शब्द हि फुटत नव्हते. आणि हनुमान जयंती दिवशी १६८० मध्ये महाराज स्वराज्याचे

छत्रपती अनंतात विलीन झाले. वर्षोनुवर्षे धगधगत राहून आदिलशाही-निजामशाही-कुतुबशाही मुघलशाही तसेच इंग्रज, डच, पोर्तुगीज ई. परकीय सत्ताच्या काळजात धडकी भरवणारा तेजस्वी असा शिवसूर्य मावळला होता. लहानपणापासूनच आऊसाहेब जिजाऊ आणि शहाजीराजेंच्या स्वप्नासाठी म्हणजेच स्वराज्यासाठी शिवराय आपले सर्वस्व अर्पण करून झटत राहिले. स्वराज्य आणि रयत हाच त्यांचा श्वास आणि ध्यास बनला होता. महाराजांनी कधी वैयक्तिक सुख , संसार आणि भावनांना स्वराज्यापुढे कधीच थारा दिला नाही. अगदी आपली लहान मुले कधी मोठी होत गेली हे सुद्धा पाहायला त्यांना सवड मिळत नसे. स्वराज्य विस्तार आणि रयेतेचे सुख समाधान हेच त्यांचे प्रथम ध्येय होते. महाराजांनी इतकी ३६५ किल्ले जिंकले त्यातील काही स्वतः बांधली पण त्यांनी कधीच कोणत्याच किल्ल्यांना स्वतःचे नाव देण्याचा विचारसुद्धा कधी केला नाही. महाराजांनी स्वराज्य फुलवलं आणि प्रचंड प्रमाणात वाढवलं होत. रयतेच्या जीवनात सुखाची पहाट व समाधानाची सकाळ घेऊन येऊन स्वराज्याचा शिवसुर्य अखेर मावळला होता !!!

स्वार्थी आणि कपटी कारभारी मंडळी आपला डाव साधण्यास मोकळे झाले होते. महाराज गेले ना गेले तो पर्यंत शंभुराजेच्या विरोधात कट रचून त्यांनाच जेरबंद करण्याची योजना आखली आणि सोयराबाईंनी आदेश काढले की शंभू राजेंना जेरबंद करावे तसेच मोठा मुलगा असताना ही

मुलाच्या आंधळ्या प्रेमापोटी सोयराबाईंनी राजाराम राजेंचा मंचकारोहन सोहळा करून टाकला. आणि आता शंभु राजेंना अटक करण्याचे आदेश कारभाऱ्यासोबत घेऊन सरसेनापती हंबीरराव जे सोयराबाईंचे सख्खे भाऊ होते यांच्याकडे पाठवले. त्यांना सोबत घेऊन शंभू राजेंना अटक करा असे आदेश सोयराबाईंनी काढले.या सर्व कट कारस्थान सुरू असताना इकडे शंभुराजे ना आपल्या आबासाहेबांच्या निधनाची बातमी कळली आणि तिथेच शंभुराजे कोसळले त्यांना विश्वास बसत नव्हता की आपले आबासाहेब आपल्याला सोडून गेले आहेत.येसूबाई आणि धाराऊ शंभू राजेंना सावरण्याचा पुरेपूर प्रयत्न करू लागले. आणि त्यासोबत च कारभारी मंडळींनी आबासाहेब गेल्यानंतर जो डाव आखलाय आणि स्वराज्य धोक्यात आणले आहे हे सर्व शंभू राजेंना लक्षात आणून दिले. आणि शंभुराजे ही आता रागात होते की या स्वार्थी आणि कुकर्मी कारभाऱ्यांमुळे आम्ही व आबासाहेब शेवटी एक वेळ भेटू सुद्धा शकलो नाही.या विचाराने शंभुराजे पेटून उठले होते. तेवढयात त्यांना खबर मिळाली की, रायगडावरून अण्णाजी पंत व इतर कारभारी शंभुराजे ना अटक करण्याचे आदेश घेऊन येत आहेत.तसेच सोयराबाईंनी राजमाता म्हणून सरसेनापती हंबीरराव मोहिते वर म्हणजेच आपल्या भावावर ही जबाबदारी सोपवली. तसे आदेश घेऊन अण्णाजी पंत आणि कारभारी सरसेनापती हंबीररावांकडे पोहचले. आणि फौज घेऊन हंबीरराव अण्णाजी पंत व कारभारी

शंभुराजे ना जेरबंद करण्यासाठी पन्हाळगडाकडे रवाना झाले.शंभुराजे आणि त्यांचे सहकारी ही सतर्क झालेले होते. मित्रांनो! इथे काही प्रश्न मनात गोंधळ घालतात की, छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे सर्व रयतेसाठी देवच होते. आणि ही कारभारी मंडळी महाराजांच्या एका शब्दावर जीवाचे रान करायचे आणि महाराजांनी किती तरी मोठे संकट आणि योजना याच कारभारी मंडळीच्या साथीने पार पाडले होते. मग त्याच महाराजांच्या पुत्राला अशी वागणूक का दिली जात होती??का शेवटच्या क्षणी त्या पुत्राला आपल्या पित्यापासून का तोडले गेले? छत्रपतींचे पुढचे वारस म्हणून स्वतः महाराजांनी ज्या पुत्रामध्ये सर्व पात्रता पहिल्या त्याच युवराजाना अस का डावललं गेलं?ज्या शंभुराजे साठी आपले आबासाहेब च सर्वस्व होते त्यांना शेवटचं का पाहू सुद्धा शकले नाही ? खरचं! शोकांतिका आहे की आपल्याच सोबत आणि जवळ असणारी माणसे आपल्या बाबतीत च कटकारस्थान करतात या पासून स्वतः छत्रपती सुटू शकले नाहीत तर आपण कोण!!!

आता सोयराबाई यांच्या आदेशाने अण्णाजी पंत व इतर कारभारी सरसेनापती हंबीरराव यांचा कडे तळबीड ला पोहचले होते आणि राजमाताकडून आलेला राज आदेश हंबीरराव यांचा कडे सुपूर्द केला आणि त्यांना फौज घेऊन पन्हाळगडावर शंभुराजे ना अटक करण्यासाठी सोबत येण्यास सांगितले. पण सरसेनापती हंबीरराव हे स्वतः पन्हाळगडावर

महाराजांच्या सोबत च होते ज्यांनी प्रत्यक्षदर्शी पाहीले आणि ऐकले होते की शिवरायांनी स्वतः शंभुराजे स्वराज्याचे भावी छत्रपती तुम्हीच म्हणून घोषित केले होते आणि पिता - पुत्राची ऐतिहासिक भेट डोळयांत आसवे भरून त्यांनी पहिली होती.पण आज आपल्या बहिणीच्या आणि कारभाऱ्यांच्या कटामध्ये ते मला सामील करून शंभुराजे ना अटक करावे अशी योजना आखली आहे. हे हंबीररावांना वेळीच ध्यानात आले होते.अण्णाजी पंत शंभुराजे बद्दल उद्धट व अपमानजनक बोलत होते तेव्हा हंबीररावांनी अण्णाजी पंतला तिथे त्याची योग्य लायकी दाखवली च होती.शाब्दिक वाद होऊन शेवटी राज आदेश आहे आणि तो पाळावा लागेल असे सांगून सरसेनापती हंबीररावांना घेऊन फौज पन्हाळगडाकडे रवाना झाली.या सर्व हालचालींवर शंभुराजे ही लक्ष ठेऊन होतेच आणि पूर्ण तयारीत ही होते.वडिलांच्या देहावसणाच्या वेदणेतून अजून ते सावरले ही नव्हते तो पर्यंत हा दुसरा घाव त्यांच्या मनावर घातला होता.त्रास होताच पण राग ही त्यांच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेला होता. पन्हाळगडाला वेढा देऊन अण्णाजी पंत, कारभारी आणि हंबीरराव शंभुराजे समोर गेले. आणि अण्णाजी पंतांनी शंभुराजे वर झालेले आरोप आणि गुन्हे वाचून दाखवून तुम्हास शिक्षा म्हणून अटक करण्याचे आदेश रायगडावरून स्वतः राजमाता सोयराबाईंनी दिले आहेत असे मुजोरी सांगू लागले. त्यांच्या बोलण्यात एक वेगळाच गर्व आणि मग्रुरी होती. आपण रचलेले कट कारस्थान

आणि शंभुराजे विरुद्ध आखलेले सर्व मनसुबे आता पूर्णत्वास जात आहेत अशा विश्वासात अण्णाजी पंत बोलत होते."हंबीरराव, अटक करा शंभू राजेंना!!!" असे ओरडुन सांगितल्यास इथे मात्र हंबीरराव गरजले आणि वेळ जागेवर बदलली, "स्वराज्याचे भावी छत्रपती असलेले शंभू राजे यांना मी अटक करेल असा तुम्ही इचार च कसा केलात अनाजी पंत???" स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांनी माझ्या डोळ्यासमोर ज्यांना स्वराज्य राखण्यची जबाबदारी दिली त्यांना अटक करायला तुम्ही आलातच कसं?? आणि असे म्हणून हंबीरराव आणि फौजेने अण्णाजी पंत आणि कारभाऱ्यांवर तलवारी रोखल्या. शंभुराजे मात्र इथे हंबीररावांनी बोललेल्या प्रत्येक शब्दाने भारावून गेले होते आणि मामासाहेब म्हणून त्यांनी कडाडून मिठी मारली. संकटाच्या वेळी खंबीर हाथ आपल्या पाठीवर रहावा तसा हाथ हंबीररावांनी ऐन वेळी शंभुराजे च्या पाठीशी ठेवला होता. आणि शंभुराजे आता रागाने अण्णाजी पंत आणि कारभारी यांच्यावर गरजले. "ज्या छत्रपती नी तुम्हाला स्वराज्य रयतेचे राज्य तुम्हाला दिले तुम्हाला मान सन्मान दिला त्यांच्याच मुलाविरुद्ध तुम्ही कटकारस्थान रचले." आणि एवढंच नव्हे तर आम्ही आबा साहेबांना शेवट च बघू शकलो नाही एवढं मोठं दुःख आमच्या वाट्याला तुम्ही आणलात का आणि कशासाठी येवढं द्वेष आमचा? आज तुम्ही आम्हाला अटक करायला आलात पण तुम्ही विसरलात की आम्ही छावे आहोत. शूर आबाचे शूर छावे

आहोत!!.

शंभुराजे अण्णाजी पंतावर चालून जाऊन कडाडले, "शंभूराजेंना हरवेल असे रणांगण या भुतलावर नाही आणि आबासाहेबांनंतर आम्हाला रडवेल असे दु:ख जगाच्या पाठीवर नाही." आणि आलेल्या सर्व कारभाऱ्यांना जेरबंद करून टाकले. आणि शंभूराजेनी आता रायगडावर जाण्यास सज्ज झाले. आणि हा सर्व प्रकार सोयराबाईंच्या महाली कळला आणि सोयराबाई घाबरल्या त्यांना काही सुचेना की काय घडलय शंभुराजे आता गडावर आल्यास काय करतील याची भीती वाटू लागली. महाराज गेल्यानंतर शंभुराजे येवढ्या काळानंतर रायगडवर येत आहेत आणि ते ही अशा परिस्थितीत!! हंबीरराव यांनी सख्खे रक्ताचे नाते असताना ही आपली बहीण सोयराबाई आणि भाचे राजाराम यांचा विचार ना करता स्वराज्य हितासाठी योग्य तो निर्णय घेतला होता. स्वराज्यनिष्ठेचे अद्वितीय उदाहरण हंबीररावांनी डोळ्यासमोर ठेवले होते. कैद्यांना घेऊन शंभुराजे रायगडावर पोहचले होते सर्व रयत कित्येक वर्षांनी शंभू राजेंना पाहण्यासाठी आसुसलेली होती. मावळातून रयते ची गर्दी गडावर जमली होती. शंभू राजे सर्व स्वागत रयतेची भेट घेऊन सरळ निघाले ते सोयरा मातोश्री यांना भेटण्यास. कारण कारभारी कट कारस्थान करत होती ती वेगळी गोष्ट पण आपल्या मातोश्री या सर्वांमध्ये साथ देत होत्या याच विचाराने शंभुराजे व्याकूळ झाले होते. आणि याचा खुलासा

घेण्यासाठी शंभुराजे सोयरा मातोश्री ना भेटण्यास त्यांच्या दालनात गेले आणि एकांतात बोलू लागले. सोयराबाईंनी सर्व काही शंभुराजे समोर मान्य केले आणि आपल्या मनातील मातृप्रेम आणि महत्त्वाकांक्षा या सगळ्या बोलून दाखवल्या आणि शंभुराजे हे सर्व ऐकून त्यातून सावरण्याचा प्रयत्न करू लागले आणि आई - पुत्रांमध्ये झालेला संवाद खूप वेदनादायक होता. आता शंभू राजेंनी कारस्थान करण्याऱ्या सर्व कारभारी मंडळींचा निवाडा बसविण्यात आला. आणि सदरेवर निवाडा भरला. शंभुराजे आणि महाराज यांच्यामधील तिढा वाढवून त्या दोघांना एकमेकांपासून दूर ठेवण्यासाठी केलेले सर्व कारस्थान समोर येऊ लागले होते. स्वराज्याच्या भावी छत्रपती विरोधात केलेले कारस्थान याची काय शिक्षा शंभुराजे कारभाऱ्यांना देतील याच्याकडे रयतेचे लक्ष लागले होते. निवाडा सुरू झाला सर्व आरोप, पुरावे, साक्षीदार सर्व पडताळणी झाली सर्वांचे गुन्हे ही सिध्द झाले होते. कारभारी आणि सोयराबाईंनी मिळून आखलेली योजना म्हणजेच कारस्थान समोर आले होते आणि वेळ आली ती अंतिम शिक्षेची!! आणि शंभुराजे यांनी अतिशय विचारपूर्वक शांत डोक्याने निर्णय घेतला की सर्व कारभाऱ्यांनी जे केले त्यासाठी त्यांना कोणतीही शिक्षा मिळू नये. शंभूराजेचा हा निर्णय ऐकून सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला होता. स्वतः शंभुराजे चे जवळचे अंगरक्षक सहकारी यांना हा निर्णय मान्य च नव्हता. अजून विचार करावा

आणि शिक्षा द्यावी हेच त्यांचं मत होतं पण शंभुराजे म्हणाले, ही सर्व कारभारी मंडळी स्वराज्यकार्यामध्ये नेहमी निष्ठेने आबासाहेब आणि जिजाऊ आऊसाहेब यांच्यासोबत राहिलेली आहे. त्यांचे स्वराज्यासाठी दिलेले योगदान विसरु शकत नाही. आबासाहेबांनी यांच्या स्वराज्य निष्ठा आणि पराक्रमावर पूर्ण विश्वास दाखवून यांना अष्टप्रधान मंडळात स्थान दिलेले आहे. आणि यांच्याकडून झालेल्या चुका सुधारण्यासाठी आम्ही त्यांना एक संधी देऊ इच्छितो आणि आणि त्यांना पुन्हा मान सन्मान देण्यात यावा असे आदेश शंभुराजे नी दिले. सोयरा मातोश्री यांना ही त्याच प्रकारे मान सन्मान परत देण्यात आला. किती ही झालं तरी त्यांनी जे केलं त्याला कारण होते फक्त पुत्रप्रेम !! अशाप्रकारे शंभुराजेनी सर्व कारभाऱ्यांनी केलेल्या गुन्ह्यासाठी त्यांना माफ करून स्वराज्य कार्यकारिणी मध्ये पुन्हा नवीन संधी दिली. आता सर्व काही सदरेवरील कामकाज झाल्यास शंभुराजे अगदी जड पावलाने रवाना झाले ते आपल्या आबासाहेबांच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीकडे! अंत्यसंस्कार तर नाहीच पण आबासाहेबांचे अंतिम दर्शन सुद्धा मिळू शकले नाही याचा त्रास आणि वेदना खोलवर त्यांना जाणवत होत्या. त्या ठिकाणी जाऊन खूप रडले आपल्या आबासाहेबांना बोलले भांडले मनातील सर्व ओझ डोक्याच्या आसवांनी वाहू लागले होते.आणि तेवढ्यात त्यांना तिथे पुतळा मातोश्री भेटायला आल्या.आपल्या शंभू बाळाला कसबस

सावरू लागल्या. छत्रपती शिवरायांच्या शेवट क्षणी जेव्हा पुतळाबाई त्यांच्या सोबत बसल्या होत्या आणि त्यावेळी कित्येक वेळा महाराजांनी शंभूबाळ शंभूबाळ म्हणून हाक दिली होती आणि शंभू बाळाला भेटण्यासाठी व्याकूळ झाले होते असे सांगू लागले. त्यात आमच्या नंतर स्वराज्याचे छत्रपती हे शंभुराजे च असतील ही महाराजांची अंतिम इच्छा स्वतः महाराजांनी पुतळाबाईना सांगितली होती.महराजांची ही इच्छा शंभुराजे समोर पुतळा बाईंनी सांगितली. आणि शंभुराजे ना आता स्वराज्यासाठी आणि स्वराज्यातील रयतेसाठी स्वतःला खंबीर होऊन छत्रपती म्हणून गादीवर बसायचे आहे स्वतःला सावरायचे आहे असे आदेश च पुतळा मातोश्री यांनी शंभुराजे ना दिले. शंभुराजे रायगडवर आल्यास त्यांना महाराजांची अंतिम इच्छा सांगून आणि आपली जबाबदारी पार पाडून आता पुतळा मातोश्री मात्र सती जाण्याचा विचारात होत्या. त्यांच्या या निर्णयाने शंभुराजे आणि पूर्ण परिवार जणू होरपळून निघाला होता. त्यांनी आदेश ही दिले होते की सतीची सर्व तयारी करून घ्या. आता सर्व रयत परिवार पुतळा मातोश्रीना रोखू लागले. शंभुराजे समोर येऊन खूप विनऊ लागले. रडू लागले. खूप गयावया करून पुतळा मातोश्रींचे पाय धरुन अडवू लागले.पण पुतळा मातोश्री यांना छत्रपतींच्या जाण्याचा धक्का च सहन झाला नव्हता.पण छत्रपती आपल्या शेवट क्षणी जे बोलले होते ते त्यांना शंभराजेंपर्यंत पोहचवायचे होते त्यासाठी

इतके दिवस त्या थांबल्या होत्या. आणि सर्वांचे प्रयत्न अपयशी ठरले. सर्वांनी पुतळा मातोश्रीना सती जाण्यापासून अडवण्याचे पूर्ण प्रयत्न केले पण पुतळा बाईंनी सती जाण्याचा अगोदरच आपला प्राण सोडला होता. अशाप्रकारे शंभुराजे वर काळाने अजून एकदा घाला घातला आणि आईच्या मायेचा अजून एक पदर नियतीने शंभू राजांच्या डोक्यावरून काढून घेतला होता.शंभुराजेनी आपल्या आयुष्यात प्रत्येक वळणावर एक नवीन दुःख सहन केलं आहे आणि पार करून पुढे जात आले पण किती सहन करावे आणि कसे करावे या शिवपुत्र शंभू राजेंनी!! आता रायगडावरील गादी रिकामी ठेवणे शक्य नव्हते. आणि पुतळा मातोश्री सांगून गेल्याप्रमाणे आता स्वराज्याचे छत्रपती म्हणून शंभुराजे ना स्वराज्याचा कारभार हाती घेणे भाग होते. गेल्या काही काळात गडावर जे काही होऊन गेले त्यामधून सावरून आता स्वराज्यरक्षण आणि स्वराज्य विस्तार याकडे आता लक्ष देणे गरजेचे होते.त्याप्रमाणे आता गडावर सर्व रयतेमध्ये बोलणे सुरू होते.रायगडावर येताच संभाजीराजांनी सोयराबाई व आपल्या इतर तीन माता यांचे सांत्वन केल्याचे अनुपुराण सांगते; तर इंग्रज बातमीपत्रात प्रधानांच्या घरी चौक्या बसविल्या असल्या तरी त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास दिला जात नाही, तसेच राजाराम महाराजांस फार प्रेमाने वागविले जाते, अशी बातमी आलेली आहे. संभाजीराजांनी या वेळी आपले मन शांत ठेवून अपराधी प्रधान व सावत्र

माता यांना जी वागणूक दिली आहे ती आश्चर्य वाटण्याइतकी सौम्य व सौजन्यशील आहे!

पुढे १६ जानेवारी १६८१ रोजी संभाजी महाराजांनी आपला राज्याभिषेक करून घेतला; पण तत्पूर्वी त्यांनी एक विधायक पाऊल उचलले. झाले गेले सर्व विसरून त्यांनी कैदेत असणाऱ्या सर्व प्रधानांना व अधिकाऱ्यांना मुक्त करून त्यांना सन्मानाने पूर्ववत अधिकारांच्या जागांवर नेमले. मोरोपंत पेशवे कैदेत असतानाच निवर्तले होते; पण त्यांच्या पुत्रास-निळोपंतास पेशवाई दिली गेली. आण्णाजी दत्तोस सन्मानपूर्वक अमात्यपद बहाल केले गेले! आण्णाजीचे पूर्वीचे सचिवपद यापूर्वीच संभाजी महाराजांनी रामचंद्र पंडितास दिल्याने त्यास अमात्यपदावर विराजमान केले गेले. प्रल्हाद निराजीस न्यायाधीश पद दिले. बाळाजी आवजीकडे राज्याची चिटणीशी पूर्ववत चालू ठेवली. संभाजी महाराजांनी या वेळी दाखविलेली क्षमाशीलता, औदार्य, मनाचा मोठेपणा ई. गोष्टींना इतिहासात तोड नाही. संभाजी महाराजांच्या चरित्रामधील ह्या त्यांच्या मनाच्या मोठेपणाकडे टीकाकार सोयीस्कर दुर्लक्ष करतात आणि त्यांना 'छत्रपती शिवाजी महाराजाने कष्टाने निर्माण केलेल्या स्वराज्यनिष्ठ माणसांची अंत:करणे वश करता आली नाहीत' म्हणून त्यांच्यावरच ठपका ठेवतात, ही मोठी आश्चर्याची गोष्ट

आहे!ही अत्यंत निंदनीय बाब आहे.

संभाजी महाराजांनी सर्व सरदार किल्लेदार यांना आदेशाची पत्रे धाडली. त्यावर त्यांची राजमुद्रा होती. ही राजमुद्रा शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेपेक्षा आकाराने वेगळी आहे, तिचा आकार पिंपळ पाणी आहे.

**श्री शंभो: शिवजातस्य मुद्राद्यौ रिव राजते |**

**यदं कसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरि ||**

**अर्थ : शिवाजी पुत्र संभाजीची ही मुद्रा सूर्यप्रभेप्रमाणे शोभते आहे आणि या मुद्रेची आश्रयदायी लेखासुद्धा कुणावरही सत्ता चालिवते.**

**रा**ज्याभिषेकाच्या वेळी प्रधानांच्या झालेल्या नेमणुका पाहून सर्वांना वाटले की, स्वराज्यात उठलेले दुहीचे व यादवीचे वादळ शांत झाले. संभाजी महाराजांचा कारभार निर्विघ्न चालण्यास हरकत नव्हती. तथापि, राज्याभिषेकानंतर अवघ्या सहा-सात महिन्यांत जुलै-ऑगस्टच्या दरम्यान राजांविरुद्ध दोन कट लागोपाठ झाले. पहिला कट झाला राजास विष घालून ठार मारण्याचा; तर दुसरा कट झाला शहाजादा अकबराचे सहकार्य घेऊन राजास पदच्युत करण्याचा!

३० ऑगस्ट १६८१ रोजी मुंबईकर इंग्रज लिहितात : ‘‘संभाजीराजा प्राणावरील मोठ्या संकटात सापडला होता. त्याच्या जेवणातील मत्स्यान्नाचे पोटी घातलेल्या विषाने तो मरायचाच; परंतु अल्पवयी नोकराने त्याला ते सेवण्यापासून थांबविले. तेव्हा त्यातील थोडा भाग नोकरांपैकी एकाला व कुत्र्याला घातला. दोघेही थोडाच तासांत मेले. संभाजीराजांविरुद्ध हा कट ज्यांनी केला त्यात आण्णाजी पंत, केसो पंत, प्रल्हाद पंत वगैरे होते.

पुढे याच कटाच्या संदर्भात ८सप्टेंबर रोजी ते लिहितात ‘‘संभाजीराजाविरुद्ध केलेल्या कटात आण्णाजी पंत,, रामराजाची आई (सोयराबाई), हिरोजी फर्जंद होते. त्यात त्यांनी सुलतान अकबरालाही गोवण्याचा प्रयत्न केला होता; परंतु तो त्यांस बधला नाही. उलट त्याने योग्य वेळी आपल्या सोबत असलेले दुर्गादास राठोड यांना रायगडावर पाठवून संभाजीराजाला ताबडतोब माहिती दिली. त्यामुळे राजाची त्याचेवर फार मोठी मर्जी बसली आणि होणारा अनर्थ टळला.’’

दोन्ही कट एकाच वेळी शिजले असावेत; आणि एकामागून एक याप्रमाणे उघडकीस आले असावेत. या कटात राणी सोयराबाई, आण्णाजी

दत्तो, सोमाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद अशी २५/३० माणसे गोवली गेली होती. त्यांना पकडून संभाजी महाराजांनी देहान्ताची शिक्षा दिली. सोयराबाईने आपली बेअदबी टाळण्यासाठी विष प्राशन करून आत्महत्या केली असावी. सोयराबाईच्या मृत्यूने शिवाजी महाराजांच्या काळापासून सुरू असलेल्या गृहकलहाच्या नाट्यावर अखेरचा पडदा पडला! गृहकलहाच्या आगीत राणीची व तिच्या पक्षपाती प्रधानांची त्यांच्याच कृष्णकृत्यांनी आहुती दिली गेली!

संभाजी महाराजांनी राजद्रोह्यांना केलेल्या शिक्षा क्रूर वाटत असल्या तरी त्या मध्ययुगीनच नव्हे तर आधुनिक युगातील राजनीतीत बसणाऱ्या आहेत. राजाला पदच्युत करण्याची किंवा ठार मारण्याची तीन कारस्थाने लागोपाठ करणाऱ्या राजद्रोह्यांना अशा शिक्षा का केल्या, असे जगातील कोणतेही राजनीतिशास्त्र विचारू शकणार नाही. उलट राजनीतिशास्त्राचा अभ्यासक अशा राजद्रोह्यांना प्रथमच राजाने क्षमा करून अधिकारावर पूर्ववत स्थापायला नको होते, असेही प्रतिपादन करू शकेल. आणि त्याचे म्हणणे एका अर्थाने बरोबरही ठरेल. मराठी राजाने त्याच्या प्रधानांना क्षमा केली होती; पण प्रधानांनी राजास क्षमा केली नव्हती, हेच खरे!

कटवाल्यातील एक प्रमुख हिरोजी फर्जंद याजवर संभाजी महाराजांनी विश्वास टाकून आपल्या राज्यात आश्रयास आलेल्या अकबराकडे वकील म्हणून पाठविले होते. पण वकील म्हणून आलेल्या हिरोजीनेच राजाविरुद्धच्या कारस्थानात अकबरास ओढण्याचा प्रयत्न करावा, हे मराठी राज्याचे केवढे दुर्दैव!

संभाजी महाराज रायगडावर आल्यापासून (जून १६८०) ते हे कट होईपर्यंत (ऑगस्ट १६८१) त्यांच्या 'व्यसनी आणि लहरी' वर्तनाचा एकही दाखला उपलब्ध इतिहासात दाखवता येत नाही. अशा परिस्थितीत स्वराज्याचा गाडा व्यवस्थित चालू असता त्यास खीळ घालणारी रायगडावरील माणसे 'जाणती मंडळी' कशी काय होऊ शकतात?

या संदर्भात सेतुमाधवराव पगडींनी वस्तुनिष्ठ मत दिले आहे. ते म्हणतात : ''महाराष्ट्राच्या सुदैवाने संभाजीराजे या सर्व कारस्थानांतून सुखरूपपणे पार पडले. औरंगजेबाच्या रूपाने स्वराज्यावर भयंकर संकट कोसळू पाहत असता आण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी इत्यादी शिवाजी महाराजांच्या काळच्या कसलेल्या मुत्सद्यांनी अकबराची

मदत घेऊन संभाजीला गादीवरून काढून टाकण्याचे कारस्थान करावे ही अत्यंत दुर्दैवाची घटना होय. हे कृत्य राष्ट्रद्रोहीच म्हटले पाहिजे. हे कारस्थान यशस्वी झाले असते तर हिंदवी स्वराज्याचा ग्रंथच आटोपला असता.''

संभाजीराजांची उदार धार्मिक लोकनीति -

छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण संभाजी राजेंनी पुढे चालू ठेवले. अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरूष यांना वार्षिक नेमणुका पूर्ववत करून दिल्या. संभाजी महाराजांनी संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. तसेच मौनी गोसावी, गणीराम, वासुदेव गोसावी, कऱ्हाडचे वेदशास्त्री नरसीभट शेषभट मुंज्येमणी, कांदळगावचे अनंत भट, महादेव भट, महाबळेश्वरचे वेदमूर्ती राम भट, कऱ्हाडचे शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना सढळ हस्ते मदत केली. संभाजीराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने चालावे, यासाठी पूर्वीची वृत्ती, इनामे व सनदा पूर्ववत केल्या.- 'समयनय' हा नीतिपर ग्रंथ संभाजी राजेंनी गागाभट्टांकडून लिहून घेतला होता (1681). - 'धर्म कल्पलता' हा धर्मशास्त्रावरील गंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला (1682).

आबे कॅरे या फ्रेंच पर्यटकाने संभाजी महाराजांची प्रशंसा केली आहे. त्याने संभाजीराजांना जवळून पाहिले होते. तो म्हणतो, संभाजींसारखा पराक्रमी, बुद्धिमान आणि सुंदर राजपुत्र मी भारतात पाहिला नाही. संभाजीराजे जगले असते, तर उत्तर भारत जिंकला असता, इतके ते शूर, पराक्रमी, दूरदृष्टीचे प्रजावत्सल राजे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू होऊन संभाजी महाराज राज्याचे अधिकारी होण्याच्या दरम्यान उत्तर हिंदुस्थानात बऱ्याच राजकीय उलाढाली चालू होत्या. औरंगजेब बादशहाचे राजपुतांशी युद्ध सुरू होऊन त्यामध्ये त्याचा आवडता पुत्र शहाजादा अकबर यानेच राजपुतांची बाजू घेतल्याने युद्धाचा रंगच पालटला होता. अकबराने रजपुतांच्या साहाय्याने स्वत:ला बादशहा म्हणून जाहीर करून औरंगजेबाशी उघडउघड शत्रुत्व स्वीकारलेले होते (१जाने. १६८१). तथापि, औरंगजेबाच्या कपटनीतीसमोर त्याची हार होऊन त्याला आपला जीव वाचविण्यासाठी आपला सहकारी दुर्गादास राठोड (मारवाडचा दिवाण) याच्यासह दक्षिणेचा रस्ता धरावा लागला होता.

हिंदुस्थानात लहान-मोठ्या अनेक सत्ता होत्या. दक्षिणेत आदिलशाही, कुतुबशाही ही मोठी राज्ये होती; पण या सर्वांमध्ये कोणासही

बादशहा औरंगजेबाच्या सामर्थ्यास आव्हान देण्याचे सामर्थ्य नव्हते. असे सामर्थ्य होते फक्त मराठी राज्यात – मराठी राजाजवळ. अशी आव्हाने देत देतच शिवाजी महाराजांनी आपल्या सत्तेची उभारणी केली होती. त्या शिवाजीराजाचा पुत्र संभाजीराजा हाच केवळ आपणास आश्रय देऊ शकेल, अन्य कोणी नाही, अशी अकबराची व दुर्गादासाची भावना झाल्यास नवल नव्हते.

आज्जम औरंगाबादेस पोहोचला तर त्याच्या मागून येणारा बादशहा दोनच दिवसांनी नर्मदेच्या काठावरील बुऱ्हाणपुरास पोहोचला – (१३ नोव्हेंबर). इकडे कोकणात त्याच दिवशी संभाजी महाराज व शहाजादा अकबर यांची पहिली भेट झाली!

छत्रपती शिवरायांनंतर शंभूराजे छत्रपती झाले. संभाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नियुक्ती केली. सरनौबत हंबीरराव मोहिते यांनी अचानक बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. मोठ्या फौजफाट्यासह मराठी सैन्य ७० मैलाची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून गेले. तीन दिवसापर्यंत मराठे लुट करत होते. जडजवाहीर, सोने-नाणे, रत्ने आणि मौल्यवान सामान घेतले. इतर जिन्नसाकडे त्यांनी लक्षही दिले नाही. भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे आदी सर्व लूट वाहून नेणे शक्य नसल्यामुळे तेथेच टाकून मराठ्यांचे सैन्य निघून गेले. संभाजी

महाराजांच्या दराऱ्यामुळे पुढील काही महिने त्या वस्तूला हात लावायची कुणाची हिंमत झाली नाही, अशी आख्यायिका आहे. शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. हा किल्ला सहज हस्तगत करता येईल, अशी मोघलांचा समज होता. मात्र, संभाजी महाराजांनी या किल्ल्यावर रसद पोहोचवण्यासाठी खास तुकडी तैनात केली. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला ५ वर्षे झुंजवत ठेवला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी मराठ्यांचे मोगलांशी युद्ध चालूच होते. संभाजी महाराज राज्यावर आल्यावर त्यांनीही हा संघर्ष चालूच ठेवला होता. जानेवारी १६८१मध्ये खुद्द संभाजी महाराजांनी मोगलांच्या बुऱ्हाणपुरावर स्वारी करून ते लुटून फस्त केले होते. अशा उद्ध्वस्त बुऱ्हाणपुरावर पोचल्यावर बादशहाची मन:स्थिती कशी झाली असेल, हे मासिरे आलमगिरीतील साकी मुस्तैदखानाच्या एका नोंदीवरून सूचित होते : तो लिहितो, ‘‘बादशहा शाहा अब्दुल लतीफच्या समाधीपाशी हजर झाला. इस्लामाच्या शत्रूंचा नाश करण्यात आपल्याला साहाय्य मिळावे म्हणून त्याने समाधीपाशी करुणा भाकली.’’

औरंगजेब म्हणजे कोणी सामान्य शत्रू नव्हता. काबूलपासून बंगालपर्यंत व काश्मिरपासून दक्षिणेत भीमानदीपर्यंत त्याचे अफाट साम्राज्य पसरले होते. त्याच्या साम्राज्याचा फक्त जमीन महसूलच ३३ कोटी २५ लाख

होता. मराठ्यांचे सगळे राज्यच मुळी त्याच्या एका सुभ्याएवढेसुद्धा नव्हते. त्याच्या लष्कराची संख्या ॲबे कॅरे या प्रवाशाने ‘तीन लाख घोडेस्वार व चार लाख पायदळ’ अशी दिली आहे. खुद्द बादशहाच्या छावणीत साठ हजार घोडेस्वार, एक लाख पायदळ, पन्नास हजार उंट व तीन हजार हत्ती असल्याची तो एके ठिकाणी नोंद करतो.

याउलट पगडींनी असा अंदाज बांधला आहे की, मराठ्यांचे सर्व मिळून सैन्यबल तीस चाळीस हजारांवर होते असे वाटत नाही. १२ मोगलांच्या लष्करात फक्त उमराव मनसबदार यांचीच संख्या साडेचौदा हजार होती! १३ बादशहाबरोबर दक्षिणेत त्याचे पुत्र आज्जम, मुअज्जम, कामबक्ष, नातू मुइजुद्दीन, बेदारबख्त, नामांकित सरदार असदखान, जुल्फिकारखान, शहाबुद्दीनखान, रुहुल्लाखान, हसनअलीखान, दाऊदखान, तरबियतखान असा सेनानींचा प्रचंड ताफाच होता.औरंगजेब बादशहा अशा प्रकारच्या मोठ्या फौजफाट्यासह व अनेक नामांकित सेनानींसह दक्षिणेत उतरला होता. आपल्या बंडखोर पुत्रास शिक्षा करणे व त्याचबरोबर त्यास आश्रय देणाऱ्या मराठी सत्तेस बुडविणे, हे जरी त्याचे प्रधान हेतू असले तरी त्याला आदिलशाही – कुतुबशाहीसह सर्व दक्षिण जिंकून घ्यायची होती. ते मोगलांचे फार वर्षांपासून एक स्वप्न होते. आलमगीर बादशहा आपल्या सामर्थ्याच्या

जोरावर ते स्वप्न साकार करणार होता.

तथापि, प्रारंभी तरी त्याने अकबर व मराठी राज्य यांनाच बुडविण्याचा उद्योग हाती घेतला व त्यावरच आपले सारे प्रयत्न व लक्ष केंद्रित केले. त्यासाठी त्याने मराठी राज्याला लागून असणाऱ्या आदिलशाही सुलतानाला, सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज या सागरी सत्तांना व कर्नाटकातील नायकांना संभाजी महाराजांविरुद्ध चिथावणी देऊन उठाव करण्यासंबंधी फर्माने पाठविली. आदिलशहाने त्यास दाद दिली नाही; पण सिद्दीस चांगलेच प्रोत्साहन मिळून त्याने मराठी राज्याच्या किनारी प्रदेशावर हल्ले सुरू केले. पोर्तुगिजांनीही स्वार्थापोटी बादशाही सैन्याशी सहकार्य आरंभिले. मराठी राज्यातील वतनदारांनाही बादशाही फर्माने मिळाली होती. काहींना ही मोठी पर्वणी वाटली; तर स्वराज्यनिष्ठ वतनदारांसमोर मोठे संकट उभे राहिले.

रात्रंदिन युद्धमोहिमेवर असणाऱ्या संभाजीराजांनी राजधानीची जबाबदारी महाराणी येसूबाईंकडे दिली होती. त्यांच्या नावाचा शिक्का 'श्री सखी राज्ञी' देऊन त्यांना कुलमुखत्यावर केले आणि स्वराज्याचे सर्वाधिकार त्यांना दिले. - त्यांनी आपल्या सर्व सावत्रमातांना अत्यंत सन्मानाने वागविले. धाकटे सावत्रबंधू राजाराम महाराजांना प्रेमाने वागवले. त्यांचे तीन विवाह संभाजीराजांनी लावून दिले. राजारामाची महाराणी

ताराबाईंना युद्धकला-राजनीतीचे स्वातंत्र्य दिले. स्वराज्यातील, परराज्यातील महिलांचा आदर सन्मान केला. - संभाजीराजे म्हणतात, जो प्रयत्नवादी असतो, तो पुरुषसिंह असतो आणि ज्यांचा देवावर विश्वास असतो, त्याला दुबळा म्हणतात. यावरून स्पष्ट होते, की संभाजीराजे बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांचा विश्वास कर्तृत्वावर होता. ते विज्ञानवादी होते. - संभाजीराजांनी दुष्काळग्रस्तांना मदत केली. शेतसारा माफ केला. त्यांना संकटसमयी आधार दिला. गरिबांना न्याय दिला. सरंजामशाहीला पायबंद घातला.

मराठा साम्राज्याच्या 15 पट असणाऱ्या मुघल साम्राज्याशी संभाजी महाराजांनी एकहाती लढा दिला. औरंगजेब सुमारे पाच-सात लाखांची फौज घेऊन स्वराज्यावर चालून आला होता. पोर्तुगीज, आदिलशहा, सिद्दी आणि स्वराज्यातील मंत्री अशा अनेक शत्रूंविरुद्ध संभाजीराजांना लढावे लागले. याप्रसंगी संभाजीराजे फक्त 23 वर्षांचे होते. पण न डगमगता त्यांनी सुमारे 9 वर्षे मोगलांना सळो की पळो करून सोडले. मोगलांचा दरबारी इतिहासकार खाफीखान लिहितो, संभाजी हा मोगलांसाठी वडिलांपेक्षा (शिवरायांपेक्षा) दहा पटीने तापदायक होता.

संभाजी महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना असा जोरदार धडा शिकवला की त्यांची संभाजी महाराजांविरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत झाली नाही.

तसेच त्यांपैकी कोणीही त्यांच्याविरुद्ध उलटू शकला नाही. छ. संभाजी महाराज राज्यावर आल्यानंतर पोर्तुगीजांनी स्नेहाचे संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. अकबराचे पोर्तुगीजांशी असलेल्या मैत्रीच्या संबंधांमुळे तहाच्या वाटाघाटीत त्यांनी त्यास मध्यस्थ म्हणून घेतले होते.

जंजिऱ्याची मोहीम निर्माण झाली. या मोहिमेत राजांनी स्वतः पुढाकार घेतला होता. त्यांनी तल्लख आणि शूर पराक्रमी असे कोंडाजी फर्जंद यांची निवड या मोहिमेसाठी केली होती. ठरल्याप्रमणे गनिमी कावा करून कोंडाजी फर्जंद स्वराज्यास फितूर झाले आणि जंजिऱ्याच्या सिध्दी ला जाऊन मिळाले असा बनाव पूर्ण योजनाबद्ध पद्धतीने निर्माण केला. कोंडाजी बाबा आता जंजिऱ्याच्या सिध्दी ला जाऊन मिळाले आणि तिथे सिद्धीचा विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करू लागले. जंजिरा अभेद्य असा किल्ला होता जो लाखोंची फौज आणून जिंकणे शक्य नव्हते कारण किल्ल्याच्या चारी बाजूने सागर होता आणि फौजा किल्ल्याजवळ पोहचेपर्यंत बुरुजावरुन तोफेचा मारा होत असे. त्यामुळे संभाजी महाराजांनी अशी योजना आखली की, जंजिऱ्याच्या मधे जाऊन दारू गोळ्याचे कोठार नष्ट करून तोफा निकामी करून मग जंजिऱ्यावर बाहेरून हल्ला करायचा असा बेत संभाजी महाराजांनी आखला होता. आणि खूप काळजीपूर्वक आणि शितापिने हे सर्व काम सुरू होते. जागोजागी हेर पेरले गेले होते. कोंडाजी बाबा कित्येक महिने तिथे राहून

सिद्धीचा विश्वास मजबूत करण्यासाठी खूप काही अडचणीला सामोरे जाऊ लागले. पण ध्यास एकच होता की,कोणत्याही परिस्थितीत माझ्या छत्रपतींचे अपूर्ण स्वप्न आणि शंभुराजे यांनी सोपवलेली कामगिरी पूर्ण करून जंजिरा स्वराज्यात आणायचा.शंभुराजे किनाऱ्यावर आपली फौज घेऊन तैनात होते. ठरल्याप्रमाणे सर्व काही घडत होते. कोंडाजीफर्जंद बाबाने आपले स्थान जंजिराकिल्ल्यावर भक्कम केले होते आणि किल्ल्याचे दारू गोळ्याचे कोठार शोधून काढले होते. योजनेप्रमाणे आता कोठार उडवून नष्ट करण्याचा दिवस ही येऊन टेकला. किल्ल्याच्या बुरुजावरिल महत्त्वाच्या तोफा निकामी करण्यात ही यशस्वी झाले होते. सर्व काही योजनेप्रमाणे घडले होते आता दारूगोळा कोठार उडविण्यासाठी कोंडाजीफर्जंद कूच करू लागले आणि सर्वांनी आपल्या जागा ही घेतल्या तोफा निकामी करण्यात आल्या. किनाऱ्यावर शंभुराजे फौज नौका घेऊन सज्ज होते. इशारत मिळताच अथांग असा फेसाळलेल्या सागरात उतरून इतिहास रचणारी रात्र होती. पण दुर्दैव असे झाले मी सिध्दी खैरियत ला याचा सुगावा ऐन वेळी लागला आणि त्याने वेळीच कोंढाजी बाबाला पकडले आपले कोठार नष्ट होण्यापासून वाचवले. आणि सर्व योजना एका क्षणात धुळीस मिळाली. किनाऱ्यावर शंभुराजे आणि फौज वाट पाहत होती. पण इकडे जंजिऱ्याच्या उंच अशा भिंतीआड सिद्दी खैरियत ने कोंडाजी बाबाला कैद करून अतोनात हाल करून मारले. आणि

किनाऱ्यावर वाट पाहत असलेल्या शंभू राजेंना कोंडाजी बाबाचे शिर पाठवून दिले.शंभूराजे हे शिर पाहून कोसळले आणि त्यांना कित्येक नरकयातना झाल्या होत्या. सर्व फौज आणि शंभुराजे च्या डोळयात आसवांचा सागर ओसंडून वाहू लागला.अतिशय रागाने शंभुराजे लालबुंद झाले त्यांना हे दुःख ना भरून येणारे होते.तरी खाडी भरून काढण्यासाठी अचाट कल्पना लढवून सैन्याला मार्ग सुकर व्हावा म्हणून त्यांनी 669 चौ. मी. रूंद आणि सु. 27 मी. लांब जंजिऱ्याची खाडी दगड, लाकूड, कापसाच्या गाठी यांनी भरून काढण्याचा प्रयत्न केला परंतु खवळलेल्या समुद्रामुळे तो निष्फळ ठरला, तरीसुद्धा हा अयशस्वी वेढा पुढे कित्येक महिने चालला. 1682 च्या फेब्रुवारीच्या अखेरीस सिद्दीला औरंगजेबाने मदत म्हणून स्वराज्यात दुसरीकडे आपली फौज पाठवली जेणेकरून नाईलाजाने स्वराज्य राखण्यास जंजिरा मोहीम अर्ध्यावर सोडून शंभुराजे आघाडीवरून माघारी आले. समुद्रातील या लढाईमुळे संभाजीराजांनी आपले नौदल आणि आरमार मोठया प्रमाणात वाढविले. त्यातूनच पुढे प्रसिद्ध आंग्रे घराण्याचा उदय झाला.

1682 च्या जून-जुलैमध्ये संभाजीराजांनी चौल (चेऊल) व रेवदंडयास वेढा दिला, बरेच दिवस तो चालला. संभाजीराजांनी उत्तर कोकणातील दोन किल्ले जिंकून घेतले (1683), तसेच जुनी साष्टी व बारदेस येथेही चढाई केली. त्यांनी चौलचा वेढा उठवावा, म्हणूनच पोर्तुगीजांनी फोंडयावर हल्ला

केला.1683 च्या डिसेंबरमध्ये मराठयांनी पोर्तुगीजांची अनेक गावे घेऊन फोंडा लढविला. सहा महिन्यांनंतर चौलचा वेढा उठविला. फोंडयाच्या लढाईत येसाजी कंक आणि त्यांचा मुलगा कृष्णाजी यांनी मोठा पराक्रम गाजविला. शेवटी दक्षिणेत मोठी मोगली फौज घेऊन शाहआलम येत आहे, ही बातमी येताच 1684 च्या सुरूवातीस फोंडे येथे पोर्तुगीजांशी तह केला. या तहाच्या वाटा-घाटीत कवी कलशाची भूमिका मुख्य होती आणि अकबर यास मध्यस्थ नेमले होते.1685 - संभाजीराजांनी उंदेरी घेण्याचा प्रयत्न केला. दंडाराजपुरी घेण्याचा एक अयशस्वी प्रयत्नही झाला. सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांवर दडपण आणले परंतु यातही त्यांना फारसे यश आले नाही. संभाजीराजांनी खंदेरी इंग्रजास देण्याचा विचार मान्य केला नाही आणि सिद्दीलाही शेवटपर्यंत खंदेरी, पद्मदुर्ग, कुलाबा जिंकता आले नाही.

औरंगजेबाने मराठ्यांवर हल्ला केला. औरंगजेबाचे सैन्य मराठ्यांच्या सैन्याच्या पाचपटीने जास्त होते तर औरंगजेबाचे साम्राज्य संभाजी महाराजांच्या स्वराज्यापेक्षा कमीतकमी 15 पटींनी मोठे होते. मराठ्यांची प्रबळ इच्छाशक्ती आणि झुंझारपणाचे ठळक उदाहरण म्हणजे नाशिकजवळील रामशेज किल्ल्याचा लढा होय. येथे मराठ्यांनी असा चिवट प्रतिकार केला की तो किल्ला जिंकण्यासाठी त्यांना साडेसहा वर्षे लढावे लागले. संभाजी महाराजांनी रामसेजवर रसद पुरवण्यासाठी वाटेल ते योजना करून संकटे पार

पाडून रसद पुरवित होते. ऑक्टोबर 1684 - संभाजी, सिकंदर आदिलशाह आणि अबुल हसन कुतुबशहा यांत एकजूट होईल, असा संशय औरंगजेबास आला, म्हणून औरंगजेबाने आदिलशाहीवर स्वारी केली. या चढाईचा प्रतिकार करण्यासाठी दक्षिणेतील तीन सत्ताधीश एकत्र आले. संभाजीराजे, आदिलशाह आणि कुतुबशहा यांचा गट तयार होऊन या त्रिकूटाने मोगलांशी सामना देण्याची तयारी केली. संभाजीराजांनी मार्च १६८५ मध्ये मदत पाठविली. डिसेंबर महिन्यात हंबीरराव मोहिते सैन्यासह विजापुरात दाखल झाले. संभाजीराजे व गोवळकोंडयाचा सुलतान हे संकट सर्व दक्षिणीयांवर आहे, असे समजून वागत होते. दोघेही आदिलशाही सुलतानास मदत करीत होते. १६८५ मध्ये मराठयांनी धरणगाव लुटले आणि वऱ्हाड प्रांतात धुमाकूळ घातला. मोगलांच्या या आक्रमणाचा संभाजीराजांनी चांगलाच प्रतिकार केला. १६८६ - मोगली फौजांनी कोल्हापूर, मिरज, पन्हाळा या भागांत आक्रमण करण्यास सुरूवात केली. १६८७ - वाईजवळ हंबीरराव मोहिते आणि सर्जाखान यांत लढाई होऊन त्यात हंबीरराव मरण पावले.ज्यांनी संभाजी महाराजांना सर्वांच्या विरोधात जाऊन ऐन वेळी स्वराज्याची निष्ठा जागृत ठेऊन रक्ताचे नाते बाजूला ठेऊन छत्रपती शिवरायांचे स्वप्न पूर्णत्वास नेऊन शंभू राजांना स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून गादीवर बसवले. अशा हंबीररावांना गमावून संभाजी राजे अजुन खचले होते (हंबीररावांची कन्या

ताराराणी यांचा विवाह राजाराम महाराजांसोबत झाला होता).

औरंगजेबाने कुतुबशहहास आक्रमणाची धमकी दिली आणि काही अटी मान्य करावयास लावल्या. त्यांची पूर्तता झाली नाही, हे पाहून आक्रमण केले. मादण्णा व आकण्णा या दोन विश्वासू , पराक्रमी व कार्यक्षम मंत्र्यांचा विश्वासघाताने खून झाला. परिणामतः औरंगजेबाने 12 सप्टेंबर 1686 रोजी आदिलशाही संपुष्टात आणली आणि त्यानंतर 22 सप्टेंबर 1687 रोजी गोवळकोंडा हस्तगत करून कुतुबशाही राज्याचा शेवट केला आणि आपली सर्व शक्ती संभाजीराजांवर केंद्रित केली. साल्हेर, माहुली इ. अभेदय किल्ले औरंगजेबाने लाच देऊन हस्तगत केले. तसेच दळवी-देसायांप्रमाणेच संभाजीराजांकडे असलेल्या नोकरांना, अधिकाऱ्यांना जहागिरी, मनसब यांचे आमिष दाखवून त्यांना आपल्याकडे वळवून घेतले, सेवेतही ठेवले.आता या सर्वांमध्ये काही आपले माणसे ही वतनदारी च्याच लालसेने फितुरीचे वारे त्यांच्या डोक्यात घुमू लागले. त्यात महाराणी येसुबाईंचे भाऊ गणोजी शिर्के सुद्धा होते. त्यांची वतनदारीची इच्छा वर डोके काढू लागली होती.आणि त्यांची इच्छा शंभुराजे छत्रपती झाल्यापासून जास्त तीव्र झाली होती.कित्येक वेळा त्यांनी ती इच्छा त्यांचा ताईसाहेब म्हणजेच महाराणी येसूबाई समोर ही व्यक्त केली होती. पण छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदारीची पद्धतच बंद करून रयतेचे स्वराज्य स्थापन केले होते.आणि पुढे शंभुराजे ही त्याच

विचाराने राज्य चालवीत होते. पण औरंगजेब स्वराज्यात येऊन त्याला पराभवाचा च सामना करावा लागला.त्याला शंभुराजे आणि स्वराज्याला समोरून वार करणे अशक्य होते. म्हणून त्याने आपली कपटी आणि फितुरीने शस्त्र बाहेर काढले होते. मावळातील देशमुख पाटील आणि सरदारांना मुघली मनसबदारी व वतनदारी देण्याचे आमिष तो दाखऊ लागला आणि काही लालची आणि बेईमान मराठा सरदार त्याला जाऊन मिळू लागली होती. त्यात गणोजी शिर्के चे चुलते कान्होजी शिर्के ही होते आणि ते नेहमी गणोजी शिर्के चे कान भरत असे. गणोजी शिर्के ला त्यांच्या चुलत्याच्या मुघली वतनदारी बद्दल ऐकून मन विचलित होत असे.त्यात गणोजी शिर्के कवी कलशांवर अगोदर पासून च दात खात असे. त्यांना कवी कलश आणि शंभुराजे यांची मैत्री नेहमी च खटकत असे. पण शंभुराजे साठी कलशां चे विशेष स्थान होते. प्रत्येक सदरी न्याय निवाडा किंवा निर्णयामध्ये कवी कलश यांचे मत घेऊन त्यांच्यासोबत चर्चा करून शंभुराजे पाऊल उचलत असत. त्यामुळे कवी कलश आणि गणोजी मध्ये नेहमी क्लेश होत असे.

काही काळानंतर शंभुराजे ची दूध आई म्हणजे धाराऊ चे देहावसान झाले.उतार वयात त्यांची तब्येत खालावली होती. शंभुराजे साठी धाराऊ नेहमीच सईबाईंच्या जागी होत्या.आपल्या शंभुराजे च्या आयुष्यातील हा घाव ही त्यांच्यासाठी खूप वेदनादायक आणि असह्य होता. जन्मल्यापासून काळ

जणू त्यांच्या पाठीशी लागला होता. जन्म दिलेली आई शंभुराजे अवघ्या 2 वर्षाचे असताना नियतीने हिरावून घेतली.आपल्या आबासाहेब आणि त्यांच्या स्वराज्यासाठी बालवयात कित्येक मोहिमेत त्यांना सामोरे जावे लागले.मग ते पुरंदर तहातील मिर्झाराजे च्या छावणीतील मुक्काम असेल किंवा आग्रा भेटी दरम्यान मथुरेत राहणे असेल. आऊसाहेब जिजाऊंचे त्यांना सोडून जाणे असेल. आपल्या पित्यापासुन दूर रहाणे असेल. सावत्र आई च्या महत्वाकांक्षी स्वभावाने होणारा गृह क्लेश असेल. आणि त्याच कलेशामुळे त्यांच्या चारित्र्यावर उडवले गेलेले शिंतोडे आणि त्यांची बदनामी असेल.शिवरायांच्या दक्षिण मोहिमेत जाण्याची पूर्ण तयारी झालेली असताना त्यांना या मोहिमेत ना जाऊ देण्यासाठी कारभाऱ्यांनी केलेली गळचेपी असेल.आणि त्यातूनच ऐन दक्षिण मोहीम तोंडावर असताना स्वराज्याच्या वेशीवर येऊन ठेपलेली मुघली व दिलेर खानची फौज रोखण्यासाठी छत्रपतींनी गनिमी काव्याने शंभुराजे सोबत बंद दाराआड झाली चर्चा ज्यानुसार शंभुराजे मुघल छावणीत दिलेर खानाला जाऊन मिळणे असेल.आणि त्यावरून झालेली स्वराज्य द्रोही म्हणून कारभाऱ्यांनी चालवलेली विविध खटले असतील.आपल्या आबासाहेब काळाच्या पडद्याआड गेल्यास शंभुराजे ना मात्र जाणीवपूर्वक रायगडापासून दूर ठेऊन अंतिम दर्शन सुद्धा कपटी कारस्थानी कारभाऱ्यांनी करण्याचे भाग्य दिले नाही.याउलट त्यांना अटक करून जेरबंद करण्याचे आदेश

आले.गडावरील भक्कम बुराजासारखे खंबीर असे हंबीरराव मोहिते यांच्या आधाराने सगळा कट उधळून रायगडवर छत्रपती म्हणून आरूढ झाले. आणि नियतीने हंबीरराव मोहिते यांच्या वर सुद्धा काळाचा घाला घालून परत एकदा शंभुराजे ना पोरक केलं होतं. छत्रपती शिवरायांना जसे बहिर्जी नाईक सारखा रत्न मिळाल्याने प्रत्येक लढाई मध्ये यश मिळाले होते त्याचप्रमाणे शंभुराजे ही बहिर्जी नाईकांना तेच स्थान देत असे आणि कालांतराने बहिर्जी नाईक सुद्धा शंभूराजे ना सोडून गेले होते.आणि आता धाराऊ !!!

नियतीने शंभुराजे यांच्याकडून एक एक करून सर्वांना हिरावून तर घेतले च पण आबासाहेबांच्या स्वराज्यासाठी शंभुराजे प्रत्येक आव्हाने आणि संकटे पार पाडीत स्वराज्य विस्तार वेगाने करू लागले होते.अनेक फितुरांच्या हालचालीवरून लक्ष ठेऊन होते पण त्यांना कल्पना नव्हती की आपल्या घरातच कान्होजी आणि गणोजी मुघल छावणी आणि औरंगजेबाच्या संपर्कात आहेत.शंभुराजे स्वराज्याच्या कामासाठी मावळध्ये बैठका घेत फिरत असतं. आणि सर्व गुप्तता पाळून च मोहिमा आखत असे. पण आपलीच माणसं फितूर झाल्यास किती ही गुप्तता ठेवली तरी दगा हा होणारच आणि हेच घडलं आपल्या शंभुराजे सोबत. मुघल सरदार असो की फौज असो किंवा स्वतः औरंगजेब असो कोणाला ही शंभुराजे समोर जाऊन त्यांच्याशी लढणे अशक्य होते. शंभुराजे समोर आपला निभाव लागु शकत नाही हे सर्व ओळखून होते.

म्हणून फितुरांना हाताशी घेऊन च शंभुराजे चा पराभव करण्याच्या बेतात औरंगजेब होता. संभाजीराजांच्या बलीदानाचा इतिहास लोकांना नीट माहीत नाही. १ फेब्रुवारी १६८९ या दिवशी सख्खा मेहुणा गणोजी शिर्के याच्या फितुरीमुळे संगमेश्वर या ठिकाणी संभाजीराजे काही वतनदारांची गाऱ्हाणी ऐकत असतांना पकडले गेले. आमचा पराभव करण्याची ताकद आज जगातील कोणत्याही शक्तीला नाही. आमचा पराभव आमच्यातील गद्दार फितूर मंडळींमुळेच झाला, याची अनेक उदाहरणे आहेत. अगदी वर्तमानकाळही त्याला अपवाद नाही. शंभूराजांचे वेळीसुद्धा हेच झाले. येसुबाईचे थोरले बंधू म्हणजे शंभूराजांचे मेव्हणे गणोजी शिर्के हिंदवी स्वराज्याशी बेईमान-फितूर झाले. संभाजीराजांनी कवी कलश, संताजी घोरपडे, मालोजी घोरपडे, खंडोबल्लाळ चिटणीस यांच्यासह संगमेश्वर कसब्यातील सरदेसाई यांच्या वाड्यावर मुक्कामी होते.निवाडा होण्यास बराच वेळ जाणार होता म्हणून शंभूराजे यांनी येसूबाई आणि आपल्या फौजेला रायगडाकडे जाण्याचे आदेश दिले. येसूबाई नी आग्रह केला होता की आम्ही ही थांबतो पण शंभुराजे नी आदेश दिला आणि त्यांना निघाव लागलं आणि फौज घेऊन येसूबाई रायगडाकडे रवाना झाले. शंभुराजे यांनी आपल्यासोबत काही मोजकी सैन्याची तुकडी ठेऊन घेतली.तिकडे झुल्पीकार खान रायगडावर चालून येत असल्याची खबर राजांना मिळाल्याने शंभूराजे सातारा-

वाई-महाड मार्गे रायगडावर परतणार होते; पण मुकर्रबखान कोल्हापूरपर्यंत येऊन पोहोचल्यामुळे शंभूराजांनी संगमेश्वर मार्गाने चिपळूण-खेड मार्गे रायगडावर जाण्याचा बेत केला. शंभूराजे स्वत: संगमेश्वरी आल्याची वार्ता आसपासच्या भागात वाऱ्यासारखी पसरली. मावळातील रयत शंभुराजे कडे आपल्या तक्रारी घेऊन येऊ लागली. रयतेच्या तक्रारी समजून घेऊन त्या सोडवण्यात त्यांचा वेळ गेला आणि संगमेश्वरला ४-५ दिवसांचा मुक्काम करावा लागला. तिकडे कोल्हापूरवरून मुकर्रबखान निघून चालू येत असल्याचे राजांना कळले. कोल्हापूर ते संगमेश्वर हे अंतर ९० मैलांचे आणि तेसुद्धा सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यानी व्यापलेले अवघड वाटेचे ! त्यामुळे किमान ८-१० दिवसांच्या अंतराचे; परंतु फितूर झालेल्या गणोजी शिर्क्याने मुकर्रबखानाला जवळच्या आड वाटेने केवळ ४-५ दिवसांतच संगमेश्वरला आणले. वतनदारी मिळवून देण्याच्या बहाण्याने चुलते कान्होजी च्या शब्दामध्ये अडकून गणोजी शिर्क्यांनी फितुरी केली होती व आपली जहागीरी प्राप्त करण्यासाठी त्याने हा उद्योग केला. त्यामुळे १ फेब्रुवारी १६८९ रोजी मुकर्रबखानने त्याच्या हजारोच्या सैन्याच्या मदतीने शंभूराजांना वेढ्यात पकडण्याचे ठरवले होते.शंभुराजे शेवट चा निवाडा संपवून निघण्याच्या तयारीत च असताना खबरी निरोप घेऊन आला की मुघली फौज वाड्याकडे येत आहे.संगमेश्वरला ज्या सरदेसाई यांच्या वाड्यात शंभूराजे मुक्कामाला

होते, त्यावाड्याला खानाचा वेढा पडला, हे जेव्हा राज्यांच्या लक्षात आले, तेव्हा त्यांना आश्चर्यच वाटले; कारण इतक्या कमी दिवसांत खान येणे शक्यच नाही, हे त्यांना माहीत होते; पण ही किमया केवळ फितुरीची होती, हेसुद्धा त्यांच्या लक्षात आले. शंभूराजांनी अगोदरच आपली फौज रायगडकडे रवाना केली होती. केवळ ४००-५०० सैन्यच हाताशी ठेवले होते. आता खानाचा वेढा मोडून रायगडकडे प्रयाण करणे हा एकमेव पर्याय राजांपुढे शिल्लक होता; म्हणून सर्व फौज मुघलांशी जीवाची पर्वा न करता लढत होती. कवी कलश आणि सरसेनापती मालोजी घोरपडे शंभुराजे यांना पुढे रायगडाकडे निघून जाण्याची विनंती करू लागले. पण शंभुराजे आपल्या मावळयांना अस सोडून जाण्यास तयार नव्हते. जे काही होईल ते सर्व मिळून सामोरे जाऊ असे सांगून शंभूराजांनी शत्रूवर तुटून पडा, असा आदेश आपल्या सैनिकांना दिला. या परिस्थितीतही न डगमगता शत्रूचा वेढा तोडून संभाजीराजे, संताजी घोरपडे व खंडोबल्लाळ रायगडच्या दिशेने वेगात निघालेच होते पण दुर्दैवाने मालोजी घोरपडे या धुमश्चक्रीत ठार झाले;संभाजीराजांनी या परिस्थितीत स्वतःला सावरत लढा देत होते आणि आपला घोडा वेढ्याच्या बाहेर काढला ही होता; पण मागे असणाऱ्या कवी कलशाच्या उजव्या हाताला किंवा पायाला मुकर्रबखानाचा बाण लागून ते खाली पडल्याने त्यांना वाचवण्यासाठी राजे पुन्हा मागे वळले कवी कलश शंभू राजांच्या मागे लागले की राजे आपण

निघाव विनवण्या करू लागले पण शंभुराजे आपल्या जिवलग मित्राला या स्थितीत जाण्यास तयार नव्हते. आणि संभाजीराजे व कवी कलश हे वेढ्यात अडकले.आणि मुकर्रबखानाच्या सैन्याने शंभू राजेंना घेरले आणि अश्याप्रकारे मुघली लांडग्याच्या तावडीत स्वराज्याचा छावा सापडला.

यावेळी अनेक सैनिक ठार झाल्यामुळे त्यांचे घोडे इतस्तत: उधळत होते सर्वत्र धुरळा उडाला होता. कोणालाच स्पष्ट दिसत नव्हते. त्याचा फायदा घेऊन शंभूराजे पुन्हा सरदेसाइच्या वाड्यात शिरले. त्यांचा घोडा मात्र तिथेच होता. धुरळा खाली बसल्यावर गणोजी शिर्क्यांनी शंभूराजांचा घोडा ओळखला; कारण राजांच्या घोड्याच्या पायात सोन्याचा तोडा असायचा व हे शिर्क्यांना माहीत होते; म्हणून त्यांनी खानाच्या सेनेला संभाजींचा शोध जवळपासच घ्यावा, अशी सूचना केली. अखेर मुकर्रबखानच्या मुलाने म्हणजे इखलास खानाने शंभूराजांना पकडले. फितुरीमुळे शेवटी सिंहाचा छावा शत्रूच्या हाती गवसला.जंग जंग पछाडून सुद्धा सतत ९ वर्षे सात लाख सेनेच्या हाती जो सापडला नाही, बादशहाला ज्याने कधी स्वस्थता लाभू दिली नाही, असा पराक्रमी योद्धा स्वकियांच्या बेईमानीमुळे मोगलांच्या जाळयात अडकला.

नंतर संभाजीराजे आणि त्यांचे सल्लागार कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादूरगड आता धर्मवीरगड येथे आणण्यात आले.औरंगजेब

मुकर्रबखानावर खुश होता इनाम दौलती देऊन त्याचा गौरव करू लागला. शंभू राजेंना औरंगजेबासमोर पेश करण्याची तयारी झाली. औरंगजेबाने संभाजीराजे आणि कवी कलश यांची विदूषकाचे कपडे घालून धिंड अत्यंत मानहानीकारक अशी धिंड काढण्यात आली. तरीही संभाजीराजांनी शरणागती पत्करण्यास नकार दिला. तेव्हा औरंगजेबाने त्यांना क्रूरपणे अत्यंत हालहाल करून ठार मारायचा आदेश दिला. सुमारे ४० दिवसांपर्यंत असह्य यातना सहन करूनही संभाजीराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही. बहादुरगडावर (मौजे पेडगाव, ता.श्रीगोंदा) संभाजी महाराजांची धिंड काढलेली होती. एका बोडख्या घाणेरड्या उंटावर संभाजी महाराजांना व कवि कलशांना उलटे बसवले होते. साखळदंडाने बांधलेले. त्या दोघांच्या अंगावर विदुशकासारखे झिरमिळ्यांचे चट्ट्यापट्टयाचे कपडे चढवलेले होते. गळ्यातील शिवरायांनी चढवलेली कवड्याची माळ उतरवून गुरांनाही सहन होणार नाही अशी काथ्याची पेंढी बांधलेली होती. दोघांच्याही डोक्यावर एखाद्या अट्टल गुन्हेगारांना बांधाव्यात अशा, कुराणमध्ये सांगितलेल्या आदेशानूसार इराणी लाकडी टोप्या बसवलेल्या होत्या. त्याच प्रमाणे 'तख्तेकुलाह' म्हणजे लाकडी फळयांचा खोडा मानेवर ठेऊन त्याला दोन्ही हात बांधलेले होते. त्या खोड्याला घुंगरे बांधलेली होती अन् त्यावर छोटी छोटी निशाणे चितारलेली होती. अशी ती धिंड मोगली फौजेमधून काढलेली होती. मोगलांमध्ये

ईदपेक्षाही उत्साहाचे वातावरण होते. दुतर्फा फौजेतील सैनीक महाराजांवर व कवी कलशांवर दगडे भिरकावीत होते. त्यांना भाल्याने टोचीत होते. त्यांचे नगारे वाजत होते, कर्णे थरारत होते. बारा ईमामांचे झेंडे फडकत होते.

रायगडचा राजा, महाराजांचा व जिजाऊचा शंभूबाळ आज विटंबनेचा विषय झालेला होता.एवढं सगळं सोसून ही "छावा" होता ताठं...झुकली नाही मान...वाकला नाही कणा... औरंगजेब दरबारातदाखल झाला आणि शंभू राजेंना समोर पेश करण्यात आले. तसा वजीर आसद खान कडाडला..."संभा..!,,झूक जाओ आलमपना के सामने" आणि कडाडला कवी कलश, "राजा है वो झुकेंगे नही तुम्हे झूकायेंगे!!! " "चूप!...चूप!,,,यॉंद रखं कैद में है तू. तेव्हा औरंगजेब पुढे होऊन बोलला सबूर.. सबूर असद खान!! अभी तो इसे बहोत कुछ पूछना बाकी है!! असे बोलून संभाजी राजाकडे नजर फिरवली आणि त्या तेजस्वी डोळे पाहून त्याला तीच निडर आणि भेदक नजर दिसली जेव्हा ९ वर्षाचे असताना आग्र्याच्या दरबारात शिवारायासोबत शंभूराजे तेजस्वी नजरेने पाहत होते. आणि तसा औरंगजेब आपले तख्त सोडून शंभू राजेपुढे येऊन उभा राहिला आणि आपल्या खुदाचे आभार मानण्यासाठी गुडघे टेकून खाली बसला. शंभूराजेच्या चेहऱ्यावर स्मितहास्य होते आणि ते कवी कलशला म्हणाले “कविराज. सुचते का काही कविता?” कविराज आपल्या धन्याकडे पाहून हसून उत्तर दिले जरूर राजन!!

आणि कवी कलश यांनी कविता सादर केली.

**“यावन रावण की सभा, शंभू बंध्यो बजरंग।**
**लहु लसत सिंदुर सम, खुब खेल्यो रणरंग।**
**राजन हो तूम सांचे.खूब लढे तुम जंग!!!**
**तुव तप तेज निहार, तखत त्यजत औरगं!!!"**

**(मराठी अर्थ : रावणाच्या सभेमध्ये जसे बांधिले बजरंगबली त्या सम शंभूराजेना बांधिले होते । रक्ताने माखलेले शंभूराजे सिंदूर फासलेल्या बजरंगबलीसारखे भासत होते, आणि रणांगण खूप खेळले होते.**
**राजन, तुम्ही आहेत शूर, लढलात खूप जंग, तुमचे हे तेज पाहून स्वत: औरंगजेबाने आपले तख्त सोडून तुमच्या समोर झुकला आहे.)**

खामोश!!! औरगंजेब ताडदशी उठला,,,,चुप!..चुप काफर....

औरंगजेब आपल्या वजीर आणि मुकर्रबखान करवी बोलू लागला . शंभूराजेना एक - एक करून प्रश्न विचारू लागले. बतावो तुमने हमारा लुटा हुआ खजाना स्वराज्य मे कहा रखा है? तुम्हारे स्वराज्य का खजाना कहा छुपा रखा है? हमारे कौन कौन सरदार तुमसे मिले है?? पण संभाजीराजे आणि कवी

कलश त्यांना काही सरळ उत्तर देत नव्हते . पूर्ण दरबार चवताळून निघाला औरंगजेब हि रागाने लालबुंद झाला. त्याची कपटी नीती वापरून आणि वेगवेगळी आमिषे देऊन आपण या दोघांना बोलत करू असे त्याला वाटले पण शिव सिंहाचा छावा त्याच्यापुढे थोडीच झुकणारा होता. त्यातील काही सरदारांनी औरंगजेबाला धर्मांतराचा सल्ला हि दिला होता पण औरंगजेब पुरता ओळखून होता कि शंभूराजे आपल्या पित्याच्या स्वराज्यासाठी जीव देईल पण स्वराज्य आणि धर्म कधी सोडणार नाही. अनेक हाल हाल करून चाबकाचे फटके देण्यात आले पण शंभू राजे न झुकले न डगमगले. आपल्या धारदार तेजस्वी भेदक नजरेने औरंगजेब समोर उभे होते ताठ मानेने !!! औरंगजेबाने संभाजीराजांना सर्व किल्ले त्याच्या स्वाधीन करून धर्मांतर केल्यास जीवदान देण्याचे मान्य केले. पण संभाजीराजांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला.

पुढे औरंगजेबाने आपला मुक्काम तुळापूर येथे हालवला. इथे तुळापूरच्या संगमावर त्याला हिंदू राजास हलाल करावयाचे होते. संभाजी महाराजांची तेजस्वी नेत्रकमले काढण्यासाठी हशम सरसावले. रांजणातून रवी जशी फिरवावी, तशा त्या तप्त - लालजर्द सळया शंभू राजांच्या डोळ्यातून फिरल्या. चर्र चर्र आवाज करीत चर्येवरील कातडी होरपळून गेली. सारी छावणी थरारली पण संभाजी महाराजांच्या मुखातून आक्रोशाची लकेरही

उमटली नाही. यामुळे औरंगजेबाचा पारा मात्र जास्तच चढला. कवि कलशाचेही डोळे काढण्यात आले.  हातांनी कविराजांची मुंडी धरली. त्या पठाणाने कविराजांच्या जबड्यात हात घातला. कविराजांचे मुख रक्ताने भरून गेले. त्या धटींगणाने कविराजांची जीभ हाताने बाहेर खसकन खेचली. एकाने ती वीतभर लांब बाहेर आलेली जीभ कट्यारीने खचकन छाटली. कविराजांच्या तोंडातून रक्ताचा डोंब उबळला. संभाजी महाराजांचीही जीव्हा अशीच छाटली गेली. पहाणाऱ्यांचेही डोळे पांढरे पडले. असूरी आनंदाने आवघी छावणी गर्जत होती. कवी कलशांवर होणारे अत्याचार ही जणू संभाजी महाराजांवर होणाऱ्या अत्याचारांची रंगीत तालीमच असायची. संध्याकाळ झाली. शंभू महादेव खांबास घट्ट बांधून ठेवलेले होते. स्वाभीमानाने तळपत झळकणाऱ्या तेजस्वी योग्यासारखे. ज्यांच्या तेजाने शेशही डळमळून जावा अशा तेजस्वी श्रीकृष्णासारखे. अविचल. अभेद्य ! आभाळात अभिमानाने मस्तक उंचावून बाणेदारपणे उभे असलेल्या रायगडाच्या टकमक टोकासारखे. दोन दैत्य पुढे सरसावले. एकाने पाठीच्या वरच्या मणक्यापासून आणि दुसऱ्याने समोरून गळ्यापासून शंभूराजांच्या अंगात वाघनख्या घुसवल्या. त्या राक्षसांना जोर चढावा म्हणून कुराणातील आयते वाचले जात होते. रण वाद्यांचा दणदणाट होत होता. "दीन दीन" "अल्लाहो अकबर" च्या घोषात राजांची त्वचा डाळिंबाच्या टरफला सारखी

सोलली जात होती. जास्वंदीसारखा लाल बुंद देह यातनांनी तळमळत होता. रक्ता मासाच्या चिंध्या होत होत्या. संपूर्ण देहाची चाळणी झाल्यावर मग फरशा व खांडे पेलत दोन गाझी पुढे आले. त्या दोघांचेही हात पाय असे अवयव एक एक करून तोडून टाकले. एकाने खांड्याचे धारधार पाते संभाजी राजांच्या मानेत घुसवले. व हळू हळू कुराणातील आज्ञेप्रमाणे 'हलाल' करीत शिर चिरत धडावेगळे केले !!! ( तारखेप्रमाणे) मार्च ११, १६८९ रोजी संभाजीराजांची शिरच्छेद करून भीमा आणि इंद्रायणी नदीच्या संगमावरील तुळापूर येथे हत्या करण्यात आली. आणि एवढ्यावरच न थांबता पुढे शंभू राजेंचे शीर टोकदार भाल्यावर रोवून ऐन गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशी आपल्या राजांच्या मस्तकांची गुढी पूर्ण गावात फिरवण्यात आली. काय ती विटंबना माझ्या शंभू बाळाची कलपना करताच अंगावर शहारा आणि डोळ्यात आग निर्माण होते. मृत्यू अगोदर तर मरण यातना भोगल्याच पण मरणानंतरही या शंभू देहाची अवहेलना!!! आणि शरीराचे काही रक्ताळलेले मांस तुकडे जंगली कुत्र्यांना फेकण्यात आले आणि काही तुकडे भीमा आणि इंद्रायणी नदीच्या संगमामध्ये भिरकावण्यात आले. सर्वत्र मुघली छावणीत जल्लोष सुरु होता. आणि इकडे माझ्या शंभूराजांच्या शरीराचे हाल !!! पूर्ण गावभर शाही आदेश देण्यात आला कि कोणीही संभाजीच्या शरीराच्या तुकड्यांना हाथ लावणार नाही न कोणी दया दाखवणार नाही. फाल्गुनी वद्य अमावस्याच्या भयाण काळ रात्रीत

क्रूरकर्मा औरंग्याने संभाजीराजेंचे तुकडे नदी पात्रात फेकण्याचे आदेश दिले होते. आणि आपल्या तेजस्वी महापराक्रमी रुद्रावतार संभाजी राजांचे मासांचे तुकडे नदीपात्रात वाहून पूर्ण नदीपात्र रक्ताने माखली होती. हे तुकडे वाहत वाहत नदीच्या मार्गे पुढे वढू गावातून जाते. दुसऱ्या दिवशीच्या पहाटेच्या अंधारात वढू गावातील जनाबाई परटीन आपल धुणे घेऊन पहाटेच्या अंधारात नदी पात्रात उतरली. निखळ आणि मोठा दगड बघून ती धुण्यासाठी पाटलाची बराबंदी खंगळून धुवू लगली. जनाची उमर तीस वर्षाची होती. माहेर पाबळ आणि सासर वढू. लहानपणापासूनच तिने गोंधळयाच्या मुखातून शिवाजी राजांचे पोवाडे एकलेले होते त्यामुळे तिला महाराज आणि रायगडाच्या परिसरबाबत खूप आकर्षण होते. लग्नाआधी ती आपल्या बापाला दोनतीन वेळा बोलली देखील होती." तात्या मला तिकडं रायगडाकड पाचाड बीचाड गावचा नवरा का करून देत नाय?"

"इतक्या लांब कशाला ग खुळे?" बापाने विचारलं

" तिथं नांदली असती तर एक ना एक दिवस शिवाजी आणि संभाजी राजांचा पोशाख धुण्याला मिळालं की जन्माच कल्याण झाल्यासारखं वाटलं असतं ना!"

पण जनाच्या नशिबी वढू च होतं. गावची पराटिन या नात्यानं दामाजी पाटलाच्या घरची रग्गड कापड तिला धुवायला मिळायची. रोजाच्यासारख

तिचं काम चालू होत, तोवर तुळापूर गावचा बैजा धनगर आपली मेंढर घेऊन पल्याडच्या काठाला आलेला दिसला. कपडे निर्मळ धुण्याच्या बेताने जना थोडी खोल पाण्यात उतरली. कपड्याला पिळ देऊ लागली आणि कपडासोबत तिला विचित्र वस्तू तिच्या हाताला लागली. ती दोरीसारखी गिळगिळीत वस्तू वर दरडी कडं भिरकावत जना संतापाने ओरडली, " कोण मेली माणसं हायेत का जनावर? बकऱ्याची आतडी पाण्यात टाकायचा खोटेपणा मी म्हणते का करतायत? जळलं त्वांड मेल्यांच!!"

जनाचा दंगा ऐकून बैज्या धनगर तिला म्हणाला, " जना... ते आतड जनावराच न्हाय माणसाचं हाय.." जना दचकली, " आँ? काय बोलता?"

' 'तुला माहित नाय का? काल राती औरंग्याने शिवाजी राजांच्या लेकराला शंभूराजाला इथं नदीकाठाला बकऱ्यासारखा कापला. त्यांचं मांस आहे ते नीट बघ! मागं दरडाला पडलंय.''

' 'काय सांगताय काय, मामा?''जना एकदम हादरली होती.

' 'हात लावू नकोऽ पळ घरला. शंभूराजांच्या मांसाला शिवू नका, असा औरंग्याचा हूकूम हाय. खानाची माणसं बेदम ठोकून काढत्याल तुला.'' धुणे होते तसेच गोळा करून जना पटकन मागे वळली. पाणंदीने तशीच गावाकडे पळू लागली. तिने पाटलांच्या वड्यात आपली धुणेपाटी

जवळजवळ खाली आपटलीच. तिला खूप राग आला होता. चिडून ती पाटलीन बाईला बोलू लागली. औरंग्याच्या नावाने शाप देत सुटली आणि गावातील गड्या माणसांना शिव्या घालू लागली. की शिवाजी राजचा लेकाचे आपल्या गावाच्या वेशीवर असे हाल झाले आणि आपण त्यांना वाचवू शकलो नाही. आणि मरणानंतर त्यांचा शरीराचे हे हाल.तिला हे सहन होत नव्हते. गावच्या लोकांनी पाटलांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला त्या याचात नको पडू म्हणू जीवाला भिऊन सर्वजण शांत होते.पण जना काही शांत बसणारी नव्हती. तिने गावातील बायकांना गोळा करून सगळ्यांना शिवाजी राजा संभाजी राजांनी आपल्यासाठी काय केलंय आणि आपण काय करायला पाहिजे हे सांगू लागली. तिच्या बोलण्यातून बायकांना जणू अवसान आले. तशा सर्व बायका नदीच्या दिशेने निघाल्या शंभुराजे चे शरीराचे गोळा करण्यासाठी नदीपात्रात उतरू लागली. त्यांचा पुढाकार बघून गावातील लोक तरुण पोरं बायका पोरी सगळे नदी पात्रात उतरून ज्याला जे मिळेल ते शरीराचे तुकडे गोळा करू लागले. अतोनात मेहनत घेऊन समद नदीपात्र खांगाळून गावकऱ्यांनी शंभुराजे च्या शरीराचे मिळेल तेवढे तुकडे गोळा केले गावातील च शिवल्यां नी ते तुकडे जमेल तसे एका जागी करून शिवण्याचा प्रयत्न केला. आणि गावात घेऊन आले.आता सर्वांना प्रश्न पडला की अंतिम संस्कार कुठं करायचं? कारण पातशाहीचा आदेश च होता की जो कोणी संभाजीराजांचा

शरीराला हाथ लावेल त्याला जीव गमवावा लागेल. तसा सर्व गाव शांत झाला.दामाजी पाटील तर आपल्या जमीनीवर पाणी सोडायला तयार होता.पण त्याचा जमीनजुमला कोसभर अंतरावर होता. बाकीचेवजमीनमालक घाबरले. उद्या पातशहाचे दरकदार आले आणि जमिनीचा मालक म्हणून त्यांनी आपलाच गळा पकडला तर?....''

ती गावकऱ्यांची उडालेली भंबेरी गोविंद नाक (महार) ला सहन झाली नाही. तो पुढे धावला. गावाशेजारची आपली जमीन दाखवत बोलला, ''या इकडं या. ही आम्हा महारांची वतनी जमीन. इथं आमच्या जमिनीत करा दहन शंभूराजांना! असं बी आम्हाला कुठ शेती लागती, जमीन लागती? आणि समजा, उद्या पातशहाचं संकट आलं, तर कुटंबी निगून जाऊ! पोट भरू कुठंबी—' '

' 'अरं, गोविंदाचा मावसभाव रायाप्पाबी शंभूराजांचा सेवक होता.'' मध्येच कोणीतरी बोलले

' 'नुसता रायाप्पा नव्हं दाजी, शिवाजी महाराजांच्या पालखीला जन्मभर भोई म्हणुन कुणी खांदा दिला होता वो?आणि आता शंभूबाळाची गोष्ट काय सांगावी? आमा म्हारापोरांच्या थाटलीत हात घालून घुगऱ्या खानारा ह्यो पयला राजा व्हता रं बाबांनो! कसं इसरू आमी त्येला?'' अस बोलून

सगळयांनी गोविंदाच्या च जागेत टाकोटाक सरण रचले गेले. अंत्यसंस्कार लवकर आटोपणे गरजेचे होते. पातशहाचा घाला केंव्हाही येण्याची भीती होती. दामाजी पाटलाने चौफेर गोफणगुंडे घेऊन गावातल्या पोरांची फौज उभी केली होती. अचानक वैऱ्याची घोडी धावून आली तर त्यांना वेशीबाहेर आडवा. गोफणीतल्या दगडांनी लोळवा. प्राण गेला तरी अंत्यसंस्कारात अडथळा आणूदेऊ नका, असे त्यांना बजावून सांगितले होते.त्यानुसार पोरे पहारा देत गावाबाहेर खडी होती.गोरखनाथबुवांनी बेलपत्र आणि तुळशीपत्र वाहिली. शंभूराजांच्या चीतेला अग्नी देण्यात आला.आग धडाधड पेटूलागली. ही तेजस्वी अग्नी काळयाकुट्ट अस्मानाकडे झेपावू लागली.

त्याचबरोबर गावकऱ्याना जोराचा हुंदका फुटला. बायापोरे धाय मोकलून रडू लागली. एकमेकांना मिठ्या मारत उभ्या गावाने आकांत चालवला. ''अरं रायगडा... राजेश्वराऽऽ कुठून कुठं आलास रं पाखराऽऽ?''— ''अरे माझ्या शंभूराजाऽऽ' ' त्या शोकाला अंत नव्हता. लोक गुरासारखे हंबरत होते !.... धाकटी पहाट व्हायच्या आधीच चिता विझवली गेली. राजांची गरम रक्षा (राख) घेऊन पुन्हा सारा गाव भीमेच्या काठाकडे धावला. तांबडे फुटता फुटता ती रक्षा नदीत अर्पण केली गेली. आता उजाडू लागले होते. पाखरे जागी होऊ लागलेली. नदीकाठावरचा जमलेला तो बहादूर वढू गाव एकमेकांकडे अभिमानानं बघत होता. एक महान कार्य आपल्या हातून

घडल्याचे समाधान सर्वांच्या मुखावर होते. विशेषतः बायाबापड्यांच्या चेहऱ्यावर मोठी वीरश्री झळकत होती.

अश्या महापराक्रमी तेजस्वी रुद्रावतार असलेले आपले शंभुराजे म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांचा विसरत चाललेला इतिहास आणि पराक्रम आपल्यासमोर मांडण्याचा हा माझ्या कुवतीप्रमाणे अल्पसा प्रयत्न केला आहे. मला कल्पना आहेच की या पुस्तकात संक्षिप्त आणि थोडक्यात मांडता येणारा एवढा लहान इतिहास माझ्या राजांचा नाहीच. पण आजकालची वाचन आणि लेखन विसरत चाललेली पिढी या ३२ पानी (A4) पुस्तकातून तरी माझ्या शंभुराजे आणि त्यांच्या बलिदानाला तरी आठवतील. आणि ज्यांना आतापर्यंत शंभुराजे, स्वराज्याचे धाकल्या छत्रपती संभाजी महाराज कोण आहेत हेच माहित नव्हते त्यांना नक्कीच समजेल की स्वराज्याचे दुसरे छत्रपती कोण होते आणि त्यांचा पराक्रम काय होता आणि त्यांचे बलिदान काय होते!!! हा विश्वास मनात घेऊन च हे ३२ पाणी (A4) पुस्तक लिहण्याची पहिली सुरुवात.

आता मी परत सुरुवातीला येतो की हा पुस्तक लिहण्याची खटाटोप का? पुस्तक लिहत असताना जी प्रश्न मनाला खिन्न करून जात होते ते प्रश्न तसेच कायम आहेत. ज्याचे उत्तर वाचकांनी हे पूर्ण पुस्तक वाचून शोधन गरजेचं आहे.कारण मी स्वतः हे पुस्तक लिहून ही ते प्रश्न माझ्या मनात तसेच उपस्थित

आहेत. आणि हेच प्रश्न वाचकांनी स्वतःला विचारणं गरजेचं आहे आणि त्याची शोधणं हे प्रत्येक शिव - शंभू भक्तांचे कर्तव्य आहे. असे मला वाटते.

शंभू भकतांनो, करा विचार खालील प्रश्नांचा!!!

शूर, पराक्रमी, निस्वार्थी आणि रयतेलाच आपले सर्वस्व मानून, रयतेच्या भाजीच्या देठाला ही धक्का ना लागू देणाऱ्या व गोरगरीब रयतेला लहान मुलाप्रमाणे जपणाऱ्या त्याच राजांच्या पुत्राचा त्याच आपल्या शिवरायांच्या लेकराचा म्हणजे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज ( शंभुराजे) यांचा एवढा हृदय पिळवटून टाकणारा नि काळजात चर्र्र करणारा असा अंत का आणि कशासाठी ?? कोणत्या गुन्ह्याची ही शिक्षा होती शंभूराजेंना?? कोणामुळे ही दयनीय अवस्था त्या शिवपुत्राची?? वयाच्या अवघ्या 32 व्या वर्षी फक्त आपल्या जिजाऊ साहेबांच्या आणि शिवछत्रपती आबासाहेबांच्या विचारातील रयतेच्या स्वराज्यासाठी का मरण यातना त्यांनी भोगल्या?? का आज आपण विसरून गेलो या शिवसिंह - छाव्याच्या पराक्रमाला त्यांच्या बलिदानाला ?? कोण होते सिंहाचा छावा शिवपुत्र शंभूराजे?? छत्रपतींच्या त्या सावलीला, त्या प्रतिबिंबाला का आज हा स्वार्थी समाज विसरून गेलाय?? छत्रपतींच्या गादीचे धाकले धनी असून का छत्रपती संभाजी महाराज

होय छत्रपतीच असून ही त्यांना काळाच्या पडाद्याआड का विसरत गेली ही युवा पिढी??

शिव जयंती आज जगभरात साजरी होते जल्लोषात उत्साहात शिवजयंती आपण काढून आपल्या राजांच्या कीर्तीला जगासमोर आणतो आणि ती होयलाच पाहिजे पण याच स्वराज्याच्या धाकल्या धन्याची म्हणजेच स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतींची कीर्ती, शौर्य आणि पराक्रम जगाला दाखवून देण्यास आपण का कमी पडलो?? आपल्या शंभूराजांची जयंती का आज माहिती सुद्धा नाही या भरकटलेल्या युवा पिढी ला???

छत्रपती म्हणजे कोण हे सांगायची गरजच भासत नाही, कारण छत्रपती म्हणलं की आपोआप पुढे शब्द लागून येतात ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चं.....पण त्याचबरोबर शिव - शंभू चरीत्र म्हणजे आपल्याला एक प्रेरणामंत्र देऊन जातं ते म्हणजे शिवरायांनी आपल्याला कसं जगायचं ते शिकवलं तर शंभू राजांनी कसं मरायचं हे शिकवलं आहे.

पराक्रम आणि बलिदान हे शब्द ऐकताच आपल्या डोळ्यासमोर जेव्हा धगधगणारी तेजस्वी ज्वाला आणि सळसळणारी ऊर्जा रक्तात भिणनारी घोड्यावरील चपळ आणि तलवारीच्या पाती सारखी धारदार स्फूर्ती देणारी एक तेजस्वी मूर्ती आपल्या डोळ्यासमोर येते ती म्हणजे आपल्या शिवरायांची

आणि शंभू राजांची !!! आणि आपोआप आपल्या मनातून आणि मुखातून शब्द उच्चारतात. **छत्रपती...छत्रपती...छत्रपती !!!**

**पुण्यश्लोक श्री छत्रपती शिवाजी महाराज की.. जय!!**

**शिवपुत्र धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज की.. जय!!**

## संदर्भ :

छावा : शिवाजी सावंत

संभाजी : विश्वास पाटील

स्वराज्यरक्षक संभाजी मालिका : जगदंब क्रिएशन. निर्माता: डॉ. अमोल कोल्हे

प्राध्यापक श्री नितीन बानुगडे पाटील सर यांचे शंभूचरित्र भाषण आणि लेख.

शिवभारत : कवी परमानंद

संदर्भासाठी काही संकेतस्थळ :

१. https://www.studycircleonline.com/news/--/610

२.https://maharashtratimes.com/astro/dinvishesh/sambhaji-maharaj-jayanti-2023-these-things-must-know-about-chhatrapati-sambhaji-maharaj/articleshow/75737651.cms

३.https://shabdyatri.com/blog/shivaji-maharaj-agra-to-rajgad-journey/

४. https://rajmudraofficial.com/shivaji-maharaj-agra/


५.https://shivajisambhaji.weebly.com/2360230623492366233223682352236623322375.html


श्री
श्री शंभो:
शिवजातस्यमुद्रा द्यौ
रिव राजते ।यदं
कसेविनी लेखा
वर्तते कस्य नो
परि



रायगड येथील छत्रपती श्री शिवाजी महाराजांची समाधी.

३.





शिवरायांच्या राज्याभिषेक वेळी सप्तनद्यांचे पाणी रायगड वरील गंगासागर या पवित्र तलावात सोडले होते..




श्री क्षेत्र तुळापूर (बलिदान स्थळ) येथील
धर्मवीर श्री संभाजी महाराजांची समाधी.

श्री क्षेत्र तुळापुर येथील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांची पूर्णाकृती पुतळा.





श्री क्षेत्र वढू बुद्रुक (समाधीस्थळ) येथील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांची समाधी



श्री क्षेत्र वढू बुद्रुक (समाधीस्थळ) येथील धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा



श्री क्षेत्र वढू बुद्रुक (समाधीस्थळ) येथील
कवी कलश यांची समाधी